मनुष्याणाम् वृत्तिरर्थः।

ISSN 0973-8452

मराठी अर्थशास्त्र परिषद

नियतकालिक

(त्रैमासिक)

# अर्थसंवाद

मनुष्याणाम् वृत्तिरर्थः।

भारतीय सौर भाद्रपद – मार्गशीर्ष शके १९४३

ऑक्टोबर–नोव्हेंबर–डिसेंबर २०२१/खंड ४५, अंक ३

# ‘अर्थसंवाद’च्या लेखकांसाठी महत्त्वाच्या सूचना

१. लेखकांनी आपले शोधनिबंध Shree Lipi (२३३५) किंवा Kruti Dev किंवा Unicode यापैकी कोणत्याही Font मध्ये Pagemaker किंवा Ms Word मध्ये टाईप करून पाठवावा. या व्यतिरिक्त कोणताही Font वापरू नये.

२ **संशोधनपर लेखाची प्रत अथवा सीडी पोस्टाद्वारे पाठवू नये.** काही अडचण असल्यास संपादकांशी संपर्क साधावा.

३. **संशोधनपर लेखाची एक सॉफ्ट कॉपी (एक मूळ फाईल व त्याचीच PDF केलेली फाईल अशा दोन फाईल्स्) ई-मेल द्वारे प्रमुख संपादकांकडे rahulmhopare@rediffmail.com या ई-मेल ॲड्रेसवर पाठवावी.** लेखासोबत संपादकांना लेख पाठवल्याची स्वाक्षरी केलेली कव्हर नोट स्कॅन करून पाठवावी. तसेच ई-मेल केल्यानंतर संपादकांशी भ्रमणध्वनीवर (९९२३८७९०२०) संपर्क साधून आपला ई-मेल व्यवस्थित पोचल्याची खात्री करून घ्यावी.

४. संशोधनपर लेख पूर्वमुद्रित नसावा. त्यामध्ये कॉपीराईटचा भंग न करता संदर्भाचा उल्लेख करावा. आजीव सभासद क्रमांक, भ्रमणध्वनी क्रमांक व ई-मेल लिहिणे आवश्यक आहे.

५. लेखाच्या शीर्षकाखाली लेखकांनी स्वत:चे संपूर्ण नाव देवनागरीतूनच लिहावे.

६. संशोधनपर लेख खास अर्थसंवादसाठीच लिहिलेला असावा. माहिती व आकडेवारी अद्ययावत असावी. लेखात गरजेनुरूप सांख्यिकीय तक्ते व आलेखांचा वापर केल्यास उत्तम. लेखांची गुणवत्ता पाहून तज्ज्ञ परिक्षकांनी केलेल्या सर्व सूचनांची पूर्तता केल्यानंतरच त्याची प्रसिद्धीसाठी निवड केली जाईल.

७. भाषा संचालनालयाने प्रकाशित केलेल्या अर्थशास्त्र परिभाषा कोश यातील परिभाषेचा उपयोग करावा. संपादकांना पाठवलेल्या कव्हर नोटसह लेखनाची एक प्रत स्वत जयळ अवश्य ठेवावी.

८. लेखकांनी कृपया संशोधनपर लेख टाईप केल्यानंतर सर्व सांख्यिकी माहिती, शुद्धलेखन आणि व्याकरण अचूक तपासून नंतरच अंतिम प्रत पाठवावी.

९. संदर्भ सूची देताना पूढील पद्धतीने देणे आवश्यक आहे : उदा. पाटील, ज.फा., सुवर्ण महोत्सवी महाराष्ट्राची बदलती अर्थव्यवस्था, सकाळ पेपर्स लिमिटेड, पुणे, २०१०, (पृष्ठ क्रमांक असेल तर द्यावा.)

मनुष्याणाम् वृत्तिरर्थ:।
www.marthpari.org
(स्थापना वर्ष - १९७७)

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक

लोककल्याणमूलस्य अर्थशास्त्रस्य सिद्धये।
शोधचर्चाविवादार्थ संवादोऽयं प्रवर्तित:।।

# अर्थसंवाद

(तज्ज्ञ परीक्षित नियतकालिक)

Reg.No. 31918/77 / ISSN 0973-8452

ऑक्टोबर-नोव्हेंबर-डिसेंबर २०२१/ खंड ४५ / अंक ३

**प्रमुख संपादक**
राहुल शं. म्होपरे
(देवचंद कॉलेज, अर्जुननगर)

**सहायक संपादक**
चंद्रकांत जाधव
(य.च.वारणा महाविद्यालय, वारणानगर)

**सल्लागार मंडळ**
**(२०१८-२२)**
जनार्दन काकडे
राजू शिंदे
अजय दरेकर
मोहन सदामते

**संपादकीय पत्रव्यवहार**
राहुल शं. म्होपरे
'सर' निवास, रि.स.नं. ३३/क/२,
प्लॉट नं. १८, लेक व्ह्यू कॉलनी,
दीपा गॅस गोडाऊनमागे, उजळाईवाडी, ता. करवीर, जि. कोल्हापूर - ४१६ ००४,
भ्रमणध्वनी : ९९२३८७९०२०

**लेखातील मते लेखकांचीच**

## अनुक्रमणिका

१. **काशिनाथ रामचंद्र चव्हाण**
अर्थशास्त्रातील २०२१ चे नोबेल पुरस्कार विजेते अर्थतज्ज्ञ .. १४९

२. **संतोष दास्ताने**
वि. म. दांडेकर : आदर्श अर्थशास्त्री ........................ १५७

३. **अविनाश कुलकर्णी**
बुडत्या (कर्जा)ला बॅड बँकेचा आधार ...................... १६७

४. **प्रशांत यशवंत फडणीस**
सांगली जिल्हा परिषद शाळा- प्राथमिक शिक्षणावरील खर्च, सर्व शिक्षा अभियान आणि शिक्षण हक्क कायदा २००९ ..... १७२

५. **श्रीकृष्ण महाजन**
भारतातील वित्तीय समावेशन: धोरण आणि वास्तवाचे विश्लेषण ........................................ १७९

६. **रामदास गादगे, धोंडीराम पवार**
पुणे शहरातील कृषी उत्पन्न बाजार समिती आणि शेतकरी बाजार यांचा तुलनात्मक अभ्यास .................................. १८३

७. **आण्णा काका पाटील :** पुस्तक परिचय
कृषी संजीवके ............................................... १९४

८. **जे. एफ. पाटील**
आभासी चलनाचे मोहजाळ ................................ १९७

९. **शि. ना. माने :** अर्थ शब्दांची वाट पाहे...
होमो सॅपियन्स (Homo Sapiens) ............................ २००

१०. **ज्ञानदेव चि. तळुले** : वाद-प्रतिवाद-संवाद
अर्थसंवाद, एप्रिल-जून २०२१ च्या अंकामधील 'महाराष्ट्राच्या कृषी स्मशानाची राजकीय अर्थव्यवस्था...' या लेखावरील जुलै-सप्टेंबर २०२१ च्या अंकामधील प्रतिक्रियेवरील प्रतिभाष्य ........... २०२

## मराठी अर्थशास्त्र परिषद

### कार्यकारी मंडळ २०२१-२२

- **अध्यक्ष**
  **अनिल बा. सूर्यवंशी (सोलापूर)**
- **कार्याध्यक्ष**
  **कैलास के. पाटील (परभणी)**
- **कार्यवाह खजिनदार**
  **मारोती वि. तेगमपुरे (अंबड)**
- **प्रमुख संपादक-अर्थसंवाद**
  **राहुल शं. म्होपरे (कोल्हापूर)**
- **विश्वस्त**
  **आप्पासाहेब पुजारी (मंगळवेढा)**
  **रामकृष्ण टाले (नागपूर)**
  **अजय दरेकर (बारामती)**
- **सदस्य**
  **विजय भोपाळे (नांदेड)**
  **स्नेहा देशपांडे (नागपूर)**
  **बळवंत कोरे (कराड)**
  **गणेश मांगडे (दापोली)**
  **माधव शिंदे (अहमदनगर)**
  **सुरेश ढाके (भुसावळ)**
  **शिवाजी काकडे (बीड)**
  **अरुण पिसे (धुळे)**
  **राजाराम पाटील (सोलापूर)**
  **दयाळू राठोड (अकोला)**
  **मनीषकुमार कायरकर (बल्लारपूर)**
- **स्वीकृत सदस्य**
  **जयवंत इंगळे (विटा)**
  **गोरक्षनाथ सानप (संगमनेर)**
- **स्थानिक कार्यवाह**
  **संजय जगदेव कोठारी (नांदगाव)**

**कार्यालयीन पत्रव्यवहार:**
(आजीव सदस्य नोंदणी, जाहिरात पाठविणे)
मुद्रक-प्रकाशक : **मारोती वि. तेगमपुरे**
कार्यवाह खजिनदार, मराठी अर्थशास्त्र परिषद, 'संगाई', घर नं. २२, शहीद भगतसिंग नगर, भालचंद्र पेट्रोल पंपामागे, पारनेर रोड, अंबड, जि. जालना. पिन - ४३१ २०४ भ्रमणध्वनी : ९४२३९९३१३७

**अर्थसंवाद वर्गणी :**

- **परिषदेचे सदस्य :**

| | |
|---|---|
| आजीव सदस्य | : रु. ३०००/- (एकरकमी) |
| इमारत निधी | : रु. २०००/- |
| सदस्य सूची | : रु. १००/- |
| एकूण | : रु. ५१००/- |

- **संस्था सदस्य व अर्थसंवाद वर्गणीदार:**
  शैक्षणिक संस्था, व्यावसायिक संस्था, ग्रंथालये } रु.२०००/-(त्रैवार्षिक), रु.३०००/-(पंचवार्षिक)
- **वर्षगणना :** १ एप्रिल ते ३१ मार्च
- संस्थांना आजीव सभासद होता येत नाही.
- कृपया आजीव सदस्य वर्गणी **मराठी अर्थशास्त्र परिषद** या नावाने डिमांड ड्राफ्टद्वारेच कार्यवाहांकडे पाठवावी.
- अर्थसंवादची वर्गणी **मराठी अर्थशास्त्र परिषद** या नावाने डिमांड ड्राफ्ट किंवा NEFT (BOI खाते क्र. 094720110000368, IFSC - BKID0000947, राजारामपुरी, कोल्हापूर) द्वारे प्रमुख संपादकाकडे पाठवावी.
- मनीऑर्डर व वार्षिक वर्गणी स्वीकारली जात नाही.

**'अर्थसंवाद'साठी अनुदानाबद्दल आभार:**
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.
टीप : म. रा. सा. सं. मंडळाने अनुदान दिले असले, तरी या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ आणि राज्य शासन सहमत असेलच असे नाही.

हे त्रैमासिक, प्रकाशक मारोती वि. तेगमपुरे (प्रमुख संपादक राहुल शं. म्होपरे) यांनी मराठी अर्थशास्त्र परिषद या संस्थेकरिता भारती मुद्रणालय, शाहुपुरी, कोल्हापूर येथे छापून मराठी अर्थशास्त्र परिषद, शहीद भगतसिंग नगर, भालचंद्र पेट्रोल पंपामागे, पारनेर रोड, अंबड - ४३१ २०४ येथे प्रसिद्ध केले.

# अर्थशास्त्रातील २०२१ चे नोबेल पुरस्कार विजेते अर्थतज्ज्ञ

**काशिनाथ रामचंद्र चव्हाण** †

**प्रास्ताविक :**

प्रतिष्ठेचा समजला जाणारा नोबेल पुरस्कार रॉयल स्वीडिश ॲकॅडमीकडून जगभरातील वैद्यकीय, साहित्य अशा सहा क्षेत्रांत योगदान देणाऱ्या व्यक्तींना दिला जातो. रॉयल स्वीडिश ॲकॅडमीची स्थापना सन १७३९ मध्ये झाली. ही एक स्वायत्त संस्था असून ज्या व्यक्ती व संस्था समाजाला उपयुक्त ठरणारे संशोधन करतात व सक्षमता वाढविण्यासाठी आपल्या संशोधनातून वैज्ञानिक, सामाजिक, साहित्यिक व आर्थिक क्षेत्रात मोलाची भर घालतात, अशा व्यक्ती व संस्थांना प्रामुख्याने हा पुरस्कार दिला जातो. नैसर्गिक शास्त्रे, गणित आणि विविध क्षेत्रातील तज्ज्ञ व शास्त्रज्ञांच्या विचारांची देवाणघेवाण घडवून आणण्याचे कार्य ही संस्था करते. आल्फ्रेड नोबेल यांच्या स्मरणार्थ अर्थशास्त्रासाठी दिला जाणारा हा पुरस्कार 'सेव्रीजेस रिक्स बँक प्राईज इन इकॉनॉमिक सायन्सेस' या नावाने ओळखला जातो. २०२१ चा हा अर्थशास्त्रातील प्रतिष्ठेचा पुरस्कार अर्थशास्त्रातील संशोधनाकरिता डेव्हिड कार्ड, जोशुआ डी. अँग्रिस्ट आणि गुईडो डब्लू. इम्बेन्स या अमेरिकास्थित तीन संशोधकांना जाहीर झाला.

आत्तापर्यंत अनेक नामवंत अर्थशास्त्रज्ञांना या पुरस्काराने गौरवण्यात आले आहे. यामध्ये Ragner Frisch, John Timbergen, Paul Samuelson, Simon Kuznets, Kenneth Arrow, J. R. Hicks, Wasley Liontief, Hayek, Milton Friedman, Bertil Ohlin, J. E. Meade, Arthar Lewis, Schultz, George Stigler, Franco Modiligiani, Robert Solo, Ronalt Coase, Garry Belt इत्यादी अर्थतज्ज्ञांचा समावेश आहे. भारतीय वंशाचे अर्थतज्ज्ञ प्रो. अमर्त्य सेन यांना १९९८ मध्ये कल्याणकारी अर्थशास्त्रातील योगदानाकरिता व २०२० मध्ये प्रो. अभिजीत बॅनर्जी यांना जागतिक दारिद्र्य निर्मूलनाच्या बाबतीतील त्यांच्या कार्याकरिता नोबेल पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

**पार्श्वभूमी :**

आल्फ्रेड नोबेल हे स्वीडिश रसायनतज्ज्ञ, अभियंते तसेच उद्योजक होते. ते डायनामाईटच्या संशोधनाकरिता विशेष करून ओळखले जातात. त्यांच्या इच्छेखातर अशा व्यक्तींना ज्या व्यक्ती गतवर्षात समाजाला उपयुक्त ठरणाऱ्या, लाभदायक अशा संशोधनाकरिता हा पुरस्कार देण्यात येतो. पहिला पुरस्कार १२० वर्षांपूर्वी १९०१ मध्ये देण्यात आला. २०२० अखेरपर्यंत ९६२ नोबेल विजेत्यांना ६०३ पारितोषिके देण्यात आली आहेत.

† विभाग प्रमुख, अर्थशास्त्र विभाग, कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, लांजा, जि. रत्नागिरी.
आजीव सभासद क्र. १८२४, भ्रमणध्वनी : ८३०५७११७११, ई-मेल : Email. krchavan9@gmail.com

सन १९६९ पर्यंत आल्फ्रेड नोबेल यांच्या इच्छेनुसार ५ विविध क्षेत्रांत सामाजिकदृष्ट्या उपयुक्त ठरणाऱ्या व्यक्तींना हा पुरस्कार दिला जात होता. ज्यामध्ये भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, वैद्यकशास्त्र साहित्य व शांतता यांचा समावेश होता. पहिल्या पुरस्काराचे वितरण १० डिसेंबर, १९०१ रोजी आल्फ्रेड नोबेल यांच्या ५ व्या स्मृतिदिनी करण्यात आले. अर्थशास्त्रातील नोबेल पारितोषिकाचा समावेश १९६८ मध्ये बँक ऑफ स्वीडनने केला आणि हा पुरस्कार सर्वप्रथम १९६९ मध्ये देण्यात आला.

**नोबेल विजेते अर्थतज्ज्ञ -२०२१:**

२०२१ मध्ये अर्थशास्त्रातील नोबेल डेव्हिड कार्ड, जोशुआ डी. अँग्रिस्ट आणि गुईडो डब्ल्यू. इम्बेन्स यांना मिळाले आहे. अर्थशास्त्रातील हा पुरस्कार 'Sveriges Riksbank' या नावाने नॉर्वेजियन नोबेल समिती बहाल करते.

२०२१ मधील नोबेल विजेत्या अर्थतज्ज्ञांचा अल्प परिचय.

**डेव्हिड कार्ड :**

डेव्हिड कार्ड यांचा जन्म कॅनडामध्ये झाला. १९५० च्या दशकापासून त्यांनी संशोधन कार्यास सुरुवात केली. सध्या ते अमेरिका स्थित असून नॅशनल ब्युरो ऑफ इकॉनॉमिक रिसर्च येथे लेबर स्टडीज प्रकल्पाचे संचालक म्हणून काम पाहात आहेत. त्यांच्या संशोधनाचा मूळ गाभा हा श्रम बाजाराशी निगडित असून श्रमिक अभ्यासात त्यांनी विशेष योगदान दिले आहे. वेतन शिक्षण, कायमचे स्थलांतर तसेच श्रमिक बाजारपेठेतील लिंग व वंशभेद या बाबतीतील संशोधनात त्यांनी विशेष भर घातली आहे. कार्ड यांनी १९९५ मध्ये 'मिथ अँड मेजरमेंट : द न्यू इकॉनॉमिक्स् ऑफ मिनिमम वेज', १९९९ मध्ये 'द हॅन्डबुक ऑफ लेबर इकॉनॉमिक इफेक्टस् ऑफ ब्रिटिश इकॉनॉमी रिफॉर्म्स' या साहित्याच्या लेखनातून अर्थशास्त्रीय साहित्यात मोलाचे योगदान दिले आहे. तर कार्ड यांनी विविध जर्नलमधून १२५ हून अधिक लेख लिहिले. तसेच अनेक पुस्तकांमधून प्रकरणे लिहिली आहेत.

कार्ड हे १९९१ ते १९९५ पर्यंत इकॉनोमेट्रिकचे व २००२ ते २००५ पर्यंत अमेरिकन इकॉनॉमिक रिव्ह्यूचे सहसंपादक होते. तत्पूर्वी १९८३ ते १९९६ पर्यंत कार्ड हे प्रिन्स्टन विद्यापीठात प्राध्यापक म्हणून काम पाहात होते. त्यांनी कोलंबिया, हार्वर्ड सेंटर फोर ॲडव्हान्स स्टडीज येथे अभ्यागत प्राध्यापक म्हणून काम पाहिले.

डेव्हिड कार्ड यांना वर्तणूक विज्ञानातील योगदानाकरिता १९९५ मध्ये अमेरिकन इकॉनॉमिककडून जॉन बेट्स क्लार्क या पारितोषिकाने सन्मानित करण्यात आले होते. तर २००६ मध्ये त्यांना श्रम अर्थशास्त्र पुरस्कार (IZ-), २०१५ मध्ये BBV- फ्रोंटियर्स नॉलेज प्राईस, २००७ मध्ये फ्रिश पदक (इकॉनॉमिक सोसायटी) अशा विविध पदकांनी सन्मानित करण्यात आले आहे.

**जोशुआ डी. अँग्रिस्ट :**

जोशुआ डी. अँग्रिस्ट यांचा जन्म १८ सप्टेंबर १९६० मध्ये कोलंबस, अमेरिका येथे झाला. अँग्रिस्ट हे इस्त्रायली वंशाचे अमेरिकास्थित अर्थतज्ज्ञ आहेत. त्यांनी १९८२ मध्ये ओहायो येथील ओबर्लीन कॉलेजमधून अर्थशास्त्रात पदवी व १९८७ मध्ये प्रिन्स्टन विद्यापीठातून पदव्युत्तर पदवी व १९८९ मध्ये पीएच.डी. पदवी संपादन केली. १९९८ ते २००८ पर्यंत त्यांनी हार्वर्ड विद्यापीठ, हिब्रू विद्यापीठ, जेरुसलेम, मॅसेच्युसेट्स इन्स्टिटट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी येथे प्राध्यापक म्हणून काम पाहिले. त्यांचा संशोधनाचा मूळ गाभा नैसर्गिक प्रयोगांचे महत्त्व व मर्यादा शोधणे आणि त्या आधारे योग्य कारणात्मक निष्कर्ष काढण्यासाठी पद्धती विकसित करणे हा होता.

अँग्रिस्ट यांनी विविध नामांकित नियतकालिकांमध्ये कामगार व त्यांच्या वेतनाच्या प्रश्नांवर, चलनविषयक समस्यांवर तसेच शैक्षणिक व्यवस्थेवर जवळपास ५५

लेख प्रसिद्ध केले आहेत.

त्यांनी 'Mastering Metrics : The Path from Casuse to Effect' हा ग्रंथ २०१५ मध्ये तर २००९ मध्ये 'Mostly Harmless Econometrics An Empiricists Compaign' हा ग्रंथ लिहिला. त्यांनी विविध संदर्भ ग्रंथांमध्ये Imperial strategies in labor economics teacher testing, teacher education and teacher characteristics या विषयावर १२ प्रकरणे लिहिली आहेत. तर मशीन लेबर, लेबर मार्केट अँड इट्स अँटोनोमी या विषयावर १७ शोधनिबंध लिहिले आहेत.

अँग्रिस्ट यांना नोबेल पुरस्कारापूर्वी अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. यामध्ये प्रामुख्याने डॉक्टरल एज्युकेशनमध्ये सर्वोत्कृष्ट योगदानाकरिता दिला जाणारा Eugene Fama Prize, डॉन वाँन न्यूमन अॅवॉर्ड (Advanced Studies करिता), दोन वेळा MFT मधील उत्कृष्ट पदवी व पदव्युत्तर अध्यापानाकरिता पुरस्कार तसेच Empirical Economics Guilloches Prize at QJE Honorable Mention 1999 इत्यादी पुरस्कार त्यांना प्राप्त झाले आहेत.

अँग्रिस्ट यांच्या शैक्षणिक मान्यताप्राप्त कार्याचा आढावा पुढीलप्रमाणे आहे. त्यांनी Applied Econometrics चे आंतरराष्ट्रीय संघटनेचे फेलो म्हणून MFT Margarate Mac येथे Faculty Fellow, अमेरिकन अॅकॅडमी ऑफ आर्टस् आणि सायन्सकरिता फेलो म्हणून आणि सोसायटी ऑफ इकॉनॉमिककरिता फेलो म्हणून काम पाहिले आहे. तर Herbrew University, Jerusalem करिता Lady Davis Fellow तसेच IZ- Bonn चे संशोधन सहायक अशा विविध व्यावसायिक मान्यता त्यांनी प्राप्त केल्या आहेत. त्यांना विद्यावाचस्पती ही मानद पदवी देऊन युनिव्हर्सिटी ऑफ सेंट ग्लान, स्वित्झर्लंड यांनी गौरविले आहे.

**गुईडो इम्बेन्स :**

इम्बेन्स यांचा जन्म ३ सप्टेंबर १९६३ मध्ये गेड्रोप, नेदरलँड्स येथे झाला. त्यांना सध्याचे (२०२१) अर्थशास्त्रातील नोबेल 'Methodological Contributions to the analysis of causal relationships' या विषयावरील संशोधनासाठी मिळाले आहे. त्यांच्या संशोधनाचा मूळ गाभा लेबर मार्केट हा आहे.

इम्बेन्स हे सध्या स्टॅनफोर्ड ग्रॅज्युएट बिझनेस स्कूल मध्ये अर्थशास्त्राचे प्राध्यापक म्हणून काम पाहत आहेत. तत्पूर्वी त्यांनी इकॉनोमेट्रिक सोसायटी अँड अमेरिकन अॅकॅडमी ऑफ आर्टस् अँड सायन्स येथे फेलो म्हणून संशोधन केले आहे. त्यांच्या संशोधन कार्यासाठी नोबेल बरोबरच सेंट गालेन विद्यापीठाने मानद डॉक्टरेट ही पदवी बहाल केली आहे.

गुईडो इम्बेन्स यांनी "The State of Applied Econometrics : Causality and Policy Evaluation" या विषयाबरोबर विविध अर्थशास्त्रीय संकल्पनांवर जवळपास ३० च्या वर मानांकित नियतकालिकांमधून लेख लिहिले आहेत. गुईडो इम्बेन्स यांनी २०१५ मध्ये Casual Inference For Statistics, Social and Biomedical Sciences हा ग्रंथ लिहिला आहे.

**नोबेल पुरस्कार विजेते अर्थशास्त्रज्ञाचे संशोधन कार्य व योगदान.**

**अर्थशास्त्रामध्ये नैसर्गिक प्रयोग :**

संशोधनाकरिता प्रामुख्याने यादृच्छिक प्रयोग मोठ्या प्रमाणात वापरले जातात. परंतु यादृच्छिक प्रयोगाच्या काही मर्यादा आहेत. या मर्यादा लक्षात घेऊन संशोधनातील तफावत भरून काढण्यासाठी वरील तीनही तज्ज्ञांनी विशेष परिश्रम घेतले आहेत. विविध प्रश्नांची उत्तरे अधिक वास्तवतेकडे नेण्याचा प्रयत्न केला आहे. यादृच्छिक प्रयोगामध्ये कार्यकारण भाव प्रस्थापित

करण्याचा प्रयत्न केला जातो. आणि यामध्ये व्यक्तींची यादृच्छिक लॉटरीद्वारे विविध गटांमध्ये विभागणी केली जाते. ह्या पद्धतीमध्ये जिथे संशोधकांचे नियंत्रण असेल अशा प्रकारची विभागणी असते. विशेषतः नवीन औषधांच्या परिणामकारकतेची तपासणी करण्याकरिता याचा उपयोग केला जातो. उदा. संशोधक उपचारासाठी एका गटाला औषधांचे वाटप करतात आणि औषधांच्या परिणामाची तुलना औषध न घेतलेल्या नियंत्रित गटाशी करतात. परंतु अनेक सामाजिक समस्यांच्या चिकित्सेसाठी ही पद्धत योग्य ठरत नाही. २०१९ मध्ये नोबेल समितीने यादृच्छिक प्रयोगांच्या क्षेत्रातील त्यांच्या योगदानासाठी पुरस्कार दिले. परंतु काही समस्या अशा असतात की त्यांचा अभ्यास करण्यासाठी यादृच्छिक प्रयोगाचा वापर करू शकत नाही. उदा. काही लोक आणि प्रदेश अधिक असमान का आहेत? त्यांची तुलना करताना त्यांना कमी शैक्षणिक संधी का आहेत? इ. चा अभ्यास करताना समस्या जाणवतात. दुसरे उदाहरण द्यावयाचे झाल्यास उच्च माध्यमिक शाळेत कोणाला प्रवेश द्यायचा आणि कोणाला नाही हे निर्धारित करणारा यादृच्छिक प्रयोग आपल्याकडे असू शकत नाही. हा प्रश्न त्यांना उत्पन्न आणि शैक्षणिक पातळी यामधील संबंध अभ्यासताना आढळला.

नैसर्गिक प्रयोगामध्ये अर्थशास्त्रज्ञ धोरणाबद्दल किंवा ऐतिहासिक घटनेचा अभ्यास करताना आणि या घडामोडींचे स्पष्टीकरण देण्यासाठी कारण आणि परिणाम यामधील संबंध निश्चित करण्याचा प्रयत्न करतात. या नोबेल पुरस्कार विजेत्यांना आर्थिक प्रगतीसाठी अशा नैसर्गिक प्रयोगांचा उपयोग करताना दोन प्रकारच्या काठिण्यता आढळून आल्या. एक म्हणजे नैसर्गिक प्रयोगाचा प्रभाव ओळखणे आणि दुसरे म्हणजे नियंत्रित गट व अनियंत्रित गटामध्ये फरक केला जाऊ शकत नाही. यादृच्छिक प्रयोगात मात्र गटाबद्दल पूर्ण माहिती व त्यांना नियंत्रित करता येते. त्यामुळे औषधांचे कारण आणि परिणाम यांचा अभ्यास करत असताना यादृच्छिक प्रयोग महत्वाचे ठरतात. परंतु नैसर्गिक प्रयोगामध्ये असे स्पष्ट भेद करणे शक्य नाही, कारण लोक त्यांचे गट स्वत:हून निवडतात आणि गट देखील बदलत असतात. नैसर्गिक प्रयोगामध्ये ही आव्हाने असली, तरी या संशोधकांनी काही धोरणात्मक अशा प्रश्नांची उत्तरे शोधण्याकरिता नैसर्गिक प्रयोगाचा वापर कसा करू शकतो याचे स्पष्टीकरण देऊन हे संशोधनाच्या आधारे सिद्ध केले आहे.

**डेव्हिड कार्ड यांचे नैसर्गिक प्रयोगामधील योगदान:**

डेव्हिड कार्ड यांनी आर्थिक धोरणासाठी आवश्यक असलेल्या अत्यंत जिव्हाळ्याच्या अशा विषयावर संशोधन केले आहे. ही समस्या म्हणजे उच्च किमान वेतनाचा रोजगारावर काय परिणाम होईल हे समजून घेणे व यावर संशोधन करणे. अर्थतज्ज्ञांना किमान वेतन व रोजगार यांच्यामधील कार्यकारणभाव समजून घेण्यासंबंधी रस होता, कारण त्याबद्दलची दिशा निश्चित नव्हती. समजा, जर अर्थव्यवस्थेमध्ये मंदी निर्माण झाल्यास कमी उत्पन्न गटामध्ये बेरोजगारी वाढते. त्यामुळे कमी उत्पन्न गट उच्च किमान वेतनाची मागणी करू शकतात. अशा वेळी उच्च किमान वेतनाचे कारण म्हणजे उच्च बेरोजगारी ठरते.

वरील समस्येची उकल करण्यासाठी आणि कार्यकारणभावाची मांडणी करण्यासाठी कार्ड आणि ॲलन क्रुगर यांनी १९९० च्या दशकाच्या सुरुवातीस नैसर्गिक प्रयोगाद्वारे किमान वेतनाच्या परिणामांचा अभ्यास केला. त्यांचा हा अभ्यास न्यूजर्सीमध्ये प्रति तास किमान वेतन वाढविल्यानंतर त्याचा प्रभाव अभ्यासण्यासंदर्भात होता.

**श्रमिक बाजार : किमान वेतन व रोजगार**

१९९० च्या दशकाच्या सुरुवातीस अर्थशास्त्रज्ञांमध्ये असे विचार रूढ होते की, उच्च किमान वेतनामुळे

रोजगार कमी होत जातो. कारण, उद्योजक हे व्यवसायामध्ये वेतन खर्च वाढवतात. परंतु हे निष्कर्ष ठोस पुराव्यावर आधारित नव्हते. अर्थात, किमान वेतन आणि रोजगार यांच्यातील नकारात्मक संबंध दर्शविणारे अनेक अभ्यास झालेले होते. यावर डेव्हिड कार्ड यांनी प्रतिप्रश्न केला की, उच्च किमान वेतनामुळे बेरोजगारी वाढली का? म्हणजेच कारण हेच एक समस्या असू शकते. जेव्हा बेरोजगारी वाढते तेव्हा उद्योजक कमी वेतन निश्चित करतात. परिणामी, किमान वेतन वाढविण्याची मागणी होऊ शकते.

वाढलेल्या किमान वेतनाचा रोजगारावर कसा परिणाम होतो, हे अभ्यासण्यासाठी कार्ड आणि ॲलन क्रुगर यांनी एक नैसर्गिक प्रयोग वापरला. १९९० च्या दशकाच्या सुरुवातीस न्यूजर्सीमध्ये एक तासाचे किमान वेतन ४.२५ डॉलर्सवरून ५.०५ डॉलर्स इतके करण्यात आले. कार्ड यांच्या मते, या वाढीनंतर न्यूजर्सीमध्ये काय घडले याचाच फक्त अभ्यास करून चालणार नाही. तर ते यादृच्छिक प्रयोगाप्रमाणे ठीक आहेत. त्याला एक नियंत्रित गटाची आवश्यकता असते. परंतु जर आपल्याला विश्वसनीय निष्कर्ष प्राप्त करावयाचे झाल्यास इतर घटक लक्षात घेतले पाहिजेत, कारण वेळोवेळी बदलणाऱ्या रोजगार पातळीवर ह्या घटकांचा प्रभाव असतो. म्हणूनच इथे यादृच्छिक प्रयोगाप्रमाणे एक गट जिथे वेतन बदलत नाही, परंतु इतर सर्व घटक समान आहेत असे गृहीत धरून चालणार नाही. कार्ड आणि क्रुगर यांच्या निदर्शनास आले की, शेजारील पेनसिल्व्हेनियामध्ये किमान वेतनामध्ये कोणतीही वाढ झाली नाही. जरी न्यूजर्सी व पेनसिल्व्हेनिया या दोन्ही राज्यामध्ये फरक असला, तरी श्रमिक बाजारपेठा सीमेच्या अगदी जवळ विकसित होण्याची शक्यता गृहीत धरली आणि त्यांनी दोन शेजारच्या भागांमधील रोजगारावर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास केला. अभ्यासादरम्यान त्यांना असे आढळून आले की, दोन्ही राज्यांतील श्रमिक बाजारपेठ समान असूनसुद्धा किमान वेतनामध्ये तफावत आहे. कारण किमान वेतन सीमेच्या एका बाजूला वाढले होते परंतु दुसरीकडे नाही. न्यूजर्सीमध्ये जर बदल घडून आला आणि हा बदल जर पेनसिल्व्हेनियामधील बदलापेक्षा वेगळा असला तर ठोसपणे असे सांगता येईल की, तो किमान वेतनातील वाढीमुळे झालेला आहे.

किमान वेतन वाढीचा रोजगारावर होणारा परिणाम अभ्यासण्यासाठी न्यूजर्सीमधील फास्ट फूड रेस्टॉरंटचा अभ्यास करण्यात आला. यामध्ये देखील त्यांना असे आढळून आले की, किमान वेतनवाढीमुळे कर्मचाऱ्यांच्या संख्येवर कोणताही परिणाम होत नाही. नंतरच्या काळात देखील याचा पाठपुरावा करण्यासाठी अभ्यास झाले व त्यामधून असे समान निष्कर्ष निघाले की वेतन वाढविल्यामुळे रोजगारावर नकारात्मक परिणाम फारसे होत नाहीत.

**स्थलांतर आणि शिक्षण**

स्थलांतरामुळे श्रमिक बाजारावर कसा परिणाम होतो हे जाणून घेण्यासाठी त्यांनी, जर स्थलांतर झाले नसते तर काय परिणाम झाला असता याचा विचार करणे आवश्यक आहे, असे मत मांडले. कारण, स्थलांतरित लोक वाढत्या श्रमिक बाजारपेठ असलेल्या प्रदेशात स्थायिक होण्याची शक्यता असते. त्यांचे असेही मत होते की, ज्या प्रदेशांमध्ये स्थलांतर झाले आहे व ज्या प्रदेशांमध्ये झालेले नाही याची तुलना करून कार्य-कारण भाव अभ्यासण्यासाठी हे पुरेसे नाही. १९८० मध्ये क्युबनच्या स्थलांतराचा अभ्यास त्यांनी केला. मे ते सप्टेंबर दरम्यान १,२५,००० क्युबन लोक अमेरिकेत स्थलांतरित झाले. त्यांच्यापैकी बरेच जण मियामीमध्ये स्थायिक झाले, ज्यामुळे मियामीच्या श्रमशक्तीमध्ये सुमारे ७% वाढ झाली. मियामी व इतर चार शहरांचा तुलनात्मक अभ्यास नैसर्गिक प्रयोगाच्या आधारे केला गेला. ज्यामध्ये मियामी या शहरात स्थलांतर घडून


आले व इतर शहरांत स्थलांतर घडून आले नाही. या स्थलांतराचा मियामीच्या वेतन व रोजगारावर कोणताही नकारात्मक परिणाम झालेला दिसून आला नाही. या अभ्यासामुळे मोठ्या प्रमाणात नवीन संशोधनाला चालना मिळाली आणि स्थलांतराच्या परिणामांची दिशा स्पष्ट झाली. नंतरच्या पाठपुरावा अभ्यासाने हे दाखवून दिले आहे की, वाढत्या स्थलांतराचा देशात स्थायिक असलेल्या गटांच्या उत्पन्नावर सकारात्मक परिणाम होतो. तर पूर्वी स्थलांतरित झालेल्या लोकांच्या उत्पन्नावर नकारात्मक परिणाम होतो. याचे कारण म्हणजे स्थानिक नागरिक अशा नोकऱ्यांकडे वळतात ज्यांना चांगल्या मातृभाषा कौशल्याची आवश्यकता असते आणि जिथे त्यांना नोकरीसाठी स्थलांतरांशी स्पर्धा करावी लागत नाही. श्रमिक बाजारपेठेतील विद्यार्थ्यांच्या भविष्यातील यशावर शालेय संसाधनांचा प्रभाव याबाबत देखील कार्ड यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिलेले आहे. कार्ड यांच्या मते, शालेय संसाधने यशासाठी महत्त्वाची आहे.

**अँग्रिस्ट आणि इम्बेन्स यांचे योगदान**

नैसर्गिक प्रयोगामध्ये कार्यकारणभाव निश्चित करणे खूप कठीण होते. यावर उपाय म्हणून अँग्रिस्ट आणि इम्बेन्स यांनी कार्यकारणभाव अचूकपणे नैसर्गिक प्रयोगाच्या आधारे वापरले जाऊ शकतात, हे सिद्ध केले. त्यांनी १९९० च्या दशकात स्थानिक सरासरी कार्यप्रभाव (Local Average Treatment Effect) ही पद्धत विकसित केली, जी नैसर्गिक प्रयोगांच्या समस्यांवर मात करण्यासाठी वापरली जाते. उदाहरणार्थ, एखाद्या अभ्यासकाला जर अतिरिक्त वर्ष शालेय शिक्षण घेतल्याने त्याच्या उत्पन्नावर काय परिणाम होईल हे शोधायचे असेल तर स्थानिक सरासरी पद्धत वापरून या प्रश्नाचे उत्तर शोधता येऊ शकते. या पद्धतीचा वापर करून अँग्रिस्ट व इम्बेन्स यांना आढळून आले की, १९३० च्या दशकात यूएसमध्ये जन्मलेल्या पुरुषांमध्ये एक अतिरिक्त वर्ष शिक्षण घेतलेल्या लोकांची कमाई सरासरी सात टक्क्यांनी जास्त होती.

खालील आकृतीत अँग्रिस्ट आणि क्रुगर यांनी

**शिक्षण आणि उत्पन्न**




**अँग्रिस्ट व क्रुगर १९९१**

१९९१ मध्ये केलेल्या अभ्यासाचे निष्कर्ष दर्शविले आहेत. यामध्ये बारा वर्षे शिक्षण घेतलेल्या लोकांचे उत्पन्न अकरा वर्षे शिक्षण घेतलेल्या लोकांपेक्षा बारा टक्के जास्त आढळून आले. तर सोळा वर्षे शिक्षण घेतलेल्या लोकांचे उत्पन्न अकरा वर्षे शिक्षण घेतलेल्या लोकांपेक्षा ६५ टक्के जास्त आढळून आले. यावरून शिक्षणाच्या एका अतिरिक्त वर्षामुळे व्यक्तीच्या उत्पन्नात सात टक्के अतिरिक्त भर पडेल. हे जरी खरे असले, तरी तो निष्कर्ष अंतिम मानता येणार नाही असे त्यांचे मत होते. कारण काही चले नियंत्रणाच्या बाहेरचे आहेत. उदाहरणार्थ, जे लोक दीर्घ शिक्षण निवडतात ते अल्प शिक्षण निवडणाऱ्यांपेक्षा अनेक प्रकारे वेगळे असतात. म्हणजे काही लोक अभ्यासात हुशार असतात व ते अभ्यास करणे निरंतर ठेवू शकतात. परंतु त्यांनी तसे केले नसते तरीही त्यांना कदाचित जास्त उत्पन्न मिळाले असते. तसेच अशीही शक्यता नाकारता येत नाही की ज्यांना शिक्षणाचा मोबदला मिळण्याची अपेक्षा आहे तेच लोक जास्त काळ अभ्यास करणे निवडतात. म्हणून अशा प्रकारच्या संभाव्य कलांचा देखील विचार करून नैसर्गिक प्रयोग कसा वापरू शकतो हे या अर्थतज्ज्ञांनी एका महत्त्वाच्या लेखात सिद्ध करून दाखवले आहे. बऱ्याच परिस्थिती या असामान्य, अनियंत्रित असतात. परंतु त्यांचा विचार केल्यास काही महत्त्वाच्या प्रश्नांची उकल होऊ शकते हे सिद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे. थोडक्यात, नैसर्गिक प्रयोग यासाठी उपयुक्त ठरतात की, देशाच्या काही प्रदेशांमधील धोरणात्मक बदलांमुळे जे बदल संभवतात त्यामुळे अशा कलांचा अभ्यास नियंत्रणात येत नाही आणि अनपेक्षित यादृच्छिकतेमुळे नियंत्रित गट आणि उपचार गट यामध्ये विभाजन करता येते आणि त्यामुळे संशोधकांना कार्यकारण संबंध स्पष्ट करता येतात.

**संशोधनाची प्रासंगिकता**

५.१. डेव्हिड कार्ड यांनी १९९० च्या दशकाच्या सुरुवातीला केलेल्या संशोधनामुळे महत्त्वपूर्ण अशा नवीन संशोधनास उत्तेजन मिळाले आहे. कार्ड आणि क्रूगर यांच्या कार्याने प्रेरित होऊन अनेक अभ्यास पुढे आले व श्रमबाजाराबद्दलची समज वाढण्यास मदत झाली म्हणून डेव्हिड कार्ड यांचे श्रम बाजारातील संशोधनाचे योगदान अत्यंत महत्त्वपूर्ण मानले गेले आहे.

**कार्यकारणसंबंधाच्या अभ्यासासाठी एक नवीन चौकट**

जोशुआ अँग्रिस्ट आणि गुइडो इम्बेन्स यांनी १९९० च्या दशकाच्या मध्यापासून एक प्रभावशाली अभ्यासात शिक्षण आणि उत्पन्न यांच्यात कार्यकारणभाव कसा प्रस्थापित करता येईल ही समस्या हाताळली आहे. आपण कोणत्या परिस्थितीत नैसर्गिक प्रयोग करू शकतो. जेव्हा समस्यांचे विविध परिणाम किंवा प्रभाव व्यक्तीव्यक्तींमध्ये भिन्न असतात आणि त्यांचा सहभाग कसा असतो यावर पूर्ण नियंत्रण नसते. अशा बाबतीत संशोधक अशा प्रभावांचा अंदाज लावू शकतात का किंबहुना त्याचा अर्थ कसा लावला पाहिजे अशा प्रकारच्या संशोधनाला उपयुक्त अशा मार्गांचा शोध लावल्याने पुढील संशोधनाला दिशा मिळाली.

जोशुआ अँग्रिस्ट आणि गुइडो इम्बेन्स यांनी नैसर्गिक प्रयोगांमधून कारण आणि परिणामाबद्दल नेमके कोणते निष्कर्ष काढले जाऊ शकतात, हे दाखवून दिले आहे. त्यांच्याद्वारे विकसित केलेली चौकट निरीक्षणात्मक माहिती व कार्यकारण संबंध नंतरच्या संशोधकांनी मोठ्या प्रमाणावर स्वीकारलेले आहेत. कार्यकारण संबंध प्रस्थापित करण्यासाठी आवश्यक असलेल्या गृहितकांचे स्पष्टीकरण करून, त्यांच्या चौकटीने अनुभवजन्य संशोधनाची पारदर्शकता व त्यामुळे विश्वासार्हता देखील वाढवलेली आहे.

**प्रायोगिक संशोधनातील क्रांती**

वरील तीनही नोबेल पुरस्कार विजेत्यांच्या कार्याने सामाजिक विज्ञानातील अनुभवजन्य संशोधनात क्रांती घडवून आणली आहे आणि त्यांच्या संशोधनामुळे अत्यंत

महत्त्वाच्या प्रश्नांच्या उत्तरांच्या बाबतीत संशोधन कार्य करणाऱ्या अनेक संशोधकांच्या क्षमतेत लक्षणीय सुधारणा होण्यास मदत झाली आहे.

**समारोप**

डेव्हिड कार्ड, अँग्रिस्ट आणि इम्बेन्स यांच्या संशोधन कार्यामुळे श्रम बाजारातील संशोधन गतिमान झाले आहे. कार्ड यांचे श्रम बाजारातील नावीन्यपूर्ण संशोधन अर्थशास्त्राच्या संशोधनात मौल्यवान अशी भर घातली. नैसर्गिक प्रयोगांमध्ये कार्यकारणभाव कसा स्थापन करता येईल या बाबतीत अँग्रिस्ट व इम्बेन्स यांनी कारण आणि परिणाम अचूकपणे ओळखण्यासाठी नैसर्गिक प्रयोग कसे वापरले जाऊ शकतात हे दाखवले आहे. १९९० च्या दशकात यांनी स्थानिक सरासरी उपचार प्रभाव Local Average Treatment Effect ही पद्धत विकसित केली आहे. ज्यामुळे नैसर्गिक प्रयोगांच्या काही समस्यांवर मात करता आली. पूर्वी नैसर्गिक प्रयोग ओळखणे कठीण होते आणि जरी ओळखता आले तरी या प्रयोगांमधून माहिती संकलित करणे आणि त्याची उपयुक्तता यामध्ये बरीच संदिग्धता होती. परंतु या संशोधनामुळे अर्थशास्त्रज्ञांना भूतकाळातील धोरणांचा प्रभाव समजून घेण्यास मदत झाली. परिणामी, आज अनेक अर्थशास्त्रज्ञ संशोधनामध्ये नैसर्गिक प्रयोगांचा वापर करत आहेत.

**संदर्भ सूची**


१. Angrist J. D., 2009, Mostly harmless Econometrics : An Empiricists Companion, Princeton University Press.

२. David Card And Alan B. Krueger, Minimum Wages And Employment : A Case Study Of The Fast-Food Industry In New Jersey And Pennsylvania.

३. Imbens Guido, 2009, Better LATE than Nothing : Some comments on Deaton (2009) and Heckman and Urzua (2009) NBER Working Paper 14896

४. Imbens Guido W. and Jeffrey M. Wooldridge, 2009, Recent development in the Econometrics of Program Development Journal of Economic Literature, 47(1) : 5-86

५. Joshua D. Angrist And Alan B. Krueger, Does Compulsory School Attendance Affect Schooling And Earnings?, The Quarterly Journal Of Economics Vol. Cvi November 1991 Issue 4.

६. Meyer, Bruce D., 1995, Natural and Quasi - Experiment in Economics, Journal of Business and Economic Statistics, 13(2):151-61.

७. Rosenzweig Mark R. and Kenneth I. Wolphin, 2009, Natural Experiments in Economics, Journal of Economic Literature, 38(4): 827-74.

८. The Economics Times, 11/10/2021.

९. The Indian Express, 11/10/2021.

१०. https://www.nobelprize.org/prizes/lists/all-prizes-in-economic-sciences/

११. https://theconversation.com/amp/nobel-winner-david-card-shows-immigrants-dont-reduce-the-wages-of-native-born-workers-169768.

१३. दैनिक महाराष्ट्र टाइम्स, दिनांक ११/१०/२०२१.

१२. दैनिक लोकसत्ता, दिनांक ११/१०/२०२१.


◆

भारत अत्यंत गरीब लोकांमध्ये रहात असलेला श्रीमंत देश.

**- मनमोहन सिंग**

# वि. म. दांडेकर : आदर्श अर्थशास्त्री

**संतोष दास्ताने** †

**दांडेकर - व्यक्ती व व्यक्तित्व**

विख्यात अर्थतज्ज्ञ आणि मराठी अर्थशास्त्र परिषदेचे संस्थापक-सदस्य तसेच माजी अध्यक्ष प्रा. विनायक महादेव दांडेकर यांची जन्मशताब्दी २०२० साली साजरी झाली. (जन्म ६ जुलै, १९२० - मृत्यू ३१ ऑगस्ट, १९९५). काहीशा विलंबाने का होईना, पण त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची व कामगिरीची दखल घेणे उचित होईल. आजच्या काळाच्या संदर्भात त्यांच्या योगदानाचे व विचारांचे पुनरावलोकन करावे आणि त्यांची समर्पकता या निमित्ताने अधोरेखित करावी यासाठी हा लेखन प्रपंच. त्यांना ७५ वर्षांचे आयुष्य लाभले. त्यांचे कर्तृत्व बहरले ते साधारणपणे १९५० ते १९९५ या दरम्यान.

पुणे येथील गोखले अर्थशास्त्र आणि राज्यशास्त्र संस्थेत त्यांनी १९४५ साली संशोधक-सहायक म्हणून प्रवेश केला. तेव्हा प्रा. धनंजयराव गाडगीळ संस्थेचे संचालक होते. त्यांच्यानंतर १९६६ पासून पुढे तेरा वर्षे प्रा. दांडेकर तेथे संचालक होते. निवृत्तीनंतर तेथेच ते सुप्रतिष्ठ प्राध्यापक म्हणून कार्यरत होते. पुणे विद्यापीठाचे (नवीन नाव - सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ) सामाजिक शास्त्र विद्याशाखेचे ते अधिष्ठाता होते. तेव्हा गोखले अर्थशास्त्र संस्था म्हणजे पुणे विद्यापीठाचा अर्थशास्त्र विभाग समजला जात असे. त्यामुळे ते विद्यापीठाच्या अर्थशास्त्र विभागाचे पदसिद्ध प्रमुख होते. आम्हा विद्यार्थ्यांना त्यांच्यासमोर जाताना भीती आणि आदर अशा दोन्ही भावना असत. एम. ए. चा विद्यार्थी असताना कुठल्या  तरी फॉर्मवर विभाग प्रमुख म्हणून त्यांची सही घ्यायला मी गेलो होतो. माझा अर्ज वाचता वाचता माझ्या अभ्यासाची त्यांनी चौकशी केली, वाचायला एक-दोन पुस्तके सुचवली आणि बोलताना माझ्या अर्जातील स्पेलिंगची एक चूकही दुरुस्त केली! त्यांनी आम्हाला कोणता पेपर शिकवला नाही, पण त्या वर्षीच्या अंदाजपत्रकानंतर त्याचे विश्लेषण (खरे तर चिरफाड) करणारे एक तासाभराचे रसाळ व्याख्यान आमच्या वर्गाला दिल्याचे मला आठवते आहे. अंदाजपत्रकातील ओळी-ओळींमधील अदृश्य मजकूर कसा वाचावा, आकडेवारीतील गफलती कशा शोधाव्यात, त्यातील राजकारण कसे ओळखावे, अंदाजपत्रकाचा व्यावहारिक अर्थ कसा लावावा हे सर्व त्यांनीच करावे. तरुण वयात ते काही काळ राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सदस्य होते, पण संघाशी त्यांचा संबंध फार काळ टिकला नाही. जन्मभर ते खादीचे कपडे व त्यावर जाकीट घालीत. किडकिडीत शरीरयष्टी,

† माजी अध्यक्ष व माजी विश्वस्त - मराठी अर्थशास्त्र परिषद,
आजीव सभासद क्र. ६३, भ्रमणध्वनी : ९८२२००९९५४, ई-मेल : santosh.dastane@gmail.com

बुटकी मूर्ती, छातीपर्यंत रुळणारी दाढी आणि भेदक नजर असे भारदस्त व्यक्तिमत्त्व... यामुळे त्यांची एक निराळी अशी छाप पडत असे.

लौकिकार्थाने पाहता अर्थशास्त्र हा प्रा. दांडेकरांचा विषय नव्हताच. त्यांचे सर्व शिक्षण संख्याशास्त्र या विषयातील. कोलकात्याच्या प्रसिद्ध भारतीय संख्याशास्त्र संस्थेचे ते विद्यार्थी. प्रशांतचंद्र महालनोबीस या ख्यातनाम संख्याशास्त्रज्ञाचे ते शिष्य. तेथील पदव्युत्तर शिक्षणात सुवर्णपदकाचे मानकरी. ते संपल्यानंतर पुढे लंडन विद्यापीठामध्ये पीएच. डी. साठी त्यांना प्रवेश मिळाला होता. पण भारतीय विद्यार्थ्यांना मिळत असलेल्या सापत्न वागणुकीच्या निषेधार्थ त्यांनी तो प्रवेश घेतला नाही. औपचारिक पीएच. डी. पदवी त्यांच्या नावावर नाही, पण पुढे भविष्यात त्यापेक्षाही मोलाचे संशोधन, त्या पदवीला मार्गदर्शन आणि अनेक विद्यापीठांच्या पदवी प्रदान प्रसंगी केलेले दीक्षान्त भाषण अशा एकसे बढकर एक गोष्टी मात्र घडून आल्या. पीएच. डी. पदवीसाठी प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांची त्यांनी एक सोपी परीक्षा घेतली होती. अगदी प्राथमिक अंकगणिती व सांख्यिकी कौशल्याबाबत त्यांचे अज्ञान कसे दिसून आले ते त्यांनी एका शोधनिबंधात वर्णन केले आहे. तो शोधनिबंध जरूर वाचावा.[१] या पदवीची घटती गुणवत्ता का दिसते याचे नेमके रोगनिदान त्यांच्या त्या लेखनात दिसते. हा अनुभव १९६१ सालातील. आज साठ वर्षांनंतर त्या आघाडीवरील परिस्थिती सुधारली का आणखी बिघडली याचे उत्तर प्रत्येकाला मनातून माहीत आहे.

नागपूर येथे १९७८ मध्ये पार पडलेल्या मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या दुसऱ्या वार्षिक अधिवेशनाचे ते अध्यक्ष होते. परिषदेची स्थापना आणि वाढ - विस्तार यात ज्यांनी पुढाकार घेतला त्यात प्रा. नी. वि. सोवनी, डॉ. श्री. आ. देशपांडे, डॉ. वि. वि. बोरकर, गोवर्धन पारेख अशी नावाजलेली मंडळी होती. दांडेकरही त्यात आघाडीवर होते. काही तुरळक वार्षिक अधिवेशनांना त्यांची उपस्थिती होती. परंतु नंतर इतर कामाच्या रेट्यामुळे परिषदेच्या कामात ते सहभागी होऊ शकले नाहीत, याची खंत ते आपल्या सहकाऱ्यांकडे व्यक्त करीत.

**दांडेकर - वक्ता, संशोधक, लेखक**

कृषी अर्थशास्त्र या क्षेत्रात दांडेकरांची बहुमोल कामगिरी आहे. त्यात त्यांचे संशोधन, अध्यापन, मनन, चिंतन, लेखन, प्रकाशने आहेत. पण अर्थशास्त्रच काय, सामाजिक क्षेत्रातील कोणतीही शाखा त्यांना वर्ज्य नव्हती. त्यांनी हाताळलेल्या विषयांचा आवाका पाहता त्यांच्या विद्वत्तेची व्यापकता आणि सखोलता ध्यानात येते. त्यांच्या चिंतन - व्याख्याने - लेखन यांचे विषय साधारणपणे असे होते : विकासाचे अर्थशास्त्र, भारतीय अर्थव्यवस्था, महाराष्ट्राची अर्थव्यवस्था, सार्वजनिक वित्तव्यवहार, प्रादेशिक समतोल, आर्थिक नियोजन, मौद्रिक धोरण, मध्यवर्ती बँक, वेतन आयोग, आर्थिक धोरण, रोजगार, बेरोजगारी, विषमता, जलसिंचन, बँक व्यवसाय, विकेंद्रीकरण, पशुधनाचे अर्थशास्त्र, उच्च शिक्षण, सहकार, गांधीवादी अर्थशास्त्र, परीक्षा सुधार, औद्योगिक वित्तपुरवठा, ग्राहक चळवळ, अंदाजपत्रके, भारतीय संविधान, असंघटित कामगार, केंद्र-राज्य संबंध, कृषी विकास, किंमत धोरण, शेतमालाचे विपणन, जमीन सुधारणा कायदे, सामाजिक संशोधनशास्त्र, ग्रामीण विकास, नागरीकरण, कुपोषण, पीकविमा इ. इ. आंतरविद्याशाखीय अभ्यास ही संज्ञा आजकाल लोकप्रिय झालेली आहे. पण दांडेकरांनी पन्नास वर्षांपूर्वीपासून आंतरविद्याशाखीय क्षेत्रात कामगिरी करून आपला अमीट ठसा उमटवला होता. त्यांचे सहकारी आणि सहसंशोधक डॉ. नीळकंठ रथ यांनी दांडेकरांच्या कामगिरीवर विस्तृत आणि विश्लेषणात्मक लेख लिहिला आहे.[२] त्यात त्यांनी मोठ्या परिश्रमाने दांडेकरांच्या इंग्रजीतील सर्व लेखनाची एक समग्र सूची शेवटी समाविष्ट केली आहे. प्रा. रथ सरांनी

केलेल्या या बहुमोल दस्तावेजीकरणामुळे अर्थशास्त्राचे संशोधक - अभ्यासक त्यांचे सदैव ऋणी राहतील. दांडेकरांनी मराठीतही विपुल लेखन केले आहे. पण त्यांच्या मराठीतील अशा लेखनाची एकत्रित सूची मात्र उपलब्ध नाही.

भारतीय कृषी अर्थशास्त्र परिषदेचे ते अध्यक्ष होते, या परिषदेच्या एका वार्षिक अधिवेशनाचे अध्यक्षपदही त्यांनी भूषविले होते. भारतीय अर्थशास्त्र परिषद, भारतीय अर्थमीतिशास्त्र परिषद, भारतीय श्रम अर्थशास्त्र संस्था यांच्या वार्षिक अधिवेशनांचे अध्यक्षपद देखील त्यांनी भूषविले होते. राष्ट्रीय नमुना पाहणी परिसंस्थेचे ते दहा वर्षे अध्यक्ष होते. भारतीय सामाजिक शास्त्र परिषदेने त्यांना 'नॅशनल फेलो' असा बहुमान दिला होता. विद्यापीठ अनुदान मंडळाने त्यांना प्रणवानंद सरस्वती हा मानाचा पुरस्कार प्रदान करून त्यांचा गौरव केला होता. केंद्र आणि राज्य पातळीवरील अनेक समित्या आणि अभ्यास गटांचे ते अध्यक्ष / सदस्य होते. महाराष्ट्र शासनाच्या निरनिराळ्या बारा समित्यांवर अध्यक्ष, सदस्य, सल्लागार या नात्याने ते कार्यरत होते. सन १९७० मध्ये त्यांनी पुणे येथे भारतीय अर्थविज्ञान वर्धिनीची स्थापना केली आणि तिचे ते संस्थापक - अध्यक्ष व नंतर संचालक होते. गोखले अर्थशास्त्र संस्था आणि भारतीय अर्थ विज्ञान वर्धिनी या संस्थांची जी संशोधन नियतकालिके होती, त्यांचे ते प्रमुख संपादक होते.

ते सुरुवातीस गांधींच्या विचारांकडेही आकर्षित झाले होते. पण नंतर त्यांनी गांधींच्या तत्त्वज्ञानातील अनेक मुद्यांवर प्रश्न उपस्थित केले होते. त्यांनी 'गांधीवादाची शोकांतिका' अशा शीर्षकाचा लेख लिहून गांधीवादाचे परखड विश्लेषण केले होते.[३] वस्तुनिष्ठ भूमिका घेऊन व्यापक अशा सामाजिक, आर्थिक परिमाणांचा सतत वेध घेणे, विकासशील दृष्टिकोन ठेवणे ही त्यांची विचारसरणी बनून गेली होती. तिचा येथे प्रत्यय येतो. त्यांची कार्यपद्धती देखील या भूमिकेनुसार बेतलेली होती. कोणत्याही गोष्टीचा स्वतः अभ्यास करून पिच्छा पुरवणे, तिचा ध्यास घेणे हा त्यांचा खाक्या! वरवर विसंगत वाटेल, पण फलज्योतिषाचा संख्याशास्त्रीय दृष्टिकोनातून त्यांचा गाढा अभ्यास होता. सुमारे २५,००० कुंडल्यांचे शास्त्रशुद्ध विश्लेषण करून त्यावर पीएच. डी. पदवीची तयारी त्यांनी चालवली होती. पण तो योग बहुधा त्यांच्या कुंडलीत नव्हता! मात्र म. दा. आणि व. दा. भट या दोन भावांनी लिहिलेल्या कुंडली संग्रहाला दांडेकरांनी मर्मग्राही प्रस्तावना लिहिली आहे.[४]

प्रा. दांडेकर किती रूपाने आपल्यासमोर आलेले आहेत हे पाहून आपण विस्मयचकित होतो. त्यांनी लिहिलेली इंग्रजी, मराठीतील पुस्तके, समित्यांचे अहवाल, व्याख्याने, पुस्तकांच्या प्रस्तावना, शोधनिबंध, दीक्षान्त भाषणे, उद्‌घाटनपर भाषणे, बीज भाषणे, समारोपाची भाषणे, अध्यक्षीय भाषणे, स्पष्टीकरणात्मक लेख, टिपणे, पुस्तक परीक्षणे, प्रतिक्रियात्मक लेख, स्वतंत्र लेख, पत्रव्यवहार अशा विविध रूपाने त्यांची वाणी आणि लेखणी समाजापुढे चार दशकांहून अधिक काळ तळपत राहिली. देश-विदेशातील प्रतिष्ठेच्या संशोधनपर नियतकालिकांपासून दैनिक वृत्तपत्रापर्यंत सर्वत्र त्यांचे लेखन दिसून येई. 'साध्या वृत्तपत्रासाठी मी कशाला लिहीत बसू?' असा वृथा अहंभाव त्यांच्यात नव्हता. त्यांच्या वाचकवर्गात विद्वान संशोधक - अभ्यासकांपासून सामान्य नागरिक, कामगार, शेतकरी, विद्यार्थी, कार्यकर्ते, राजकीय नेते असे समाजातील सर्व थरांतील लोक असत. भाषा इंग्रजी असो वा मराठी, वाचकाला किंवा श्रोत्याला समजेल अशा सुबोध व सोप्या रितीने त्यांचे निरूपण असे. अवघड विषय सोप्या भाषेत कसा मांडावा हे त्यांच्याकडून शिकावे. विनोद, थट्टा, वक्रोक्ती, कोटीबाजपणा, फटकळपणा, सडेतोडपणा असे सर्व गुण त्यांच्यात मुळातच होते. त्यामुळे श्रोत्यांशी, वाचकांशी त्यांचा संवाद चटकन साधला जात असे.

स्वच्छ अर्थवाही भाषा, छोटी वाक्ये आणि विषयावरील घट्ट पकड यामुळे श्रोत्यांशी त्यांच्या तारा सहज जुळत असत. आळस, ढिलेपणा, चालढकल, 'चलता है' वृत्ती याचा त्यांना तिटकारा होता. दांडेकरांच्या स्वभावाचे आणि व्यक्तिमत्त्वाचे काही अनोखे पैलू डॉ. प्रदीप आपटे यांनी एका ताज्या लेखात मांडले आहेत.[५]

गोखले अर्थशास्त्र संस्थेच्या सुवर्ण महोत्सवानिमित्त १९८० साली एकूण चार अखिल भारतीय संस्थांची वार्षिक अधिवेशने संस्थेत एकाच वेळी त्यांनी भरवली. त्यात सदस्य आणि स्वयंसेवक म्हणून आम्ही तरुण प्राध्यापक सहभागी झालो होतो. संस्थेचे संचालक असलेले दांडेकर त्या सोहळ्याचे यजमान. त्यांचे कुशल नियोजन व नेटके व्यवस्थापन आम्हाला जवळून पहायला आणि अनुभवायला मिळाले.

प्रा. दांडेकरांचे वर्णन एक पूर्ण पण बंडखोर अर्थशास्त्री असे करावे लागेल. पुस्तकी पंडित असलेला कोणी प्राध्यापक अर्थशास्त्रातील एखाद्या विषयावर संशोधन करून, पीएच. डी. सारखी पदवी मिळवून सामान्यपणे तेथे थांबेल. दांडेकरांचे खरे काम अशा टप्प्यावरून सुरू होई. संशोधनाचे निष्कर्ष लोकांसमोर आणणे, त्याची चर्चा करणे हे त्या प्रक्रियेचा अभिन्न भागच समजत असत. गंभीर भाषेतील संशोधनपर लेखापासून व्याख्यान, चर्चेसाठी टिपण, वृत्तपत्रातील सामान्य वाचकांसाठीचा लेख, निवेदन, पत्रव्यवहार अशा विविध स्वरूपांत कोणताही विषय जनतेसमोर आणण्यासाठी त्यांचा आटापिटा असे. व्याख्यानमाला, चर्चासत्रे, परिसंवाद, अभ्यास गट येथे त्यांचा संचार असे. त्यांच्या अर्थविज्ञान वर्धिनी या संस्थेमार्फत लोणावळा (जि. पुणे) येथे १९७० नंतर त्यांनी अनेक परिसंवाद, गटचर्चा, चर्चासत्रे, मार्गदर्शन वर्ग, प्रशिक्षण वर्ग उत्साहाने आयोजित केले होते. मात्र, देशात १९७५ मध्ये लादलेल्या आणीबाणीनंतर हे उपक्रम थंडावले. आणीबाणीला त्यांनी स्पष्ट विरोध केला होता हेही जाता जाता सांगितले पाहिजे. रुपयाचा विनिमय दर, सरकारचे कर प्रस्ताव, किंमतवाढ, बेरोजगारी, अर्थसंकल्प, तेजी-मंदी अशा दैनंदिन विषयांवर ते मुद्देसूद आणि प्रभावी विश्लेषण करीत. विषयातील मर्माला बाधा येऊ न देता तो सोप्या पद्धतीने कसा फुलवावा याचा तो वस्तुपाठ असे. अर्थशास्त्र हे सामाजिक शास्त्र आहे, हे पुस्तकातच न ठेवता ते समाजापर्यंत नेण्यासाठी त्यांनी सतत धडपड केली. त्यांचा मूळ पिंड संख्याशास्त्रज्ञाचा. त्यामुळे सांख्यिकी माहितीचे संकलन, माहितीची गुणवत्ता, माहितीत आढळून येणारे कल, त्या संकलनातील प्रमाद, त्यातील अनुमाने, नंतरचे सामान्यीकरण, त्यातून सूचित होणारे धोरण, त्याची कठोर चिकित्सा, अनेक घडामोडींचा पूर्वअंदाज असे पुढचे टप्पे पार करण्यातील त्यांचे कौशल्य वादातीत होते. यामुळे फक्त आर्थिक सिद्धान्त किंवा फक्त आर्थिक धोरण असे त्यांचे सूक्ष्म विशेषीकरण नव्हते. सिद्धांतापासून धोरणापर्यंत सलग असे तर्कशुद्ध विवेचन करण्यात एक सेंद्रिय सुसंगती आढळून येई. प्राथमिक-दुय्यम सांख्यिकी माहितीवर आधारित विषयांवर विवेचन करताना त्यांच्या लेखणी-वाणीला वेगळीच धार चढे. राष्ट्रीय उत्पन्न, बेरोजगारीची आकडेवारी, पंचवार्षिक योजना, देशातील गरिबी, कुपोषण यावर भाष्य करताना त्यांचे असे कसब दिसत असे. त्यांच्या अशा टीकात्मक विश्लेषणाची कितीतरी उदाहरणे देता येतील. हाताशी असलेले एक उदाहरण म्हणजे १९७८ साली म. अ. परिषदेच्या वार्षिक अधिवेशनातील अध्यक्षीय भाषणात त्यांनी सहाव्या पंचवार्षिक योजनेच्या मसुद्यावर केलेले सडेतोड भाष्य.[६] त्या भाष्याचा टीकात्मक गोषवारा एका लेखात उपलब्ध आहे.[७]

आपल्या करिअरच्या सुरवातीलाच त्यांनी १९५० च्या दशकामध्ये राष्ट्रीय नमुना पाहणीच्या उपक्रमामध्ये एक अधिक तर्ककठोर आणि त्यातल्या त्यात निर्दोष अशी पद्धती मांडून आपली बुद्धिमत्तेची चुणूक दाखवली

होती. त्या वेळेस त्यांचे गुरू व नमुना पाहणी संघटनेचे अध्यक्ष प्रा. महालनोबीस यांच्या विरोधात त्यांना उभे राहावे लागले. माहिती संकलित करण्यासाठी जी अनुसूची महालनोबीस वापरत होते त्यापेक्षा दांडेकरांची अनुसूची अधिक उपयुक्त ठरली. सामाजिक पाहणी विषयात ती 'पुणे अनुसूची' या नावाने प्रसिद्ध आहे.[८]

वाद-विवाद, टीका-प्रतिटीका असे त्यांचे अनेकांबरोबर सामने झाले. जशी टीका केली तशी त्यांनी टीका झेलली देखील. त्यांची टीका ही केवळ टीकेकरिता टीका नसे. त्या वादविवादात आंतरिक तळमळ, अभ्यास आणि व्यासंग यांचा प्रत्यय येई. त्या खेळात वाचकांना भरपूर वैचारिक खाद्य मिळत असे. आर्थिक, सामाजिक विषयांचा विचार करताना कोणकोणत्या पैलूंचे भान ठेवावे, अनेक घटनांचा कसा अर्थ लावावा अशा गोष्टी त्या वैचारिक लढाईतून शिकता येत असत. अशी सकारात्मक वैचारिक देवाणघेवाण व शिस्तबद्ध विचारमंथन आता दुर्मीळ होत चालले आहे, असे जाणवत राहते.

दांडेकरांचे वर्णन नेमके कसे करता येईल हे कोडेच आहे. संख्याशास्त्रज्ञ, अर्थशास्त्री, संशोधक, व्याख्याता, प्राध्यापक, लेखक, संपादक, टीकाकार, भाष्यकार, प्रशिक्षक, शिक्षणतज्ज्ञ, विश्लेषक, समुपदेशक, मार्गदर्शक, धोरणकर्ता, प्रशासक अशा विविधांगी भूमिका त्यांनी आत्मीयतेने, कुशलतेने आणि तितक्याच प्रभावीपणे पेलल्या. दांडेकर म्हणजे फक्त आकडेवारीच्या कसरती आणि वादविवादाची खुमखुमी असे कोणी मानले तर ते अन्यायाचे ठरेल. त्यांचे सर्व विषयांवरील विवेचन हे आर्थिक सिद्धांतांच्या भक्कम पायावर उभे असे. आर्थिक धोरण ठरवण्यासाठी आर्थिक सिद्धान्त कसे अपुरे पडतात हे त्यांनी १९५६ सालीच एका शोधनिबंधात दाखवून दिले होते.[९] त्यांनी १९७९ साली कोलकाता येथे आर. सी. दत्त स्मृती व्याख्यानमालेत व्याख्याने दिली. त्यात विदेशी व्यापाराचे आर्थिक सिद्धांत, त्यामागील वासाहतिक विचार आणि व्यापार धोरण याचे तर्कशुद्ध विश्लेषण होते.[१०] सेवानिवृत्तीनंतर उत्पन्न वाटप आणि न्यूमन - स्राफा यातील परस्पर संबंधांचा अभ्यास त्यांनी चालवला होता.

आर्थिक - सामाजिक विषयांवरील त्यांची पंधराहून अधिक पुस्तके व दीडशेहून अधिक लेख अशी विशाल कामगिरी पाहता त्यांचे निवडक असे योगदान सांगणे खरे पाहता अवघड आहे. पण पुढील प्रमुख प्रकाशने त्यांचा अतुलनीय व्यासंग आणि सखोल चिंतन दाखवण्यास पुरेशी आहेत :

प्रा. दांडेकर आणि त्यांचे सहकारी-सहसंशोधक डॉ. नीळकंठ रथ यांनी मिळून केलेला भारतातील दारिद्र्य हा अत्यंत गाजलेला संशोधन-अभ्यास (१९७१). गरिबीचे मापन, गरिबीची ग्रामीण-शहरी अशा परिमाणातून केलेली व्याख्या, त्यावरील उपाययोजना - धोरण हे सगळेच त्या काळी नवीन होते. त्यासाठी त्यांनी उत्पन्नाऐवजी खर्च हा पाया घेतला व उष्मांक हे मापन वापरले. त्यानंतर गरिबी या विषयावर पुन्हा अनेक अभ्यास झाले, होत आहेत. पण या अभ्यासाचे अनोखे महत्त्व आहे.[११] गरिबी आणि बेरोजगारी यांचे निर्मूलन यांचा वेगळा वेगळा विचार केल्याने दोन्हीपैकी काहीच साध्य होत नाही, असे त्यांनी पूर्वीपासून म्हटले होते. त्यामुळे गरिबी दूर करण्यासाठी व्यापक पातळीवर रोजगारी वाढवणे असा समन्वित विचार त्यांनी मांडला. त्यातून १९७२-७३ या वर्षी महाराष्ट्रात रोजगार हमी योजना सुरू झाली, तसा कायदा १९७९ साली लागू करण्यात आला. त्यानंतर हीच योजना केंद्र सरकारने म. गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना अशा नावाने २००५ नंतर देशभर लागू केली. दांडेकरांच्या दूरदृष्टीने केलेल्या विचाराचा हा विजयच आहे.

महाराष्ट्रातील प्रादेशिक असमतोलावरील सत्यशोधन समितीचा अहवाल - अध्यक्ष : प्रा. दांडेकर (१९८४). जिल्हा हा पायाभूत घटक मानून रस्ते, सिंचन व्यवस्था,

प्राथमिक शिक्षण अशा २८ गमकांची सविस्तर माहिती गोळा करून राज्यातील विकासाचा एकूण अनुशेष - विदर्भ, मराठवाडा, कोकण, पश्चिम महाराष्ट्र असा विभागवार त्यांनी मोजून दाखवला, त्यावर उपाययोजनाही सुचवली.[१२]

दांडेकरांनी स्वतःचे इंग्रजीतील विविध विषयांवरील निवडक लेखन एकत्र करून आणि त्याचे संपादन करून ते तीन खंडांमध्ये प्रसिद्ध करण्याचा प्रकल्प हाती घेतला होता. मात्र त्यांच्या हयातीत ते दोनच खंड पुरे करू शकले. पहिल्या खंडात कृषी विषयातील त्यांचे लेखन आहे, तर दुसऱ्या खंडात लोकसंख्या, गरिबी आणि रोजगार या विषयावरील त्यांचे लेखन एकत्र केलेले आहे.[१३]

आपली अगदी निराळी आणि धक्कादायक मते मांडणे यात दांडेकरांना विशेष रस होता. पशुधनाबद्दल त्यांनी सखोल अभ्यास करून आणि बहुमोल आकडेवारी गोळा करून १९६० नंतर बरेच लेखन केलेले दिसते. 'भाकड ठरणाऱ्या जनावरांची कत्तल करावी' या त्यांच्या मताने सर्वत्र खळबळ उडवून दिली होती. त्यासाठी त्यांचे पशुधनाचे अर्थशास्त्र हे पुस्तक पहावे.[१४]

ग्रामीण भारतातील आणि त्यातही महाराष्ट्रातील सामाजिक - आर्थिक वास्तवाचा वेध घेणे आणि त्यातून चिरस्थायी परिवर्तन-विकास कसा घडून येऊ शकेल याचा समतोल व एकत्रित विचार त्यांनी अतिशय मार्मिक रितीने मांडला आहे. तेथे त्यांचे सूक्ष्म निरीक्षण आणि आकलन प्रत्ययास येते. त्यांची ती दोन पुस्तके वाचण्यासारखी आहेत.[१५]

### दांडेकर - अनोखे विषय

दांडेकरांनी अगदी अपारंपरिक विषय सहजतेने हाताळले. तसेच पारंपरिक विषयावरील आपली अपारंपरिक मते सुगम, प्रवाही आणि आक्रमक शैलीत लोकांपुढे आणली. त्यांची पूर्ण यादी देणे येथे शक्य नाही, पण एक-दोन उदाहरणे देणे सयुक्तिक ठरेल. सरकारने जमीन सुधारणा कायद्यांमध्ये 'कमाल जमीन धारणा' याचा समावेश करून कृषी विकासाला चालना दिली. महाराष्ट्र राज्याने हा कायदा १९६२ साली संमत केला व १९७५ साली कमाल मर्यादा आणखी कमी केली. जलद कृषी विकास, सामाजिक न्याय यासाठी हे आवश्यक होते असे याच्या समर्थनार्थ म्हटले गेले. एका अर्थाने ते बरोबरही होते. पण त्याचा दीर्घ काळात काय परिणाम होऊ शकतो याचा तितकासा अंदाज घेतला गेला नाही. कमाल जमीन धारणा कायद्यानंतर लोकसंख्येचा कृषी क्षेत्रावरील दबाव, वाढती लोकसंख्या, सतत होणारे जमीन धारणेचे तुकडीकरण, कृषी क्षेत्रातील नवनवीन तंत्रज्ञान अशा घडामोडींमुळे शेतांचा असा आक्रसणारा आकार ही एक डोकेदुखीच ठरेल असे त्यांनी प्रतिपादन केले.[१६] उलट कमाल जमीन धारणेची मर्यादा टप्प्याटप्प्याने वाढवत न्यावी, अशी त्यांची सूचना होती. शेत जमिनीची खरेदी-विक्री, लीज, भाडेपट्टा यावरील निर्बंध हटवावेत, लघु व सीमान्त शेतकऱ्यांनी वापराखालील जमिनीचा आकार वाढवावा, त्यासाठी सवलती - उत्तेजन असावे असे त्यांनी म्हटले. कारण यामुळेच शेतीतील नवे तंत्र, वाढीव उत्पादनाचे फायदे हे मिळू शकेल. वेगळ्या भाषेत सांगायचे म्हणजे कमाल जमीन धारणा कायदा असण्याऐवजी किमान जमीन धारणा कायदा असावा असे ते सुचवतात. हा मुद्दा क्रांतिकारक खराच, पण आजपर्यंत या दिशेने फारसा विचार झाला नाही, ही खेदाची गोष्ट आहे.

उभी हयात शिक्षण क्षेत्रात काढल्यानंतर शिक्षण या विषयावर त्यांची स्वतःची काही निराळी मते असणार हे ओघाने आलेच. पुणे विद्यापीठात १९९१ साली त्यांनी दुभाषी स्मृती व्याख्यानमालेत व्याख्यान दिले. ते नंतर प्रसिद्धही झाले.[१७] त्यांच्या या व्याख्यानास थेट ॲडम स्मिथ याच्या मूळ पुस्तकांचा त्यांनी आधार घेतला.

**त्यांच्या विवेचनातील काही मुद्दे** : शिक्षकाचा पगार मुख्यतः विद्यार्थ्यांच्या फीमधून भागवला जावा,

विद्यार्थ्याला आपले महाविद्यालय - आपला अभ्यासक्रम - आपले शिक्षक निवडण्याची मुभा असली पाहिजे, महाविद्यालयातील / विद्यापीठांमधील शिक्षकांमध्ये स्पष्ट उत्तरदायित्व असले पाहिजे, विद्यार्थ्यांनी आपल्या अभ्यासाबद्दल अधिक जबाबदारी आणि जागरूकता दाखवली पाहिजे इ. त्यांची ही अनोखी मते शिक्षक, विद्यार्थी आणि समाज यांना काही प्रमाणात का होईना, विचार करायला लावतील हे निश्चित.

देशातील केंद्र आणि राज्य सरकारे यांच्यातील संबंध हा नेहमीच सगळ्यांचा चर्चेचा व चिंतेचा विषय राहिला आहे. दांडेकरांनी त्यावरही अनेकदा विवेचन केले आहे. त्यातील एक उदाहरण येथे थोडे तपशिलात पाहू. ऑगस्ट १९८७ मध्ये तिरुअनंतपुरम येथील गांधी अभ्यास केंद्र येथे एका चर्चासत्रात त्यांनी केंद्र-राज्य संबंधांवर बीज भाषण दिले. सरकारचे आर्थिक व्यवहार, प्रशासन, भारताचे संविधान या पैलूंना स्पर्श करणारे हे भाषण रोखठोक आणि तलस्पर्शी आहे.[१८] आता नियोजन मंडळ आणि पंचवार्षिक योजना हे दोन्ही बरखास्त झाले. पण त्या काळी नियोजन मंडळ आणि पंचवार्षिक योजना यांचा प्रभाव होता. म्हणून सुरुवातीलाच त्यांनी वित्त आयोग आणि नियोजन मंडळ यांच्या कामकाजातील संरचनात्मक अंतर्विरोध स्पष्ट केला आहे. वित्त आयोग देशात संघराज्यात्मक व्यवस्था टिकवू पाहतो, तर पंचवार्षिक योजनांचा कार्यक्रम केंद्राच्या धोरणाभोवती आणि कृतीभोवती फिरतो. संविधानानुसार देशात सर्व प्रशासकीय - वित्तीय - वैधानिक सत्ता केंद्राकडे झुकलेली आहे. अशा व्यवस्थेमुळे केंद्रावर अवास्तव असे वित्तीय-प्रशासकीय ओझे पडत आहे, तर राज्ये मात्र हळूहळू कमकुवत होत चालली आहेत. केंद्राने फक्त महत्त्वाच्या बाबींवर लक्ष केंद्रित करावे व इतर सर्व बाबतीत राज्यांना स्वायत्तता द्यावी... प्रशासनाच्या सोयीसाठी राज्यांचा आकार लहानच असावा, दहा जिल्हे वा १ ते २ कोटी लोकसंख्या यासाठी एक एक निराळे राज्य असावे, आर्थिक-वित्तीय-प्रशासकीय प्रश्न केंद्रस्थानी ठेवून पुन्हा नवा राज्य पुनर्रचना आयोग नेमला जावा, संविधानातील सातव्या अनुसूचीचा पुनर्विचार व्हावा, अशी मते त्या लेखात त्यांनी साधार मांडली आहेत. योगायोग असा की, त्यानंतर पंधराव्या वित्त आयोगाचे अध्यक्ष नंदकिशोर सिंह यांनी आपल्या अहवालात २०२१ साली संविधानातील सातव्या अनुसूचीसंबंधी नेमके असेच मत व्यक्त केलेले आढळते.[१९] याचा अर्थ, आज भासणारी गरज दांडेकरांनी चौतीस वर्षांपूर्वीच ओळखली होती!

**दांडेकर आणि वादविवाद**

दांडेकर आणि वादविवाद हे त्या काळी अतूट समीकरण बनून गेले होते. अमर्त्य सेन यांच्या व्याख्येत बसणारे ते खरे 'वादविवादपटू भारतीय' होते. अनेक व्यक्तींशी आणि विचारधारांशी त्यांचे झालेले वाद म्हणजे त्यांचा त्या त्या मुद्यावरचा सखोल अभ्यास, सुस्पष्ट आकलन, आर्थिक सिद्धान्त व सांख्यिकी माहिती यांची पक्की बैठक आणि मुख्य म्हणजे केव्हाही हार न मानणारी आक्रमक, लढाऊ वृत्ती या सर्वांचा परिपाक होता. बहुतेक वेळेस या वादांमधून तो विषय अधिक पारदर्शी होत गेला आणि जी काही थोडीफार संदिग्धता-अस्पष्टता-अपूर्णता असेल तीही दूर झाली असा अनुभव येत गेला. त्यांचे सहकारी, विद्यार्थी, सहलेखक, संपादक, वाचक वर्ग आणि एकूणच समाज यांनी हे वादविवाद सकारात्मक रितीने घेतले. कोणाशीच त्यानंतर कटुता वा वैरभाव राहात नसे. महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेवरील पुस्तक प्रकाशन प्रसंगीच्या भाषणात त्यांनी यशवंतराव चव्हाण यांच्या समक्ष राज्याच्या राजकीय नेतृत्वावर टीका केली. त्यावर बऱ्याच काळ उलट-सुलट प्रतिक्रिया येत राहिल्या. अनेक खुलासे-प्रतिखुलासे झाले. परंतु याच दांडेकरांना सरकारने दहा वर्षांनंतर प्रादेशिक असमतोलाचा अभ्यास करणाऱ्या सत्यशोधन समितीचे अध्यक्ष नेमले. त्यामुळे संशोधकांना एक अनमोल

दस्तावेज मिळून गेला. त्याआधी दांडेकर आणि महालनोबीस यांच्या वादातून 'पुणे अनुसूची'चा जन्म झाला आणि संशोधकांना प्राथमिक माहिती संकलनासाठी एक नवीन साधन मिळाले. गरिबीवरील अभ्यासाच्या वेळी डॉ. पां. वा. सुखात्मे यांनी दांडेकरांच्या संशोधन पद्धतीवर आणि निष्कर्षांवर काही आक्षेप घेतले होते. दांडेकरांनी त्याचा प्रतिवाद केला. सांख्यिकी विश्लेषणातील सूत्रे, त्यांचा अर्थ, त्यांचे उपयोजन, त्यापासून निघणारे निष्कर्ष याबद्दल त्यांच्यातील वैचारिक विनिमयातून वाचकाला कितीतरी नवीन शिकायला मिळाले. शुल्त्झ हा नोबेल स्मृती पुरस्कार मिळालेला विख्यात अर्थतज्ज्ञ आहे हे खरे. पण त्याच्या कृषी अर्थशास्त्रावरील गाजलेल्या पुस्तकातील अनेक गृहिते अवास्तव व चुकीची होती, हे दांडेकरांनी निर्भीडपणे सिद्ध केले. 'महाराष्ट्राला ऊसशेती परवडणारी नाही, त्यात पाण्याची नासाडी आहे, त्यासाठी वर्षातील आठ महिनेच सिंचनसेवा दिली जावी', या त्यांच्या अहवालाने गदारोळ उठला होता. राज्यातील आर्थिक - राजकीय विश्व त्यामुळे ढवळून निघाले होते. पण त्यातील तथ्य अनेक जण (खासगीत) मान्य करीत होते. 'भाकड जनावरांची कत्तल करण्याशिवाय इलाज नाही', या त्यांच्या मताने मोठी खळबळ माजली होती. वादाकरिता वाद असा उथळपणा त्यात नसे तर त्यामागे व्यासंग, सामग्रिक विचार आणि त्यामागील तळमळ दिसून येत असे. दांडेकरांच्या प्रमुख वादविवादांबद्दल त्यांचे एके काळचे सहकारी डॉ. राम देशपांडे यांनी तपशिलात विवरण केले आहे.[२०] ते जरूर वाचले जावे.

**समारोप**

नुकतीच जन्मशताब्दी होऊन गेलेल्या प्रा. वि. म. दांडेकर यांचे आज कसे वर्णन होऊ शकेल? आर्थिक - सामाजिक - शिक्षण - संशोधन क्षेत्रात सुमारे अर्धा शतक मुशाफिरी केल्यानंतर त्यांचे नेमके कसे चित्र आपल्यासमोर उभे राहते ? अर्थतज्ज्ञांच्या उदंड भाऊगर्दीत आपल्या निराळ्या कामगिरीने ठाम उभा राहिलेला उत्तुंग माणूस! त्यांच्या असामान्य कर्तृत्वामुळे दांडेकर ही एक व्यक्ती न राहता एक संस्था - एक विचारपद्धती बनून गेली. ठाशीव विचार आणि नवोन्मेषी अभ्यास हे त्यांच्या लेखणी-वाणीतून जागोजाग प्रकट होते. गायक जसा सुराला भिडतो तसे ते विषयाला भिडत असत. आपला व्यासंग - अभ्यास केवळ प्रबंध / निबंध यामध्ये अडकवून न ठेवता तो वेगवेगळ्या रूपाने समाजापर्यंत पोचविणे, समाजाच्या गळी उतरविणे हे त्यांनी व्रत म्हणून केले. व्याख्याने, परिसंवाद यासाठी प्रवासाचा त्यांनी कधी कंटाळा केला नाही. त्यांचा जनसंपर्क व्यापक होता. आशय आणि अभिव्यक्ती अशा दोन्हीमध्ये त्यांनी परिपूर्णता गाठली होती. इंग्रजी/मराठी भाषा त्यांना वश होत्या. आर्थिक - गणिती मूलतत्त्वांचा पाया मजबूत होता. सांख्यिकी माहिती/आकडेवारी यांचा अवास्तव मारा न करण्याचे दुर्मीळ तारतम्य त्यांच्यापाशी होते. अर्थशास्त्रातील अमूर्त प्रतिमानांचा विनाकारण आधार घेण्याची गरज त्यांना कधी भासली नाही. त्यामुळे अवघड विषयांवरील त्यांचे विवेचनही कमालीचे वाचनीय वाटत असे. वर उल्लेख केलेली जगताप यांच्याबरोबर लिहिलेली मराठीतील त्यांची दोन पुस्तके म्हणजे प्रासादिक मराठीतील निबंध वाटावा अशा रसाळ ओघवत्या शैलीत उतरलेली आहेत. कोणत्याही विषयाशी तादात्म्य पावल्याशिवाय आणि आंतरिक उमाळा असल्याशिवाय असे लेखन होत नाही. सवंगपणाने बरबटलेल्या आजकालच्या माध्यमांच्या दिशाहीन गोंधळामध्ये दांडेकरांचे बावनकशी चिंतन-लेखन स्फूर्तिदायी आणि प्रेरणादायी ठरते यात संशय नाही. प्रा. दांडेकर म्हणजे फक्त गरिबी आणि प्रादेशिक असमतोल असेच समीकरण समजणाऱ्या जगाकडून त्यांच्या चौफेर व्यासंगाची अधिक विस्ताराने व सजगतेने दखल घेतली जाईल अशी आशा आहे.

**संदर्भ व टीपा :**

इंग्रजी व मराठी भाषांमध्ये प्रा. दांडेकर यांचे विपुल लिखाण असले, तरी त्यांच्यावर लिहिले गेलेले लिखाण - माहितीवजा किंवा मूल्यमापनात्मक, अगदी तुटपुंजे आहे. चटकन उपलब्ध झालेले ठळक संदर्भ पुढीलप्रमाणे :


अ. Article by - Vaidyanathan, entitled V. M. Dandekar, Economic Political Weekly, Vol. 30, No. 3, 19 August 1995.
Article by Amrita Dhillon, entitled V. M. Dandekar, included in The Oxford Companion to Economics in India (Ed. Kaushik Basu), Oxford University Press, New Delhi, 2007.
Manasi Gore, Meenal Annachhatre, Vilas Adhav (Eds.) : An Unparalleled Economist - Professor V. M. Dandekar, Savitribai Phule Pune University, 2021. (SPPU)


**टीपा :**

१. प्रा. धनंजयराव गाडगीळ यांच्या षष्ट्यब्दिपूर्तीनिमित्त त्यांच्या गौरवार्थ प्रसिद्ध केलेल्या 'Changing India' या पुस्तकात Quantitative Thinking Among Students of Economics in India या शीर्षकाखाली प्रसिद्ध झालेला शोधनिबंध. पुस्तकाचे संपादक - नी. वि. सोवनी व वि. म. दांडेकर, प्रकाशक : एशिया पब्लिशिंग हाउस, मुंबई, १९६१.

२. Nilakantha Rath : V. M. Dandekar - Social Scientist with a Difference, Journal of Indian School of Political Economy, Vol. 7, No. 4, Oct-Dec 1995.

३. हा लेख रविवार दि. २९ जानेवारी २०१२ च्या लोकसत्तामध्ये पुनर्मुद्रित केला आहे. (मूळ प्रसिद्धी दिनांक.....)

४. प्रस्तावना लेखनाची तारीख - १५ फेब्रुवारी १९७३. प्रस्तावना पुढील पुस्तकात समाविष्ट आहे -महाराष्ट्राचा कुंडली संग्रह (लेखक - म. दा. भट आणि व. दा. भट), भट ज्योतिष प्रकाशन, पुणे, चौथी आवृत्ती, २०१५.

५. प्रदीप आपटे : 'एक लोभस मिस्किल दरारा' या शीर्षकाचा हा लेख वर नमूद केलेल्या SPPU या पुस्तकात समाविष्ट.

६. दांडेकर वि. म. : भारतीय अर्थव्यवस्थेतील अंतर्गत वसाहतवाद, अर्थविचार खंड १, तेजस प्रकाशन, कोल्हापूर, २०१६, पृ. ५९-७६. (मूळ प्रसिद्धी - अर्थसंवाद, खंड २, अंक ३, ऑक्टोबर-डिसेंबर १९७८).

७. दास्ताने संतोष : 'प्रा. वि. म. दांडेकर - एक कलंदर माणूस' या शीर्षकाचा हा लेख वर नमूद केलेल्या SPPU या पुस्तकात समाविष्ट.

८. गोखले अर्थशास्त्र संस्थेने या पुणे अनुसूचीवरील अहवाल दोन भागांमध्ये १९५३ व १९५४ साली प्रसिद्ध केला आहे. (पहा त्यांचे प्रकाशन क्र. २६ आणि २९).

९. Economic Policy and Theory, Indian Economic Journal, Vo. 4, No. 2, 1956.

१०. अभ्यासूंसाठी ही व्याख्याने Economic Political Weekly च्या ५ जानेवारी, १९८० आणि २९ मार्च, १९८० या अंकांमध्ये उपलब्ध आहेत.

११. Dandekar V. M. and N Rath : Poverty in India (Indian School of Political Economy, Lonavala), Economic Political Weekly, Vol. 6, Nos. 1 2; 2 Jan. 1971, 9 Jan. 1971.

१२. प्रा. वि. म. दांडेकर - महाराष्ट्रातील प्रादेशिक असमतोलावरील सत्यशोधन समितीचा अहवाल, नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, १९८४.

१३. Dandekar V. M. : The Indian Economy - 1947-1992, Vol. 1 (Agriculture), Sage

Publications, New Delhi, 1994.
Dandekar V. M. : The Indian Economy---1947-1992, Vol. 2 (Population, Poverty Employment), Sage Publications, New Delhi, 1996.

१४. Dandekar V. M. : The Cattle Economy in India, Indian Secular Society, Pune, 1981.

१५. दांडेकर वि. म. आणि जगताप म. भा. यांनी सहलेखन केलेली दोन पुस्तके : (१) महाराष्ट्राची ग्रामीण समाजरचना, गोखले अर्थशास्त्र संस्था, पुणे, १९५७ आणि (२) गावरहाटी - ह. वि. मोटे प्रकाशन, मुंबई, १९६३.

१६. Review of the Land Reform Studies (Sponsored by the Planning Commission, New Delhi), Artha Vijnana, December 1962.

१७. Reforms of Higher Education, Economic Political Weekly, Vol. 26, No. 46, 16 November-1991.

१८. Unitary Elements in a Federal Constitution, Economic Political Weekly, Vol. 22, No. 44, 31 October 1987.

१९. पहा : संतोष दास्ताने यांचा लेख - सातव्या अनुसूचीचा पुनर्विचार, साप्ताहिक साधना, वर्ष ७३, अंक ३८, १५ मे २०२१.

२० पहा : राम देशपांडे यांचा लेख - Prof. V. M.[2] Dandekar : A Virtuoso Agricultural Economist, वर नमूद केलेल्या SPPU या पुस्तकात समाविष्ट.

(प्रस्तुत शोधनिबंधासाठी संदर्भ साहित्य उपलब्ध करून दिल्याबद्दल मी गोखले अर्थशास्त्र संस्थेच्या धनंजयराव गाडगीळ ग्रंथालयाचे तसेच बृहन्महाराष्ट्र वाणिज्य महाविद्यालाच्या ग्रंथालयाचे आभार मानतो. शोधनिबंधाचा कच्चा खर्डा वाचून काही दुरुस्त्या प्रा. विजय परांजपे यांनी सुचवल्या. तसेच शोधनिबंध वाचून अज्ञात समीक्षकांनी सूचना केल्या. त्याबद्दल त्या सर्वांचा मी आभारी आहे. लेखनातील सर्व मतांची - विधानांची जबाबदारी माझी आहे. ....सं. दा.)

◆

## निवेदन : अर्थसंवाद वर्गणी

अर्थसंवाद अंकाचे वर्गणीदार होऊ इच्छिणाऱ्या महाविद्यालय / शैक्षणिक संस्था / व्यावसायिक संस्था/ग्रंथालये यांच्यासाठी **त्रैवार्षिक वर्गणी रु. २०००/- तर पंचवार्षिक वर्गणी रु. ३०००/-** आहे. ही वर्गणी कृपया 'मराठी अर्थशास्त्र परिषद' या नावाने राष्ट्रीयीकृत बँकेच्या डिमांड ड्राफ्टद्वारे किंवा संपादकांशी संपर्क साधून NEFT (मराठी अर्थशास्त्र परिषद, बँक ऑफ इंडिया, राजारामपुरी, कोल्हापूर. खाते क्र. : 094720110000368, IFSC : BKID0000947) द्वारे पाठवावी. **मनिऑर्डर व वार्षिक वर्गणी स्वीकारली जात नाही.** सदर वर्गणी कृपया प्रमुख संपादकाच्या पुढील पत्त्यावर कव्हरिंग लेटरसह पाठवावी.

**डॉ. राहुल शं. म्होपरे**
'सर' निवास, री.स.नं. ३३/क/२, प्लॉट नं. १८, लेक व्ह्यू कॉलनी, दीपा गॅस गोडावूनच्या पाठीमागे, उजळाईवाडी, ता. करवीर, जि. कोल्हापूर - ४१६ ००४ भ्रमणध्वनी : ९९२३८७९०२०

**- प्रमुख संपादक, अर्थसंवाद**

# बुडत्या (कर्जा)ला बॅड बँकेचा आधार

**अविनाश कुलकर्णी** †

**प्रास्ताविक :**

देशातील राष्ट्रीयीकृत बँकांची बुडीत कर्जखाती त्यांच्या ताळेबंदातून निर्लेखित (Write Off) करण्यासाठी प्रस्तावित मालमत्ता पुनर्बांधणी कंपनीच्या स्थापनेसाठी केंद्र सरकारने गुरुवार दिनांक १६ सप्टेंबर, २०२१ रोजी ३०,६०० कोटी रुपये हमीच्या तरतुदीची घोषणा केली. त्यामुळे २०२१-२२ च्या अर्थसंकल्पातून प्रस्तावित करण्यात आलेल्या राष्ट्रीय मालमत्ता पुनर्बांधणी कंपनीचा (National Assets Reconstruction Company Ltd. -NARCL) थोडक्यात बॅड बँकेचा व्यावसायिक मार्ग खुला झाला आहे. वास्तविकत: बँकांची थकबाकी (Over due), अनुत्पादक मालमत्ता (NPA-Non Performing Assets), बुडीत कर्जे (Bad Debts) ही एक सार्वत्रिक समस्या आहे. जगातील अनेक देशांत विकसित, विकसनशील आणि अविकसित देशांमध्ये ही समस्या कमी-अधिक प्रमाणात आढळून येते. तसेच ह्या आजच्या काळातील नवीन समस्या आहेत असेही नाही. काळानुरूप त्यामध्ये थोडेफार बदल झाले आहेत, त्यांची नाव-रूपं बदलली गेली आहेत. या बुडीत कर्जाच्या समस्येतून मार्ग काढण्यासाठी २१ व्या शतकाच्या सुरुवातीस बॅड बँकेचा प्रस्ताव समोर आला. ही बॅड बँक म्हणजे काय? आणि तिची आवश्यकता का आहे किंवा तिची उपयुक्तता काय आहे याचा अभ्यास या शोधनिबंधात पुढीलप्रमाणे करण्यात आला आहे.

**बॅड बँक अर्थ :**

बॅड बँक ही एक मालमत्ता पुनर्बांधणी कंपनी आहे. ही कंपनी कायद्यानुसार स्थापन झालेली असून तिचा बॅड बँक असा प्रातिनिधिक उल्लेख केला आहे.

**शोधनिबंधाची उद्दिष्टे :**

वित्तीय सुधारणांच्या प्रक्रियेमध्ये बॅड बँकेच्या स्थापनेची कारणे तथा पार्श्वभूमी अभ्यासणे. बॅड बँकेची आवश्यकता व महत्त्व यांचा अभ्यास करणे. बॅड बँकेच्या कार्यान्वयामुळे होणाऱ्या संभाव्य लाभांचा व इतर परिणामांचा अभ्यास करणे. भारतातील बँकांच्या वित्तीय व व्यावसायिक सुधारणांसाठी योग्य त्या सूचना करणे ही या शोधनिबंधाची उद्दिष्टे आहेत.

**संशोधन पद्धती व मर्यादा :**

तुलनात्मक विश्लेषण पद्धतीचा उपयोग करून, भारतामध्ये २००२ सालापासून स्थापन झालेल्या विविध मालमत्ता पुनर्बांधणी कंपन्यांच्या कामगिरीचा संक्षिप्त आढावा घेऊन थकीत कर्ज वसुलीच्या इतर उपलब्ध

† पुणे, सिनिअर रिसर्च फेलो सेंटर फॉर कल्चरल रिसोर्सेस अॅन्ड ट्रेनिंग, (CCRT, New Delhi)
आजीव सभासद क्र. १५२५, भ्रमणध्वनी : ९८२२२०३१८७, ई-मेल : dravikul@gmail.com

पर्यायांबरोबर त्याचे तुलनात्मक विश्लेषण या अभ्यासात मांडले आहे. या शोधनिबंधासाठी तथ्य संकलनाच्या दुय्यम साधनांचा आधार घेण्यात आला आहे.

बॅड बँकेच्या स्थापनेची कारणे अथवा पार्श्वभूमी पाहताना सर्वप्रथम भारतातील अभूतपूर्व बँकिंग आणि वित्तीय सुधारणांचा संक्षिप्त परिचय पुढीलप्रमाणे -:

**बॅसल सुधारणा निकष (Basal Norms)**

आंतरराष्ट्रीय पातळीवर बँकिंग क्षेत्रात सातत्याने सुधारणा घडवून आणण्यासाठी बॅसल समिती ही एक स्थायी संरचना आहे. १९८८ पासून बँकिंग क्षेत्रातील जोखीम व्यवस्थापनाच्या दृष्टिकोनातून भांडवली पर्यायप्तता यामध्ये वेळोवेळी सुधारणा निकष लागू करण्याची सूचना या बॅसल अटींद्वारे केली जात आहे. या बॅसल समितीद्वारे ज्या सुधारणा वेळोवेळी जारी केल्या जातात त्या लागू करणे बंधनकारक आहे. कारण, भारताने बॅसल सुधारणा योजनांवर स्वाक्षरी करून त्यास अनुमती दर्शविली आहे.

**बँकिंग व वित्तीय क्षेत्रातील सुधारणा -** १९९० पूर्वी भारतातील बँकांना त्यांच्या कर्ज वसुलीसाठी दिवाणी न्यायालयात दावा दाखल करून वर्षानुवर्षे वाट पाहावी लागत असे. तसेच वसूल न झालेली कर्जे व त्यावरील वसूल न झालेले व्याज हिशोब पत्रकांमध्ये दाखविले जात होते. त्यामुळे बँकांच्या हिशोबी पत्रकांची पारदर्शकता बाधित झालेली होती. ही परिस्थिती सुधारण्यासाठी १९९१ भारतातील बँकिंग उद्योगाला सुदृढ व सक्षम करण्यासाठी रिझर्व्ह बँकेचे माजी गव्हर्नर एम. नरसिंहन यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती समिती नेमली. त्या समितीने ज्या शिफारशी केल्या त्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या बॅसल प्रमाणकांची अंमलबजावणी करण्याकरिता आवश्यक होत्या. नरसिंहम समितीने (१९९१) तिच्या अहवालामध्ये एकूण ४८ शिफारशी केल्या होत्या. त्यामध्ये मालमत्तांचे वर्गीकरण आणि अनुत्पादक मालमत्तेची तरतूद ही सर्वांत महत्त्वाची शिफारस होती. त्याचा भारतातील बँकिंग उद्योगानेसुद्धा स्वीकार केला आणि अंमलबजावणी केली. परंतु त्यामुळे अनुत्पादक मालमत्तेची वाढती रक्कम आणि त्यासाठी बँकांना त्यांच्या कमविलेल्या नफ्यामधून करावी लागणारी तरतूद यामुळे सुरुवातीच्या काळात अनेक बँकांना तोटाही सहन करावा लागला. १९९३ साली सरकारने कर्ज वसुली न्यायाधिकरण (Debt Recovery Tribunal) स्थापन केले. परंतु या न्यायाधिकरणाकडेही हजारो प्रकरणे प्रलंबित झाली.

यावर पर्यायी व्यवस्था सुचविण्यासाठी आणि बँकांच्या ताळेबंदांमध्ये सुधारणा घडून यावी यासाठी डिसेंबर १९९७ मध्ये एम. नरसिंहम यांच्या अध्यक्षतेखाली सुधारणा समिती नेमण्यात आली. त्या समितीने ज्या शिफारशी केल्या त्यामध्ये बँकांच्या अनुत्पादक मालमत्ता ह्या मालमत्ता पुनर्रचना मंडळाकडे सोपविण्यात याव्यात अथवा सरकारने हमी घेतलेले रोखे (bonds) विकण्याची बँकांना अनुमती देण्यात यावी, ही शिफारस अत्यंत महत्त्वाची होती. त्यानंतर बँकांना त्यांच्या कर्जाची वसुली करण्यासाठी व्यापक अधिकार प्राप्त व्हावेत या हेतूने या नरसिंहम समितीने केलेल्या शिफारशीनुसार भारत सरकारने एकूण थकबाकीचा विचार करून राष्ट्रीयीकृत आणि व्यापारी बँकांना 'सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फिनान्शिअल ॲसेटस् ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट' २००२ (SARFAESI ACT) पासून लागू केला. त्यात बँकांना कर्ज थकबाकीची वसुली सुलभ व्हावी यासाठी कोर्टाच्या हुकुमाशिवाय कर्जाचे तारण ताब्यात घेऊन त्याची विक्री करता येईल असे विशेष हक्क देण्यात आले. या सरफेसी कायद्यातील तरतुदींचा उपयोग करून पुण्यातील अनेक नागरी सहकारी बँकांनी त्यांच्या थकबाकी व अनुत्पादक कर्जांची वसुली करण्याचा चांगला प्रयत्न केल्याचा अनुभव आहे. परंतु राष्ट्रीयीकृत बँकांकडून असा प्रयत्न मोठ्या प्रमाणात

करण्यास विलंबाने सुरुवात झाली. या कायद्याचा उपयोग करून या बँकांनी २००८-०९ मध्ये ३३% वसुली केली. तर २०१३-१४ मध्ये हे वसुलीचे प्रमाण २८.५% पर्यंत खाली आले. असे असले तरीही वैधानिक मर्यादा लक्षात घेऊन सरकारने बॅड बँकेच्या स्थापनेसाठी कार्यवाही सुरू केली. देशातील या बॅड बँक (मालमत्ता पुनर्बांधणी कंपनी) व्यवसायाची पार्श्वभूमी आणि कामगिरीची ओळख खालीलप्रमाणे -:

**भारतातील मालमत्ता पुनर्बांधणी कंपनी तथा बॅड बँक उद्योगाची पार्श्वभूमी -** २००२ साली लागू करण्यात आलेल्या सरफेसी कायद्यांतर्गत राष्ट्रीयीकृत बँकांपैकी भारतीय स्टेट बँक, सार्वजनिक क्षेत्रातील आय.डी.बी.आय. बँक आणि आय.सी.आय.सी.आय. बँक यांच्या सहयोगाने प्रारंभिक भांडवल रु. १० कोटींसह ११ फेब्रुवारी, २००२ रोजी आरसील नावाची पहिली मालमत्ता पुनर्बांधणी (Asset Reconstruction Company -ARC) कंपनी (बॅड बँक) स्थापन झाली. या बँकांच्या हजारो कोटी रुपयांच्या थकीत कर्जांची विक्री दरवर्षी या कंपनीस करून त्यापोटी या कंपनीचे रोखे (bonds) संबंधित बँकेस मिळत असे. त्यामुळे प्रत्यक्ष कर्जविक्रीचा पैसा न मिळताही या बँकांच्या ताळेबंदांमध्ये गुंतवणूक दाखवून अनुत्पादक मालमत्तेचे प्रमाण कमी करण्यात आले व नफा कमविण्यात आला. परंतु या आरसील कंपनीनेसुद्धा थकीत व अनुत्पादक कर्जांपैकी किती रकमेची प्रत्यक्षात वसुली केली हाही एक प्रश्नच आहे. भारतात आज रोजी अशा एकूण २८ मालमत्ता पुनर्बांधणी कंपन्या आहेत. मालमत्ता पुनर्बांधणी कंपन्यांना त्यांचा भांडवली पाया भक्कम करण्यासाठी १०० टक्के थेट विदेशी गुंतवणुकीची परवानगी देण्यात आली आहे. या कंपन्यांकडून सुरुवातीच्या काळात (२०१५ पूर्वी) थकीत व अनुत्पादक कर्जाच्या वसुलीचा दर अधिक होता. परंतु त्यानंतरच्या काळात २०१७-१८ सालचा अपवाद वगळता थकीत कर्ज वसुलीचा दर ३० टक्क्यांपेक्षाही कमी झालेला आढळून येतो. थकीत व अनुत्पादक कर्जाची पूर्णपणे प्रत्यक्ष वसुली आणि त्यासाठी आवश्यक त्या कठोर उपाययोजना यांचे आव्हान तसेच राहिल्याने दीर्घकाळात बँकांच्या अनुत्पादक मालमत्तेचे प्रमाण सतत वाढत गेल्याचे खालील तक्ता क्र.१ वरून दिसून येते.

**तक्ता क्र. १ : राष्ट्रीयीकृत बँकांची अनुत्पादक मालमत्ता वाढ (रक्कम रु. कोटी)**

| वर्ष | अनुत्पादक मालमत्ता |
|---|---|
| २००६-०७ | ९१८९ |
| २००७-०८ | ८०१९ |
| २००८-०९ | ७४६१ |
| २००९-१० | ११९८५ |
| २०१०-११ | १७७९६ |
| २०११-१२ | १५५५१ |
| २०१२-१३ | २७२३१ |
| २०१३-१४ | ३४४०१ |
| २०१४-१५ | ५२५४२ |
| २०१५-१६ | ५९५४७ |

(स्त्रोत - सप्तरंग, दैनिक सकाळ, पुणे दि. १४-०८-२०१६, पान २०)

वरील तक्ता क्र. १ वरून लक्षात येते की, राष्ट्रीयीकृत बँकांच्या अनुत्पादक रकमेमध्ये आर्थिक वर्ष २०१२-१३ पासून मोठ्या प्रमाणात वाढ झालेली आहे. जून २०१७ अखेर राष्ट्रीयीकृत बँकांच्या ढोबळ अनुत्पादक कर्जाची रक्कम ७ लाख ३३ हजार १३६ कोटी रुपये होती. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर हा आकडा वाढल्याचेही सांगितले जाते. बँकांची ही अनुत्पादक कर्जे १० ते १२ लाख कोटी रुपयांपेक्षाही अधिक असावीत असे म्हटले जाते. अनुत्पादक मालमत्तेच्या वसुलीसंदर्भात नादारी व दिवाळखोरी संहिता (Insolvency and Bankruptcy Code-IBC) ही एक महत्त्वपूर्ण

वैधानिक सुधारणा करण्यात आलेली आहे. २०१९-२० साली या कायद्याखाली एकूण रकमेपैकी ४५.५ टक्के रकमेच्या थकीत कर्जाची वसुली करण्यात आली.

**बँकांचे कर्ज निर्लेखन :**

असे असले, तरी अनेक वर्षे प्रयत्न करूनही थकीत कर्जे वसूल होत नसल्यामुळे अशी कर्जे बँकांकडून निर्लेखित केली जातात. कर्ज निर्लेखित केल्यामुळे ती बँकांच्या ताळेबंदाचा भाग राहात नाहीत. म्हणजेच ताळेबंदाची गुणवत्ता वाढविण्यासाठी कर्ज निर्लेखन ही हिशेब पत्रके लेखापद्धतीमधील एक महत्त्वपूर्ण सोय आहे. या सोयीस्कर पद्धतीचा वापर करून देशातील प्रमुख नऊ राष्ट्रीयीकृत बँकांनी २०१२-१३ ते २०१९-२० या आठ वर्षांत एकूण ३,१२,२१८ कोटी रुपयांची थकीत कर्जे निर्लेखित केली असल्याचे खालील तक्ता क्र.२ मधून निदर्शनास येते.

**तक्ता क्र. २ राष्ट्रीयकृत बँकांचे कर्ज निर्लेखन**

**(रक्कम रु. कोटी)**

| बँकेचे नाव | कर्ज निर्लेखन |
|---|---|
| स्टेट बँक ऑफ इंडिया | १,२३,४३२ |
| कॅनरा बँक | ४७,३१० |
| आयडीबीआय बँक | ४५,६९३ |
| इंडियन ओव्हरसीज बँक | ४१,३९२ |
| युको बँक | २५,२६६ |
| पंजाब नॅशनल बँक | ३१,९६६ |
| बँक ऑफ बडोदा | १०,४५८ |
| युनियन बँक | २६,०७२ |
| बँक ऑफ महाराष्ट्र | ७,१०० |
| एकूण | ३,५८,६८९ |

(स्रोत - अर्थसत्ता, दैनिक लोकसत्ता, दिनांक २८-१०-२०२० पान ११)

कर्ज निर्लेखन ही ताळेबंद लेखापद्धतीतील एक तरतूद आहे त्यामुळे कर्ज निर्लेखन म्हणजे कर्जदारास दिलेली कर्जमाफी नव्हे असे स्पष्टीकरण दिले जाते. तरीही अशा निर्लेखित कर्जाच्या वसुलीसाठी बँकांचे प्रयत्न थंडावतात असा अनुभव आहे. त्यामुळे बँकांच्या या प्रयत्नावर टीकाही केली जाते. एखाद्या उद्योगाला किंवा उद्योग समूहाला एक किंवा अधिक बँकांनी वित्तसहाय्य दिलेले असते आणि सद्य:स्थितीत या सर्व बँका आपल्या हितसंबंधाला जपून नादारी व दिवाळखोरी संहिता किंवा सरफेसी कायद्यांतर्गत पूरक निर्णय घेत आहेत. त्यामुळे उद्योगांच्या पुनरुज्जीवन प्रक्रियेत अडथळे निर्माण होत आहेत. या पार्श्वभूमीवर बँकांच्या अनुत्पादक कर्जांच्या वसुलीसाठी बॅड बँक प्रस्तावित करण्यात आली.

बँकांच्या किंवा इतर संस्थांच्या येणे रकमा वसुलीसाठी पूर्वीपासून गुमास्ता पद्धती (Factoring) वापरली जाते. भारतात कॅनफीन - ई कॅनरा बँकेची तर एस. बी. आय ग्लोबल फॅक्टर्स ली. ई स्टेट बँकेची फॅक्टरींग सेवा कंपनी आहे.

**बॅड बँकेची गरज :**

अन्य बँका आणि वित्तीय संस्थांच्या बुडीत आणि अडचणीच्या मालमत्ता ताब्यात घेऊन व्यापारी बँकांचे ताळेबंद स्वच्छ करण्यास मदत करणारी वित्तीय संस्था म्हणून बॅड बँक असा प्रातिनिधिक उल्लेख राष्ट्रीय मालमत्ता पुनर्बांधणी कंपनीबाबत करण्यात येतो. ही एक कंपनी कायद्यानुसार स्थापन झालेली कंपनी असून भारतीय रिझर्व्ह बँकेने तिला मालमत्ता पुनर्बांधणी कंपनी म्हणून परवाना दिलेला आहे. या बँकेची ५१ टक्के मालकी सार्वजनिक क्षेत्रातील बँकांकडे आहे. या बँकेकडून देशातील व्यापारी बँकांकडे असलेल्या थकीत कर्ज मालमत्तांचे संपादन केले जाईल. यामध्ये ५०० कोटी रुपये किंवा अधिक रकमेच्या थकीत कर्जाची खरेदी केली जाईल.

या मालमत्ता पुनर्बांधणी कंपनीकडून थकीत वा अनुत्पादक कर्जासाठी बँकांना प्रथम १५ टक्के रोख रक्कम देऊन थकीत कर्जांची खरेदी केली जाणार आहे. तर ८५ टक्के रक्कम ही सुरक्षित पावतीच्या (Security Receipts)

स्वरूपात दिली जाणार आहे. जेव्हा संपूर्ण मालमत्ता (IDRCL- India Debt Resolution Company Ltd) च्या मदतीने विक्री केली जाईल, तेव्हा उर्वरित रक्कम बँकांना परत केली जाईल. IDRCL ही एक सेवा किंवा कार्यकारी कंपनी आहे. यामध्ये सार्वजनिक क्षेत्रातील बँका आणि वित्त कंपन्यांकडून अधिकतम ४९ टक्के हिस्सा धारण केला जाईल व उर्वरित खासगी क्षेत्राचा हिस्सा असेल. बॅड बँकेचे काही अपेक्षित फायदे सांगितले जातात ते पुढीलप्रमाणे -

- उद्योगांचे जलद पुनरुज्जीवन होणे अपेक्षित आहे.
- बँकांचे कर्मचारी अधिक उत्पादक कार्यासाठी उपलब्ध होतील.
- कर्ज वसुलीची प्रक्रिया पारदर्शक व जलद होईल.
- बँकांच्या अनुत्पादक कर्जाच्या वसुलीसाठी कराव्या लागणाऱ्या खर्चाची बचत होईल.
- अनुत्पादक कर्ज मालमत्ता पुनर्बांधणी कंपनीला कमी रकमेस वर्ग केल्याने होणारे नुकसान बँकांना त्यांच्या नफ्यातून वजावटीस पात्र असल्याने कर आकारणीतही लाभ घेणे शक्य आहे.

**निरीक्षण तथा निष्कर्ष :**

कर्ज वसुली न्यायाधिकरण असो, सरफेसी कायद्यातील तरतुदी असो वा दिवाळखोरी व नादारी संहिता असो, बँकांच्या थकीत कर्जाची पूर्णपणे वसुली करण्यात वैधानिक मर्यादा असल्याचे निष्कर्षास येते.

बॅसल अटींची अंमलबजावणी आणि भारतातील बँकिंग क्षेत्रातील वित्तीय सुधारणा अंमलबजावणीतील अडचणी आणि बँकांच्या समस्या लक्षात घेऊन सुधारणा घडवून आणण्यासाठी १९९७ साली नेमलेल्या नरसिंहम समितीच्या शिफारशीमध्येच बॅड बँकेच्या स्थापनेचे मूळ होते, असे निदर्शनास येते.

तुलनात्मकदृष्ट्या मालमत्ता पुनर्बांधणी कंपन्यांपेक्षा नादारी व दिवाळखोरी संहिता खालील कर्ज वसुलीचे प्रमाण अधिक आहे.

बँकांना थकबाकी व अनुत्पादक मालमत्ता वसुलीच्या जबाबदारीतून दिलासा मिळण्यामुळे भविष्यात ही समस्या वाढण्याची शक्यता वाटते.

**समारोप**

बॅड बँकेचे संभावित फायदे पाहता बॅड बँक भारतातील बँकिंग क्षेत्रासाठी वरदान ठरणार असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. परंतु या बँकांना मिळणारा रोखे गुंतवणुकीवरील परतावा किंवा सुरक्षित पावत्यांवरील व्याजदर निश्चित नाही. त्याचबरोबर या पावत्यांची रक्कम परतफेड करण्याची कालमर्यादा निश्चित नाही. तसेच बँक अधिकारी, कर्जदार आणि बॅड बँक यांनी संगनमताने व्यवहार केल्यास बँकांचे नुकसान होऊ शकते. बॅड बँकांच्या कार्याच्या वेगवेगळ्या मर्यादा बँकांनी लक्षात घेऊन जास्तीत जास्त कर्ज थकबाकी स्वत: वसूल करण्याची आवश्यकता आहे. बँकांचे ते एक महत्त्वाचे कार्य आहे आणि त्यासाठी निष्ठेने कर्तव्य बजावणे गरजेचे आहे

**संदर्भ :**


१. https://bfsi.economictimes. indiatimes. com –accessed 14/10/2021
२. https://rbidocs.rbi.org.in/ LSCRCRBI08092016 - accessed 08/10/ 2021
३. www.rbi.org.in/Scripts/ BS_ViewBulletin.aspx?Id=20203 – accessed 08/10/2021
४. ढमढेरे एस.व्ही., काळे संभाजी आणि कुलकर्णी अविनाश, वित्तीय प्रणाली, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, २०२० पृष्ठ क्र. २१४-२१५
५. गोविलकर विनायक, अर्थजिज्ञासा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, जानेवारी २०१५ पृष्ठ क्र. ६११
६. दैनिक सकाळ - १४/०८/२०१६
७. दैनिक लोकसत्ता - २८/१०/२०२०


◆

# सांगली जिल्हा परिषद शाळा- प्राथमिक शिक्षणावरील खर्च, सर्व शिक्षा अभियान आणि शिक्षण हक्क कायदा २००९

**प्रशांत यशवंत फडणीस** †

**प्रास्ताविक :**

२१ व्या शतकात अन्न, वस्त्र, निवारा या बरोबरच शिक्षण आणि आरोग्य या देखील मानवाच्या मूलभूत गरजा बनल्या आहेत. मानव संसाधनात शिक्षण महत्त्वपूर्ण भूमिका बजावते. मानव विकास निर्देशांकात शिक्षणाला इतर घटकांबरोबरच समान महत्त्व देण्यात आले आहे. शिक्षण हा एखाद्या देशाच्या सामाजिक, आर्थिक आणि राजकीय बदलांमध्ये महत्त्वपूर्ण भूमिका बजावणारा घटक आहे. शिक्षण हा देशाच्या आर्थिक विकासावर प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष परिणाम करणारा घटक आहे. प्रत्यक्ष परिणामांमध्ये शिक्षणामुळे मिळणाऱ्या रोजगारसंधी, उत्पादकता वाढ, श्रमाची गतिशीलता यासारखे घटक दिसतात, तर अप्रत्यक्ष परिणामांमध्ये बचतीमध्ये वाढ, कुटुंबनियोजन, सामाजिक आणि नैतिक मूल्ये जोपासली जाणे इत्यादी परिणाम दिसून येतात.

भारतामध्ये शिक्षण ही सार्वजनिक वस्तू समजली जाते. शिक्षणावरील खर्च हा मानव विकासावरील गुंतवणूक समजली जाते. प्राथमिक शिक्षण राष्ट्र निर्मितीमध्ये महत्त्वाची भूमिका बजावते, कारण ते समग्र शिक्षण प्रणालीचा पाया आहे. मुलाच्या औपचारिक शिक्षणाची खऱ्या अर्थाने सुरुवात इथून होते. प्राथमिक शिक्षण हे सार्वत्रिक आणि सक्तीचे केले आहे.

**उद्देश :**

१) प्राथमिक शिक्षणाचा सांगली जिल्ह्याच्या संदर्भात आढावा घेणे.

२) सर्व शिक्षा अभियान आणि शिक्षण हक्क कायद्याचा सांगली जिल्ह्याच्या संदर्भात आढावा घेणे.

**संशोधन पद्धती :**

सांगली जिल्ह्याचा भौगोलिक आणि पर्यावरणीय अभ्यास विचारात घेता दहा तालुक्यांमधून तीन तालुक्यांची यासाठी निवड करण्यात आली आहे. अति पर्जन्यमान तालुक्यांमधून वाळवा, मध्यम पर्जन्यमान तालुक्यांमधून तासगाव तर कमी पर्जन्यमान व पठारी प्रदेशांमधून कवठेमहांकाळ या तालुक्याची निवड केली आहे. शिक्षणाधिकारी मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख, शिक्षक व पालक यांच्या मुलाखती घेऊन प्राथमिक शिक्षणाचा आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे. संशोधनासाठी प्राथमिक व दुय्यम साधनांचा वापर केला आहे. सांगली जिल्ह्याच्या संदर्भात प्राथमिक शिक्षणाचा आढावा घेताना दहावी, अकरावी आणि बारावी पंचवार्षिक योजना विचारात घेतली आहे. तसेच २००१-०२ ते

† सहाय्यक प्राध्यापक तथा अर्थशास्त्र विभागप्रमुख, बाळासाहेब देसाई कॉलेज, पाटण, जि. सातारा
आजीव सभासद क्र. १८३४, भ्रमणध्वनी : ९४२१२८४०५६, ई-मेल : pyphadnis@rediffmail.com

२०१८-१९ पर्यंतचा कालावधी विचारात घेतला आहे. कारण, याच कालावधीमध्ये सर्व शिक्षा अभियान, मध्यान्ह भोजन योजना, शिक्षण हक्क कायदा-२००९ यासह प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण संदर्भातल्या अनेक योजनांची अंमलबजावणी झाल्याचे दिसून येते.

**संशोधनाची गरज :**

भारतीय संविधानातील तरतूद आणि २००९ शिक्षण हक्क कायदा यानुसार सहा ते चौदा वयोगटातील मुलांना प्राथमिक शिक्षण हे सार्वत्रिक व सक्तीचे करण्यात आले आहे. शिक्षण हे कॉंकरंट लिस्टच्या VII सूचीमध्ये समाविष्ट करण्यात आले आहे. शिक्षण हा राज्य सरकारच्या अखत्यारीतला विषय असून केंद्र सरकारने प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणासाठी २००२ पासून सर्व शिक्षा अभियान सुरू केले आणि प्राथमिक शिक्षणाला चालना दिली. सांगली जिल्ह्याच्या संदर्भात प्राथमिक शाळांचा आणि प्राथमिक शिक्षणाचा आढावा घेणे आणि साक्षरतेचे प्रमाण तपासणे संशोधनाद्वारे क्रमप्राप्त आहे.


**संशोधनाच्या मर्यादा :**

प्राथमिक शिक्षणाचा आढावा फक्त सांगली जिल्ह्याच्या संदर्भात घेतला असून सांगली जिल्ह्यातील तीन तालुक्यांचा व त्यांमधील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळांचा आढावा घेण्यात आला. खासगी अनुदानित, विनाअनुदानित व इंग्रजी माध्यमाच्या शाळांचा आढावा संबंधित संशोधनामध्ये घेण्यात आलेला नाही. प्राथमिक शिक्षणाच्या संदर्भात अनेक योजना असून त्यापैकी केवळ सर्व शिक्षा अभियान आणि शिक्षण हक्क कायदा यांचा आढावा संशोधनात घेण्यात आला आहे. संशोधनसाठी केवळ प्राथमिक शिक्षण विचारात घेतले असून माध्यमिक व उच्च प्राथमिक शिक्षण विचारात घेतलेली नाही.

**प्राथमिक शिक्षणावरील सरकारी खर्च आणि सांगली जिल्हा :**

कोठारी आयोगाने एकूण १९६६ मध्ये शिक्षणावर एकूण अंदाजपत्रकाच्या किमान ६ टक्के निधी खर्च केला जावा अशी अपेक्षा व्यक्त केली होती. मात्र, भारत सरकारच्या, महाराष्ट्र राज्याच्या गेल्या दोन दशकांतील आकडेवारीचा विचार करता हा खर्च तीन टक्क्यांपर्यंत सुद्धा केला गेला नसल्याचे दिसून येते. यावरून सरकार व धोरणकर्त्यांचा शिक्षणाकडे बघण्याचा दृष्टिकोन स्पष्ट होतो. शिक्षणावर केल्या जाणाऱ्या खर्चाच्या बाबतीत महाराष्ट्र राज्याचा विचार केला तर एकूण शिक्षणावर केल्या जाणाऱ्या खर्चापैकी प्राथमिक शिक्षणावर केला गेलेला खर्च सन २००१-०२ मध्ये ४,१७२ कोटी होता. तो २०१८-१९ मध्ये १९,४८६ कोटींपर्यंत वाढला. मात्र, टक्केवारीचा विचार करता प्राथमिक शिक्षणावर केला जाणारा खर्च ५६.६० % वरून ४०.४९% पर्यंत घटल्याचे गेल्या दोन दशकांतील आकडेवारीवरून दिसून येते. याच कालावधीत सांगली जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षणावर होणारा खर्च १२८.४८ कोटींवरून ४८८.३९ कोटीपर्यंत वाढला. सांगली जिल्हा परिषदेच्या एकूण अंदाजपत्रकीय खर्चाचा विचार करता हा खर्च २६.१२ टक्क्यांवरून ३६.०९ टक्क्यांपर्यंत वाढल्याचे दिसून येते. मात्र, यामध्ये योजना खर्चाबरोबरच शिक्षकांवर केल्या जाणाऱ्या पगाराचा खर्चही समाविष्ट करण्यात आलेला आहे. सन २०११-१२ मध्ये सांगली जिल्हा परिषदेचा प्रतिविद्यार्थी शिक्षण खर्च १३,७२५.११ होता तो २०१८-१९ मध्ये २३,८९०.२५ होता. २०११-१२ मध्ये वाळवा, तासगाव आणि कवठेमहांकाळ या तालुक्याचा प्रतिविद्यार्थी शिक्षणखर्च अनुक्रमे १३,८८१.२४, १३,२९८.४१, १३,३१४.०९ होता. याचा अर्थ, वाळवा हा तालुका सांगलीच्या समग्र खर्चापेक्षा अधिक तर तासगाव आणि कवठेमहांकाळ तालुका सांगलीच्या

एकूण प्रतिविद्यार्थी खर्चापेक्षा कमी असल्याचे दिसून येते. मात्र त्यानंतरच्या आकडेवारीचा विचार करता तीनही तालुके सांगलीच्या समग्र प्रतिविद्यार्थी शिक्षण खर्चापेक्षा थोडेसे पुढे असल्याचे दिसून येते. या तीन तालुक्यांमधील अनुक्रमे शिक्षणखर्च पुढीलप्रमाणे होता. वाळवा २६,८९१.४१, तासगाव २३,०४८.३६, तर कवठेमहांकाळ २४,४७३.५३ इतका होता.




**भारतातील पंचवार्षिक योजनेतील शिक्षणावरील खर्च :**

भारत सरकारच्या शिक्षणावरील खर्चाचा आढावा घेताना एकूण अंदाजपत्रकामध्ये सामाजिक क्षेत्रावर केला जाणारा खर्च पहिल्या पंचवार्षिक योजनेमध्ये २०.८१ टक्के होता. तो बाराव्या पंचवार्षिक योजनेमध्ये ३०.१ टक्क्यांपर्यंत वाढला. याच कालावधीत शिक्षणावर केला जाणारा खर्च ७.६ टक्क्यांवरून १०.४७ टक्क्यांपर्यंत वाढला. सामाजिक क्षेत्रावर केला जाणारा एकूण सरासरी खर्च १८.६२ टक्के तर शिक्षणावर होणारा सरासरी खर्च ५.३९ टक्के राहिला. शिक्षणावर होणारा एकूण खर्च पुढे प्राथमिक शिक्षण, माध्यमिक शिक्षण, उच्च शिक्षण यावर विभागला जातो. बारा पंचवार्षिक योजनांचा आढावा घेतल्यास पहिल्या पंचवार्षिक योजनेमध्ये प्राथमिक शिक्षणावर ५६ टक्के तर बाराव्या पंचवार्षिक योजनेमध्ये ४३ टक्के खर्च केला गेला. याउलट माध्यमिक शिक्षणावर १३ टक्क्यांवरून २५ टक्क्यांपर्यंत तर उच्च शिक्षणावर ३१ टक्क्यांवरून ३२ टक्क्यांपर्यंत खर्च झाल्याचे दिसून येते. प्राथमिक शिक्षणावर होणाऱ्या खर्चात मोठी घट झाल्याचे दिसून येते. दहावी पंचवार्षिक योजना ही एकमेव योजना होती, ज्यामध्ये प्राथमिक शिक्षणावर सर्वाधिक ६६ टक्के रक्कम खर्च करण्यात आली.

शिक्षणावर केला जाणारा खर्च आणि प्राथमिक शिक्षणावर केला जाणारा खर्च देशाच्या स्थूल देशांतर्गत उत्पादनांची तुलना करता सन २०००-०१ मध्ये एकूण शिक्षणावरील खर्च जीडीपीच्या ४.२८ टक्के होता, तो २०१५-१६ मध्ये ३.१ टक्क्यांपर्यंत कमी झाल्याचे दिसून येते. याच वेळी जीडीपीशी प्राथमिक शिक्षणाची तुलना करता २.६ टक्क्यांवरून १.८४ टक्क्यांपर्यंत खर्च कमी झाल्याचे दिसून येते. महाराष्ट्र सरकारचा शिक्षणावर केला जाणारा खर्च विचारात घेता सन २००१-०२ मध्ये एकूण ७,३७० कोटी रुपये शिक्षणावर

खर्च केले गेले. त्यापैकी ५६.६० टक्के प्राथमिक शिक्षणावर, ३७.३७ टक्के माध्यमिक शिक्षणावर, तर ५.८३ टक्के उच्च शिक्षणावर खर्च झाला आहे. बाराव्या पंचवार्षिक योजनेच्या शेवटी म्हणजे २०१७-१८ महाराष्ट्र सरकारचा एकूण शिक्षणावर झालेला खर्च ५५,२२७ कोटी होता. त्यापैकी प्राथमिक शिक्षणावर ४०.४९ टक्के माध्यमिक शिक्षणावर ३३.४६ टक्के तर उच्च शिक्षणावर २६.०३ टक्के खर्च झाल्याचे दिसून येते. याच काळात सांगली जिल्हा परिषदेचा शिक्षणावर झालेला खर्च २६.१२ टक्के वरून ३६.०९ टक्क्यांपर्यंत वाढल्याचे दिसून येते.

**सर्व शिक्षा अभियान आणि सांगली जिल्हा :**

सर्व शिक्षा अभियान हा भारत सरकारचा प्राथमिक शिक्षणाचा सार्वत्रिकरणाचा महत्वाकांक्षी कार्यक्रम होता. २ जानेवारी २००१ राष्ट्रीय मिशन म्हणून हा कार्यक्रम सुरू झाला. सहा ते चौदा वयोगटातील शाळाबाह्य मुलांना शाळेच्या प्रवाहात आणणे, शिक्षणामधील सामाजिक आणि जेंडर गॅप कमी करणे आणि प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाबरोबरच गुणवत्ता वाढविणे हे मुख्य उद्दिष्ट सर्व शिक्षा अभियानाचे होते. दहाव्या पंचवार्षिक योजनेत सर्व शिक्षा अभियानाचे केंद्र आणि राज्याची खर्चाची टक्केवारी ७५:२५ अशी होती, जी अकराव्या पंचवार्षिक योजनेत ६०:४० बाराव्या पंचवार्षिक योजनेत ५०:५० अशी झाली. महाराष्ट्र राज्याचा विचार करता सन २००४-०५ पासून सरासरी १२५५ कोटी दरवर्षी राज्य सरकारला सर्व शिक्षा अभियानामधून प्राप्त झाले आहेत. सांगली जिल्ह्याचा विचार करता सन २००३-०४ पासून सन २०१८-१९ पर्यंत सरासरी २५.३८ कोटी सांगली जिल्हा परिषदेला सर्व शिक्षा अभियानांतर्गत प्राप्त झाले आहेत.

सर्व शिक्षा अभियान या भारत सरकारच्या शिक्षणासाठीचा फ्लॅगशिप कार्यक्रमावरील खर्चाचा विचार करता सन २००१-०२ ते सन २०१७-१८ या काळात भारत सरकारचे सर्व शिक्षा अभियानाचे बजेट ५०८० कोटींवरून २३,५०० कोटींपर्यंत वाढल्याचे दिसून येते. याच काळात सर्व शिक्षा अभियानामधून महाराष्ट्र सरकारकडे ८६७ कोटींवरून १३४३ कोटींपर्यंत निधी मिळाल्याचे दिसून येते. सांगली जिल्हा परिषदेला सुरुवातीच्या काळात ९.१७ कोटी रुपये प्राप्त झाले तर २०१७-१८ मध्ये १३.०२ कोटी रुपये प्राप्त झाले. सांगली जिल्हा परिषदेला सरासरी २५ कोटी सर्व शिक्षा अभियानामधून मिळाले आहेत. तर महाराष्ट्र सरकारला सरासरी १,२५५ कोटी प्रतिवर्षी सर्व शिक्षा अभियानामधून मिळाले आहेत. सांगली जिल्हा परिषदेला सर्व शिक्षा अभियानामधून प्राप्त झालेला निधी मोफत पुस्तके, मोफत गणवेश, शिक्षक अनुदान, शाळा अनुदान, शाळा देखभाल व दुरुस्ती आणि नवीन बांधकाम या विविध घटकांवर कशा प्रकारे खर्च झाला हे वरील तक्त्यावरून स्पष्ट होते. मोफत पाठ्यपुस्तके आणि नवीन बांधकाम यावरील खर्चात लक्षणीय घट झाली आहे. याउलट शिक्षक अनुदान, शाळा अनुदान आणि देखभाल व दुरुस्ती यावरील खर्चात लक्षणीय वाढ झाल्याचे वरील आकडेवारीवरून दिसून येते.

**शिक्षण हक्क कायदा २००९ आणि सांगली जिल्हा:**

भारतामध्ये शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करण्यासाठी २००९ मध्ये शिक्षण हक्क कायदा संमत करण्यात आला. यानुसार ६ ते १४ वयोगटातील सर्व मुलांना प्राथमिक शिक्षण मोफत आणि सक्तीचे करण्यात आले. याची अंमलबजावणी सर्व राज्यांतील सर्व जिल्ह्यांतील शाळांमध्ये करण्यासाठी सूचना देण्यात आल्या. या कायद्याने शाळांच्या गुणवत्ता वाढीसाठी दहा प्रमुख निकष निश्चित करण्यात आले. त्या निकषांची पूर्तता करण्यावर भर देण्यात आला. त्यासाठी सरकारी पातळीवर मोठ्या प्रमाणावर अनुदाने व निधी उपलब्ध करून देण्यात आला. जिल्हा परिषदेच्या मार्फत या सर्वांवर नियंत्रण आणि देखरेख ठेवली गेली. सांगली

**सर्व शिक्षा अभियान, सांगली जिल्हा (खर्च- लाखात)**

| वर्ष | मोफत पुस्तके | मोफत गणवेश | शिक्षक अनुदान | शाळा अनुदान | शाळा शाळा | नवीन दुरुस्ती | एकूण बांधकाम खर्च |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २००३-०४ | १५२.९ | -- | २६.४ | ११.२ | ७६.७ | ४४५.९ | ८१४.४ |
| २००४-०५ | १२७.९ | -- | ४७.७ | ५१.९ | ७८.१ | १६२.४ | ६६८.२ |
| २००५-०६ | १४७.२ | -- | ४८.६ | ४८.९ | ८६.३ | ५९७.५ | १४३७.६ |
| २००६-०७ | १८७.४ | -- | ५१.३ | ५१.३ | ७०.२ | ७६५.५ | १९७७.२ |
| २००७-०८ | १५९.७ | -- | ५४.९ | ४९.८ | ७०.८ | -- | १५२३.३ |
| २००८-०९ | ५२५.१ | -- | ५२.६ | १४६.४ | १४२.४ | १०१९.८ | २५२८.९ |
| २००९-१० | ५१५.४ | -- | ५३.३ | १५०.७ | १५६ | ५५८.६ | २३१०.१ |
| २०१०-११ | ५१३.२ | ३७९.१ | ५१.५ | १४९.१ | ११६.१ | १०९६.३ | ३४५१.९ |
| २०११-१२ | ६६०.४ | ३८९.५ | ६०.२ | १५३.३ | १४३.३ | १९६१.३ | ४४४५.१ |
| २०१२-१३ | ४९३.७ | ४०८.३ | ५२.७ | १५३.४ | १११.९ | ७६२.७ | ३०८०.६ |
| २०१३-१४ | ४८४.६ | ३२५.२ | -- | १५५.९ | १४३.२ | १९.८ | २०५१.९ |
| २०१४-१५ | ५२२.९ | ३१८.७ | -- | १५४.७ | १२४.९ | ५८५.६ | २६९१.९ |
| २०१५-१६ | ४५३.३ | २८१.६ | -- | १५६.९ | १४६.८ | १०३.५ | १८४२.५ |
| २०१६-१७ | ४८३.१ | ३१४.३ | ४८.७ | १५६.३ | ११६.६ | १८९.७ | २२८१.१ |
| २०१७-१८ | ४.१३ | ३०८.४ | -- | १८२.५ | १६७.९ | १४.९ | ९८९.४ |
| किमान | ४.१३ | २८१.६ | २६.४ | ११.२ | ७०.२ | १४.९ | ६६८.२ |
| कमाल | ६६०.४ | ४०८.३ | ६०.२ | १८२.५ | १६७.९ | १९६१.३ | ४४४५.१ |
| सरासरी | ३५८.५५ | ३४१.५ | ४८.८० | ११५.६४ | ११७.०१ | ६४१.२३ | २१८८.६७ |
| वार्षिक संयुक्त वृद्धिदर | ८.५६% | -२.३२ | ४.४७% | २०.७२% | ३.०४% | -५.९२% | ७.६३% |
| श्रेणी | ६५६.२७ | १२६.७ | ३३.८ | १७१.३ | ९७.७ | १९४६.४ | ७७६.९ |

(स्रोत: सर्व शिक्षा अभियान, सांगली जिल्हा)

जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळांच्या संदर्भात या निकषांचा आढावा पुढीलप्रमाणे घेता येईल.

शिक्षण हक्क कायद्यांतर्गत प्राथमिक शिक्षणातील शाळांसाठी मुख्य दहा निकष दिलेले आहेत. सांगली जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळांच्या संदर्भात या निकषांचा आढावा घेण्यात आला. त्यामध्ये इमारतीच्या संदर्भात ७० टक्के शाळांकडे आर.सी.सी. पक्की इमारत असल्याचे दिसून आले. वर्गखोल्यांच्या संदर्भात ४८ टक्के चांगल्या स्थितीत ४२ टक्के किरकोळ दुरुस्ती व १० टक्के मोठी दुरुस्ती होती. टॉयलेट सुविधेबाबत ९४ टक्के शाळांमध्ये कॉमन टॉयलेट होते, तर त्यापैकी ६६ टक्के शाळांमध्ये फक्त मुलींसाठी स्वतंत्र टॉयलेट व्यवस्था होती. ९२ टक्के शाळांमध्ये पाण्याची सुविधा उपलब्ध आहे. ९४ टक्के शाळांमध्ये वीज पुरवठा सुरू आहे,

मात्र त्यापैकी २२ टक्के शाळांमध्ये थकबाकीमुळे वीज तोडली गेली आहे. ५२ टक्के शाळांमध्ये ग्रंथालय सुविधा आहे. ८६ टक्के शाळांमध्ये विद्यार्थी-शिक्षक गुणोत्तर ३० पेक्षा कमी असल्याचे दिसून आले. तर ७६ टक्के शाळांमध्ये विद्यार्थी वर्गखोली गुणोत्तर ३० टक्क्यांपेक्षा कमी असल्याचे दिसून आले. ७८ टक्के शाळांकडे संगणक उपलब्ध आहेत. २४ टक्के शाळांकडे प्रोजेक्टर्स आहेत. ४२ टक्के शाळांमध्ये खेळण्यासाठी मैदान उपलब्ध आहे मात्र ५८ टक्के शाळांकडे स्वतंत्र स्वतःचे खेळण्याचे मैदान नाही, ही शोचनीय बाब आहे. २४ टक्के शाळांकडे आर.सी.सी. पक्की भिंत बांधली आहे. ३२ टक्के शाळांकडे तारेचे कुंपण आहे. तर ४४ टक्के शाळांकडे कोणतीही संरक्षण भिंत उपलब्ध नाही. ७४ टक्के शाळांमध्ये किचन शेड बांधण्यात आले आहे. रॅम्प सुविधा मात्र फक्त १२ टक्के शाळांमध्ये उपलब्ध असल्याचे सांगली जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळांमध्ये दिसून आले.

**निष्कर्ष :**

प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणासाठी सरकारने अंदाजपत्रकामध्ये तरतूद वाढवली आहे. मात्र, एकूण प्राथमिक शिक्षणावर केल्या जाणाऱ्या खर्चाच्या ९० टक्के रक्कम ही शिक्षकांचा पगार आणि पेन्शनवर खर्च केली जाते. त्यामुळे योजना आणि विकासासाठी अत्यल्प निधी शिल्लक राहतो. प्राथमिक शिक्षणावर खर्च होणाऱ्या रकमेच्या आर्थिक नियोजनाबाबतही शिस्तीचा अभाव आहे. सरकारकडून सँक्शन झालेली रक्कम खर्च करण्यामध्ये दिरंगाई दिसून येते. सांगली जिल्हा परिषदेतील तीन तालुक्यांचा प्राथमिक शिक्षणाच्या संदर्भात अभ्यास करता सरकारी खर्चामध्ये वीज बिल भरण्याची तरतूद नसल्यामुळे ४४ टक्के शाळांची वीज तोडल्याचे दिसून येते. नवीन इमारत बांधण्यासाठी खर्चाची तरतूद केली जाते. मात्र, जुन्या शाळांची दुरुस्ती आणि देखभाल यासाठी फारसा निधी उपलब्ध होत नाही. प्राथमिक शिक्षणासाठी सुरू केलेल्या योजनांचा पूर्व आढावा न घेता महागाई दर व भाववाढीचा विचार न करता जुन्याच रकमा दर वर्षी न बदलता तशाच ठेवल्या जातात. याचा फटका 'मध्यान्ह भोजन' सारख्या योजनेला बसतो. ज्यामध्ये अन्नधान्य शिजविण्यासाठीचे दर गेल्या पंधरा वर्षांत एकदाही बदलले नाहीत. विद्यार्थ्यांसाठीच्या योजनांचा पैसा थेट विद्यार्थ्यांच्या खात्यामध्ये जात असल्यामुळे भ्रष्टाचार कमी होत असल्याचे दिसून येते, शिवाय लाभार्थ्यांपर्यंत रक्कम पोहोचल्याचेही दिसून आले मात्र, सरकारी बँकांच्या खात्यांमध्ये पैसे जमा होतात. ग्रामीण भागामध्ये सरकारी बँकांच्या फारशा शाखा नसल्यामुळे अनेक वेळा पालक आणि विद्यार्थ्यांना अडचणींना सामोरे जावे लागते. केंद्र सरकारकडून मिळणारी रक्कम सरकारी बँकेत, तर राज्य सरकारकडून मिळणारी रक्कम जिल्हा बँकेत जमा होते. त्यामुळे दोनपेक्षा अधिक खाती सांभाळावी लागतात

सर्व शिक्षा अभियान मध्यान्ह भोजन योजना, सावित्रीबाई फुले दत्तक पालक योजना, मोफत पाठ्यपुस्तके, मोफत गणवेश, स्कॉलरशिप, उपस्थिती भत्ता यामुळे प्राथमिक शिक्षणामध्ये शाळाबाह्य मुलांचे प्रमाण कमी होण्यास तसेच विद्यार्थ्यांच्या गळतीचे प्रमाण कमी होण्यास मदत झाली आहे. परिणामी काही प्रमाणात शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणासाठी मदत झाली आहे.

सर्व शिक्षा अभियान हा भारत सरकारचा प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणासाठीचा महत्त्वाचा कार्यक्रम होता. भविष्यात हे अभियान अधिक गांभीर्याने आणि प्रामाणिकपणे राबविण्याची गरज आहे. सांगली जिल्ह्याच्या संदर्भात विचार करता सर्व शिक्षा अभियानातील तरतुदीचा गैरअर्थ व गैरवापर झाल्याचे काही ठिकाणी दिसून आले. सांगली जिल्हा परिषदेला सँक्शन झालेली रक्कम त्या आर्थिक वर्षामध्ये पूर्ण खर्च करण्यात जिल्हा परिषदेला अपयश आल्याचे दिसून येते. सरासरी ८५ टक्के रक्कम गेल्या दीड दशकात खर्च

झाल्याचे दिसून येते. याचा अर्थ, १५ टक्के रकमेचा अपव्यय झाला आहे. तर २०१३-१४ मध्ये फक्त ७२ टक्के रक्कम जिल्हा परिषदेकडून सर्व शिक्षा अभियानांतर्गत खर्च झाली आहे. जिल्हा परिषद आणि तीन तालुक्यांचा विचार करता सर्व शिक्षा अभियानांतर्गत अनेक पदे रिक्त आहेत. त्यामुळे योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात मर्यादा येतात. सर्व शिक्षा अभियान व इतर योजनांच्या संदर्भात ऑनलाईन माहिती भरण्यामध्येच शिक्षक आणि केंद्रप्रमुखांचा बराचसा वेळ खर्ची पडत असल्याचे दिसून येते. शिवाय ग्रामीण भागात इंटरनेटची सुविधा नसल्यामुळे त्या शिक्षकांना दिवसभर तालुक्याच्या ठिकाणी जावे लागते. यामुळे मुख्य शिक्षणाच्या कामालाच फाटा दिला गेल्याचे दिसून आले.

शिक्षण हक्क कायद्याच्या संदर्भात सांगली जिल्ह्याचा विचार करता विद्यार्थी प्रवेशाच्या संदर्भात, अंतर्गत मूल्यमापनाच्या संदर्भात आणि आठवीपर्यंत नापास न करण्याच्या धोरणाच्या संदर्भात प्रभावी अंमलबजावणी झाल्याचे दिसून येते. मात्र, इतर निकषांच्या बाबतीत गांभीर्यपूर्वक कार्यवाही झालेली नाही. उदा. प्रत्येक इयत्तेसाठी स्वतंत्र वर्ग, स्वतंत्र शिक्षक, एक वर्ग, एक शिक्षक, रॅम्प पायलेट्स, पिण्याच्या पाण्याची सुविधा याकडे गांभीर्यपूर्वक पाहिले गेलेले नाहीत. गेल्या दोन दशकांत जिल्ह्यातील तीन तालुक्यांमध्ये प्राथमिक शाळांची संख्या, विद्यार्थ्यांची संख्या वाढल्याचे दिसून येते. मात्र, तासगाव आणि कवठेमहांकाळ तालुक्यामध्ये स्थलांतरणामुळे प्रवेश संख्या घटल्याचे दिसून आले. शिवाय, ग्रामीण भागात इंग्रजी माध्यमाच्या शाळांचा प्रसार आणि प्रचार, पालकांची मानसिकता, राजकीय निर्बंध यामुळेही विद्यार्थी संख्येवर परिणाम झाल्याचे दिसून आले. एकूण प्राथमिक शिक्षणावर होणारा सरकारी खर्च, सर्व शिक्षा अभियान आणि शिक्षण हक्क कायदा या संदर्भात सांगली जिल्ह्याच्या तीन तालुक्यांच्या संदर्भात मर्यादित यश मिळाल्याचे दिसून येते.

**संदर्भ ग्रंथ :**


१) Economic Report of State Government budget, (2012), "Directorate of Economics Statistics', Government of Maharashtra, Mumbai.

२) Economic Survey of Maharashtra, "Directorate of Economic Statistics', Government of Maharashtra - various years.

३) Report, (2010), "Education for All towards Quality with Equity INDIA', GOI New Delhi.

४) Report Y-SHD- (2012),"Maharashtra Human Development Report', Yashwantrao Chavan Academy of Development Administration, Rajbhavan Complex, Baner Road, Pune.

५) Reports, (2016), "UADISE ASER', Government of Maharashtra, Various issues.

६) Report (2012),"Maharashtra Prathamik Shikshan Parishad' Govt. of Maharashtra.

७) Report, UADISE (2015-16), "Unified District Information System for Education', Government of India.

८) Report, (2016-17), "District Socio Economic Survey of Sangli', "Directorate of Economic Statistics', various years.


◆

# भारतातील वित्तीय समावेशन: धोरण आणि वास्तवाचे विश्लेषण

**श्रीकृष्ण महाजन** †

**प्रस्तावना:**

भारतातील २०११ च्या जनगणनेची आकडेवारी दर्शवते की, भारतातील ५८.७ टक्के कुटुंबे बँकिंग सेवांचा लाभ घेतात. याच बाबतीत २००१ च्या जनगणनेसाठी तुलनात्मक आकडा ३५.५४ टक्के असा होता. यावरून असे दिसून येते की, वित्तीय समावेशनाची प्रक्रिया यापूर्वी पासूनच सुरू आहे. वित्तीय वंचितता माणसाला वित्तीय व्यवस्थेच्या बाहेर फेकते. त्यामुळे आर्थिक संधीपासून तो वंचित राहतो. ज्यावेळी वंचित घटकास समावेशित केले जाते त्यावेळी आर्थिक वृद्धीला मिळणारी गती जास्त असते. वित्तीय समावेशन हे समावेशक आर्थिक वृद्धीला गती देते. रिझर्व्ह बँकेने वित्तीय समावेशनाला प्रोत्साहन देण्यासाठी खालीलप्रमाणे पुढाकार घेतला आहे: (१) 'नो फ्रिल खाती' उघडणे, (२) रिजनल रुरल बँकेद्वारे ओव्हरड्राफ्ट सुविधा, (३) जनरल पर्पज क्रेडिट कार्ड, (४) केवायसी मानदंडचे सुलभीकरण, (५) शंभर टक्के वित्तीय समावेशन ड्राइव्ह, (६) व्यवसाय सुविधा आणि व्यवसाय प्रतिनिधी मॉडेल, (७) तंत्रज्ञान उत्पादने आणि सेवा सादर करणे, (८) शाखा उघडण्यासाठी धोरणाचे उदारीकरण आणि ATM विस्तार, (९) विशेष निर्मिती निधी, (१०) वित्तीय साक्षरता आणि (११) क्रेडिट समुपदेशन. वित्तीय समावेशनासाठी धोरण आखून त्याची अंमलबजावणी करणे आवश्यक असते. त्याप्रमाणे भारत सरकारने अनेक पावले उचलून आपले याबाबतचे धोरणसुद्धा वेळोवेळी जाहीर केलेले आहे. या लेखामध्ये भारत सरकारच्या वित्तीय समावेशन धोरणाचा आढावा घेऊन वित्तीय समावेशनाच्या व प्रधानमंत्री जन-धन योजनेच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीचे विश्लेषण व परीक्षण करण्याचा प्रयत्न केला आहे.

**वित्तीय वंचिततेची व्याख्या:**

विशिष्ट समाजगटांना आणि व्यक्तींना वित्तीय सेवेस असलेली मुभा प्रतिबंधित करणारी प्रक्रिया म्हणजे वित्तीय वंचितता होय असे लेयशॉन (१९९५) यांनी म्हटले आहे. सिंक्लेअर (२००१) च्या मते, वित्तीय वंचितता म्हणजे योग्य स्वरूपातील आवश्यक वित्तीय सेवांची मुभा याबाबतची अक्षमता.

वित्तीयदृष्ट्या वंचित घटकांमध्ये मोठ्या प्रमाणावर खालील घटकांचा समावेश होतो:

१) ग्रामीण आणि शहरीभागातील वंचित घटक जसे

† अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा, वरिष्ठ प्राध्यापक व विभागप्रमुख, वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर ४१६००४
आजीव सभासद क्र. १२४४, भ्रमणध्वनी : +९१-९४२०१३३८१८, ई-मेल :ssm_commerce@unishivaji.ac.in

की अल्पभूधारक शेतकरी, भूमिहीन मजूर, छोटे विक्रेते इ.

२) असंघटित क्षेत्रात गुंतलेले लोक.

३) बेरोजगार आणि स्वयंरोजगार.

४) शहरी झोपडपट्टीवासीय.

५) महिला.

६) मुले.

७) वृद्ध/ज्येष्ठ नागरिक आणि

८) शारीरिकदृष्ट्या विकलांग लोक इ.

अतिरिक्त उत्पन्नाचा अभाव, ग्राहकाच्या गरजेनुसार योग्य नाही, आवश्यक कागदपत्रांचा अभाव

उत्पादनाबद्दल जागरूकतेचा अभाव, प्रणालीवर विश्वासाचा अभाव, उच्च व्यवहार खर्च, सेवा प्रदात्याची दूरस्थता, प्रदान केलेल्या सेवांचा कमी दर्जा ही वित्तीय वंचिततेची कारणे आहेत.

**वित्तीय समावेशनाची व्याख्या:**

वित्तीय समावेशनाच्या विविध व्याख्या दिसून येतात त्याप्रमाणे त्याची व्याप्ती विचारात घ्यावी लागते. स्कॉटिश सरकार (२००५) व्यक्तींसाठी योग्य वित्तीय उत्पादने आणि सेवांमध्ये प्रवेश असे त्याला परिभाषित करते. यामध्ये त्या उत्पादनांचा आणि सेवांचा सर्वोत्तम वापर करण्यासाठी क्षमता, कौशल्ये, ज्ञान आणि समज यांचा समावेश होतो. संयुक्त राष्ट्रांनी (२००६) वित्तीय समावेशनाची व्याख्या बँकेबल लोक आणि फर्मसाठी क्रेडिट, सर्व विमायोग्य लोक आणि फर्म्ससाठी विमा आणि प्रत्येकासाठी बचत आणि पेमेंट सेवांमध्ये प्रवेशाची तरतूद अशी केली आहे. लीलाधर (२००५) म्हणतात, वित्तीय समावेशन म्हणजे वंचित आणि कमी उत्पन्न गटातील मोठ्या वर्गांना परवडणाऱ्या दरात बँकिंग सेवा पुरवणे. सार्वजनिक वस्तू आणि सेवांवर अनियंत्रित प्रवेश हा मुक्त कार्यक्षम समाजाचा मुख्यभाग आहे. बँकिंग सेवा हे सार्वजनिक हिताचे स्वरूप असल्याने, भेदभाव न करता संपूर्ण जनतेला बँकिंग आणि पेमेंट सेवा उपलब्ध करून देणे हे सार्वजनिक धोरणाचे प्रमुख उद्दिष्ट आहे. थोरात (२००६) यांच्या मते, वित्तीय समावेशन म्हणजे परवडणाऱ्या वित्तीय सेवांची तरतूद, उदा. ज्यांना वगळले जाण्याची प्रवृत्ती आहे त्यांच्यासाठी औपचारिक वित्तीय प्रणालीसाठी पेमेंट आणि प्रेषण सुविधा, बचत, कर्ज आणि विमा सेवांमध्ये प्रवेश. रेड्डी (२००७) यांच्या शब्दात वित्तीय समावेशन प्रक्रियेमध्ये प्रत्येक कुटुंबाचा शोध घेणे आणि बँकिंग प्रणालीमध्ये त्यांचा समावेश करणे समाविष्ट आहे. सी. रंगराजन (२००८) यांच्या अध्यक्षतेखालील वित्तीय समावेशन समितीने आर्थिक समावेशनाची व्याख्या केली ती अशी: वित्तीय सेवांमध्ये प्रवेश सुनिश्चित करण्याची प्रक्रिया आणि दुर्बल घटक आणि कमी उत्पन्नगटांसारख्या असुरक्षित गटांना वेळेवर आणि पुरेशा प्रमाणात कर्ज उपलब्ध करून देण्याची प्रक्रिया अशी केली.

**प्रधानमंत्री जन-धन योजना:**

प्रधानमंत्री जन-धन योजना (PMJDY) हा भारत सरकारने ऑगस्ट २०१४ मध्ये सुरू केलेला वित्तीय समावेशाचा प्रमुख कार्यक्रम आहे. याला वित्तीय समावेशासाठी राष्ट्रीय मिशन म्हणूनही ओळखले जाते. प्रधानमंत्री जन-धन योजनेअंतर्गत मूलभूत बचत खात्यासोबत खालील अतिरिक्त लाभ उपलब्ध झाले आहेत:

१) योजना नो-फ्रिल खाते प्रदान करते (कोणतीही शिल्लक राखण्यासाठी कोणतीही अट नाही).

२) PMJDY अंतर्गत खातेदार नेहमीप्रमाणे व्याज मिळवतात.

३) बँक लाभार्थ्यांना रूपे डेबिट कार्ड प्रदान करते.

४) या खात्यात सुरुवातीला रु. १ लाखाचे अपघात विमा संरक्षणदेखील होते. आता ते २८.८.२०१८ नंतर नवीन खातेदारांना २ लाख रु.पर्यंत वाढवण्यात आले आहे.

५) बँका रु.चा ओव्हरड्राफ्ट (OD) घेतात. काही

पात्र खातेधारकांच्या खात्यामध्ये फक्त १०,०००.

६) PMJDY खाती लाभार्थी DBT, PMJJBY, PMSBY, APY, MUDRA बँक योजनेचा लाभ घेतात.

**विश्लेषण व पृथःकरण:**

सरकारच्या विविध अहवालातील विदेचे विश्लेषण व पृथ:करण करून शाखांची संख्या, ए. टी. एम. व पी. ओ. एस. ची संख्या, प्रधानमंत्री जन-धन योजना खात्यांची, रूपे कार्ड्स व जीवनविमाबाबत खालील मांडणी केली आहे.

**शाखांची संख्या :** व्यापारी बँकांच्या संख्येत वृद्धी झाल्याने वित्तीय समावेशनात निश्चित वाढ होते. म्हणून शाखा वाढविल्या पाहिजेत, असे सरकारचे धोरण होते. व्यापारी बँकांच्या शाखांची संख्या ३१-०३-२०१४ रोजी १.१८ लाखांवरून ३१-०३-२०१८ रोजी १.४३ लाखांपर्यंत वाढली; तथापि, ती पुन्हा कमी होऊ लागली आणि ३१-०३-२०२० रोजी १.२३ लाखांपर्यंत पोहोचली. हे धोरणास विपर्यस्त वास्तव आहे.

**ए. टी. एम. व पी. ओ. एस. ची संख्या :** बदलत्या जगात ए. टी. एम. व पी. ओ. एस. या वित्तीय वितरण वाहिनी महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. ए. टी. एम. ची संख्या ३१-०३-२०१४ रोजी १.६० लाखांवरून ३१-०३-२०२० रोजी २.२० लाख झाली. मार्च २०१४ मध्ये POS उपकरणांची संख्या १०.७ लाखांवरून मार्च २०१९ मध्ये ३७.२२ लाखांपर्यंत वाढली.

**प्रधानमंत्री जन-धन योजना खात्यांची संख्या:** प्रधानमंत्री जन-धन योजनेअंतर्गत ३१ मार्च २०१५ पर्यंत १४.७१ कोटी खाती उघडण्यात आली असून, त्यापैकी ८.७८ कोटी खाती ग्रामीण आणि ५.९३ कोटी खाती आहेत. १४.७१ कोटी खात्यांपैकी ८.५२ कोटी खाती शून्य शिल्लक खाती आहेत. २७ जानेवारी, २०२१ पर्यंत, या योजनेअंतर्गत एकूण ४१.७५ कोटी खाती उघडण्यात आली असून, त्यापैकी ३५.९६ कोटी खाती कार्यरत आहेत. प्रधानमंत्री जन-धन योजना सार्वत्रिक वित्तीय समावेशनाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी सरकारला मदत करत आहे.

**रूपे कार्ड्स :** जन-धन योजना खातेधारकांना ३०.०३.२०१९ पर्यंत एकूण २७.९१ कोटी रुपे (RuPay) डेबिट कार्ड जारी करण्यात आले आहेत. बँकिंग सुविधेव्यतिरिक्त, ही कार्डे रु. २ लाखांच्या इनबिल्ट अपघात विमा संरक्षणासह येतात. ३०.०३.२०१९ पर्यंत, या रूपे कार्ड-लिंक्ड विमा संरक्षण अंतर्गत एकूण ४,६५७ अपघाती दावे अदा करण्यात आले आहेत.

**जीवन विमा :** भारत सरकारने २८.०८.२०१४ रोजी वित्तीयदृष्ट्या वंचित लोकांची बँक खाती उघडण्यासाठी प्रधानमंत्री जन-धन योजना सुरू केली. जीवनविमा हा पीएमजेडीवाय रु.३०,००० च्या अंतर्गत लाभांपैकी एक लाभ आहे. १५.०८.२०१४ ते ३१.०१.२०१५ दरम्यान बँक खाते उघडणाऱ्या मृताच्या कुटुंबाला खातेदाराच्या मृत्यूवर ३०,००० रु. देण्यासाठी सरकारने एलआयसीच्या माध्यमातून ही योजना लागू केली. २०१७-२०१८ या आर्थिक वर्षात या योजनेअंतर्गत १०३७ दाव्यांसाठी, रु. ३११.१० लाख इतकी रक्कम अदा केली आहे.

**समारोप :**

उपरोक्त चर्चिलेल्या व्याख्या लक्षात घेतल्यास बँकेत खाते उघडले म्हणजे वित्तीय समावेशन झाले असे म्हणणे योग्य वाटत नाही. तसेच वित्तीय समावेशनाने गरिबी दूर होते अशाप्रकारचे काही लेखकांनी काढलेले उतावीळ निष्कर्षही योग्य वाटत नाहीत. बँकेत खाते उघडले; परंतु त्यात पैसे नाहीत अशा खात्यांची संख्यासुद्धा लक्षणीय असल्याचे दिसून येते. त्याचप्रमाणे काही विश्लेषणामध्ये शून्य शिल्लक असलेली खाती वगळता इतर खातीही सक्रिय आहेत, असे गृहीत धरले जाते हे

योग्य नाही. कारण अशा बिगर शून्य खात्यामध्ये काही १ रुपये शिल्लक असलेले खातेधारक सुद्धा आहेत.

बँकिंगच्या कार्यव्याप्तीमध्ये न बसणाऱ्या घटकांना वित्तीय व्यवस्थेत आणण्यासाठी किंवा त्यांचे वित्तीय समावेशन करण्यासाठी बँक शाखेव्यतिरिक्त इतर मार्ग अवलंबणे आवश्यक ठरते. प्रधानमंत्री जन-धन योजनेत बँकेत खाते उघडले आहे; पण त्यात ठेवण्यासाठी पैसे नाहीत अशी स्थिती दिसून येते त्यावेळी नियमित रोजगाराची आणि सूक्ष्म उपक्रमांची आवश्यकता असल्याचे दिसून येते. कारण वित्तीय वितरण वाहिनी (Financial Distribution Chanel) मध्ये सूक्ष्म बचत (Micro Saving), सूक्ष्म पत (Micro-Credit) आणि त्यानंतर सूक्ष्म उपक्रम (Micro Enterprises) याचा समावेश केल्यास रोजगाराची निर्मिती (employment generation) व त्यापाठोपाठ उत्पन्नाची निर्मिती (income generation) होते. ज्या वंचित घटकांची ही गरज बँका पूर्ण करू शकत नाहीत त्यांच्यासाठी स्वयंसहाय्यता बचत गट (Self-help Groups) आणि बँक मित्र (Business Correspondents) या वित्तीय वितरण वाहिनी उपयोगात आणल्या जातात. जिथे मध्यस्थ समाज सेवकाची भूमिका बजावली गेली आहे तिथे स्वयंसहाय्यता बचत गट यशस्वी झाले आहेत. परंतु इतर गटांच्या बाबतीत राजकीय लाभासाठी लोक जमविण्याचा एक मार्ग इतकेच त्याचे स्वरूप प्राप्त झाल्याचे दिसून येते. विविध प्रकारच्या वित्तीय वितरण वाहिन्या वापरणे आवश्यक आहे. शहरातील झोपडपट्टीवासीय व असंघटित क्षेत्रातील कामगार किंवा ग्रामीण भागातील शेतकरी व मजूर यांच्या वित्तीय समावेशनासाठी विधायक संरचना अस्तित्वात आणणे गरजेचे आहे.

(Impactful Policy Research of Social Science, Ministry of Education, Government of India यांच्याकडून वित्तीय सहाय्य मिळालेल्या संशोधन प्रकल्पपूर्तीतून सदर लेख लिहिणे शक्य झाले आहे)

**संदर्भ :**

१) Leeladhar, V. (2005) Taking Banking Services to the common man - Financial Inclusion, commemorative lecture at the fedbank Hormls memorial foundation on Dec. 2, 2005 at Ernakulam.

२) Leyshon, T., 1995, Geographies of Financial Exclusion: Financial abandonment in Britain and United States, Transactions of the Institutes of British Geographers New Series, 20, pp. 312-341.

३) Rangarajan, C. (2008), Report of the Committee on Financial Inclusion, Government of India, Jan. 2008.

४) Sinclair S. P., (2001), Financial Exclusion: An Introductory Survey, Report of Centre for Research in Socially Inclusive Services, Heriot-Watt University, Edinburgh.

५) Thorat Usha (2006), Financial Inclusion and Millennium Development Goals, Speech at the 4th programme on Human Development and State Finances jointly recognized by College of Agricultural Banking, Reserve Bank of India, UNDP and the Planning Commission at C-B, on Jan. 16, 2006 at Pune.

६) GoI (2021). PMJDY, Department of Financial Services, Ministry of Finance, Government of India.

७) GoI (2021). Pradhan Mantri Jan-Dhan Yojana - National Mission Financial Inclusion, Department of Financial Services, Ministry of Finance, Government of India, at www.financialservices.gov.in

◆

# पुणे शहरातील कृषी उत्पन्न बाजार समिती आणि शेतकरी बाजार यांचा तुलनात्मक अभ्यास

**रामदास गादगे** †
**धोंडीराम पवार** ††

**प्रस्तावना :**

भारतात जेवढ्या प्रमाणात भौगोलिक विविधता आहे. तेवढ्याच प्रमाणात अन्नधान्य पिकांच्या बाबतीतसुद्धा विविधता दिसून येते. उदा. धान्य, डाळी, भाजीपाला, फळे आणि तेलबिया इ. बाबतीत विविध राज्यांत, जिल्ह्यात विविधता दिसून येते. महाराष्ट्रातसुद्धा भौगोलिक विविधतेचे प्रतिबिंब दिसून येते. भारतात कृषी बाजार अनेक शतकापासून उदयास आलेला आहे. भारतातील कृषी बाजारावर सामाजिक, सांस्कृतिक, तसेच ब्रिटिश सरकारच्या वसाहतवादी व साम्राज्यवादी धोरणाचा प्रभाव पडलेला दिसून येतो. मागील शतकात भारतात कृषी विपणनाचे पारंपारिक आणि आधुनिक दोन्ही प्रकार एकत्रितपणे दिसून येतात. पारंपारिक प्रकारामध्ये हत्ता, दारा, मोघम, खाजगी व्यापार इ. पद्धती असतात. १९६० पासून सार्वजनिक वितरणासाठी शासनाने अन्नधान्याची खरेदी करण्यास सुरुवात केली. विपणनाच्या कार्यात सुधारणा करण्यासाठी नियंत्रित बाजारपेठांची स्थापना करण्यात आली. नियंत्रित बाजारपेठांच्या कार्याचे नियंत्रण करण्यासाठी कृषी उत्पन्न बाजार समित्या, पणन मंडळे स्थापन करण्यात आले. शेतकऱ्यांना प्रतवारी, प्रमाणीकरण, तोलाई, लिलाव यांसारख्या सेवा मिळणे अपेक्षित असते. नियंत्रित बाजारात शेतमालाच्या व्यापारात कमिशन एजंट, अडत्या, खाजगी व्यापारी, बाजार अधिकारी, तोलाई करणारे, हमाल, इ. सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात. भारत सरकारने शेतमालाच्या व्यापाराचा आढावा घेऊन सुधारणा करण्याचा प्रयत्न केला आहे. कृषी मंत्रालयाने कृषी उत्पन्न बाजार समितीचा कायदा करून देशातील घटकराज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना सुधारणा करण्यासाठी भाग पाडले आहे. कृषी बाजार कायद्याच्या अंमलबजावणीचे लाभार्थ्यांवर विविध परिणाम झालेले आहेत.

केंद्र शासनामार्फत २००३ साली निर्गमित करण्यात आलेल्या मॉडेल ॲक्टच्या मसुद्यानुसार, राज्यात २००६ साली मूळ पणन कायद्यात काही बदल करण्यात आले. कायद्याच्या नावाने नियमनासोबत 'विकास' हा शब्द टाकण्यात येऊन कायद्याचे नाव 'महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन (विकास व नियमन) असे करण्यात आले. या

† सहाय्यक प्राध्यापक, सर परशुरामभाऊ महाविद्यालय, टिळक रोड, पुणे ४११०३०
आजीव सभासद क्र. १२६७, भ्रमणध्वनी : ९८९००४०११७, ई-मेल : ramdasgadge2@gmail.com
†† सहाय्यक प्राध्यापक, सर परशुरामभाऊ महाविद्यालय, टिळक रोड, पुणे ४११०३०
आजीव सभासद क्र. १५१२, भ्रमणध्वनी ८६००३६१०७४, ई-मेल - dhonpawar@gmail.com

सुधारणानुसार काही खाजगी बाजार, शेतकरी ग्राहक बाजार, थेट विक्री परवाना, विशिष्ट शेतमालाचे बाजार, विभागीय कृषी उत्पन्न बाजार समित्या, एकाहून अधिक बाजारात सहभागी होण्यासाठी खरेदीदार व्यापाऱ्यांना एकच परवाना, करार शेती इ. बाबींचा नव्याने समावेश करण्यात आला.

कृषी विपणन भारतीय शेतीतील कमकुवत दुवा आहे. कृषी विपणन क्षेत्रात बाजार समितीच्या अतिनियंत्रण पद्धती, मध्यस्थांची मोठी साखळी आणि बाजारातील पायाभूत सुविधांमध्ये सार्वजनिक गुंतवणुकीचे दुर्लक्ष यासारख्या कमतरता दिसून येतात. याचा परिणाम शेतकऱ्यांना कमी मोबदला बाजारातील अकार्यक्षमतेमुळे मिळतो. कृषी विपणनातील या परिस्थितीवर उपाय म्हणून केंद्र आणि महाराष्ट्र सरकारने या क्षेत्रात विविध सुधारणा करण्याचा प्रयत्न केलेला आहे. प्रस्तुत अभ्यासाचे उद्दिष्ट पुणे शहरातील कृषी उत्पन्न बाजार समिती आणि शेतकरी बाजार यांचा तुलनात्मक अभ्यास करून शेतकरी बाजाराचे फायदे / लाभ मिळतात का हे समजून घेणे आहे.

**संशोधन अभ्यासाचे महत्व :**

जगातील भौगोलिक क्षेत्राचा आधार घेतल्यास भारताकडे एकूण जमीन संसाधनापैकी २.४ इतकी जमीन आहे. तर जागतिक लोकसंख्येपैकी १६% लोकसंख्या भारतात राहते. शेती व शेतीशी संलग्न क्षेत्राचे २०१६-२०१७ मध्ये स्थूल कृषिमूल्यात ४.९% वार्षिक वृद्धी झाली. कृषी आणि कृषी संलग्न क्षेत्राचा २०१६-१७ मध्ये चालू किंमतीनुसार स्थूल कृषिमूल्य १७.३२% होते. भारतात लहान आणि सीमांत (२ हे. क्षेत्रापेक्षा कमी जमीन असलेले) शेतकऱ्याची संख्या ७२% इतकी आहे. शेती आणि शेती संलग्न क्षेत्राचा स्थूल कृषी वृद्धिदर २.८% इतका आहे. याचे कारण उत्पादन आणि विपणनाच्या पायाभूत सुविधामधील उणिवा ह्या आहेत.

फलोत्पादन हे शेतीमधील सर्वात जास्त आशादायक क्षेत्र आहे. बागायती पिके अल्प मुदतीची असतात. शेतकऱ्याचे उत्पन्न वाढविण्यासाठी बहुपीक पद्धतीचा अवलंब केला जातो. फलोत्पादन पिके उच्च मूल्य पिके म्हणून ओळखली जातात. कारण या पिकांपासून जास्त तसेच या पिकांच्या मागणीची उत्पन्न लवचिकता उच्च असते. सन २००४ - ०५ ते २०१४ - १५ दरम्यान फलोत्पादन क्षेत्राने पारंपारिक पिकांना मागे टाकलेले आहे. सन २०१५-१६ दरम्यान फलोत्पादन पिकांचे उत्पादन २४.४७ दशलक्ष हेक्टर क्षेत्रापासून सुमारे २८६.२ दशलक्ष टन उत्पादन झाले. फलोत्पादन पिकापैकी एकूण फलोत्पादन उत्पादनाच्या ५०% पेक्षा जास्त भाजीपाल्याचे उत्पादन होते. १९९१-९२ ते २०१५-१६ पर्यंत भाज्यांचे उत्पादन ५८५३२ हजार टनावरून १,६९,०६४ हजार टन झाले. शाकाहारी आहारात भाजीपाल्यास आरोग्यवर्धक अन्नघटक म्हणून फारच महत्त्व असून भारतातील भाजीपाला उत्पादन जागतिक उत्पादनाच्या साधारणपणे १३.७३% इतके आहे. भारतातील भाजीपाला क्षेत्र व उत्पादनाचा जगामध्ये दुसरा क्रमांक लागतो, तर चीन प्रथम क्रमांकावर आहे.

भारतात भाज्यांची दरडोई उपलब्धता ३५७ ग्रॅम / प्रतिव्यक्ती /प्रतिदिवस आहे. भारतातील फलोत्पादन क्षेत्रासमोरील प्रमुख आव्हाने म्हणजे कापणीनंतरचे नुकसान, दर्जेदार लागवड साहित्याची उपलब्धता आणि लहान शेतकऱ्यांच्या बागायती उत्पादनासाठी बाजारपेठेचा अभाव. फळे आणि भाज्यांच्या बाबतीत बागायती पिकांसाठी एकत्रित वाया जाण्याचे प्रमाण ५% ते १५% आहे. फलोत्पादनात भाजीपाला पिके सर्वात किफायतशीर म्हणून ओळखले जाते. कमी भांडवल आणि कमी कालावधीत कोरडवाहू जमीन, टेकड्या, खडकाळ जमीन, सागरी किनारपट्टीसारख्या ठिकाणी अशा पिकांची लागवड करता येते.

भारताने फळे आणि भाज्यांच्या उत्पादनात जागतिक

स्तरावर दुसरा क्रमांक कायम ठेवलेला आहे. प. बंगाल, उत्तर प्रदेश आणि बिहार राज्यांमध्ये भाज्यांचे सर्वाधिक उत्पादन होते. याच राज्यात दारिद्र्याचे प्रमाणही मोठे आहे. महाराष्ट्राचा भाजीपाला उत्पादनात व लागवडीच्या क्षेत्रात ६ वा क्रमांक लागतो. महाराष्ट्राची उत्पादकता (१४.९० टन / प्रति हेक्टर) आहे. मात्र हे प्रमाण देशपातळीवरील उत्पादकतेपेक्षा (१७.४० टन/प्रति हे.) कमी आहे. महाराष्ट्रातील भाजीपाला उत्पादन वाढविण्यासाठी क्षेत्राबरोबरच उत्पादकता वाढविणे गरजेचे आहे. पश्चिम महाराष्ट्र भाजीपाला उत्पादनात राज्यात निश्चितपणे आघाडीवर असून महाराष्ट्रातील प्रामुख्याने पुणे, नाशिक, सातारा, अहमदनगर हे जिल्हे प्रमुख भाजीपाला उत्पादक जिल्हे म्हणून ओळखले जातात. महाराष्ट्रातील एकूण भाजीपाला पिकाखालील क्षेत्रात पुणे जिल्ह्याचा साधारणपणे ३५.०७%, नाशिक २६.६१%, सातारा १५.४४%, अहमदनगर १०.३४% इतका वाटा आहे. भाजीपाला क्षेत्रात नाशिक, अहमदनगर, पुणे व सातारा हे चार जिल्हे अग्रस्थानी आहेत. एकूण भाजीपाला खालील क्षेत्रात या चार जिल्ह्यांचा जवळपास ८७% इतका वाटा आहे. भाजीपाला वगळता इतर पिकांना किमान आधारभूत किंमती दिल्या जातात. भाजीपाला उत्पादक शेतकऱ्यांना किंमतीची हमी नसते. किंमतीतील चढउताराचा परिणाम त्यांच्या उत्पन्नावर होत असतो. म्हणून सदर अध्ययनासाठी पुणे शहरातील कृषी उत्पन्न बाजार समिती व शेतकरी बाजार यांच्या तुलनात्मक अभ्यासातून भाजीपाला उत्पादक शेतकऱ्यांना मिळणाऱ्या नफ्याचा प्रमाणाचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केला गेला आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे :**

१.कृषी उत्पन्न बाजार समितीतील भाजीपाला उत्पादक शेतकऱ्याचा अभ्यास करणे.

२.शेतकरी बाजारातील भाजीपाला उत्पादक शेतकऱ्याचा अभ्यास करणे.

३.भाजीपाला उत्पादक शेतकऱ्यांना कृषी उत्पन्न बाजार समिती आणि शेतकरी बाजार यापासून मिळणाऱ्या लाभाचा तुलनात्मक अभ्यास करणे.

**गृहीतकृत्ये :** कृषी उत्पन्न बाजार समिती आणि शेतकरी बाजार या दोन्ही बाजारात भाजीपाला विक्री करणाऱ्या शेतकऱ्यांना मिळणारा नफा समान आहे.

**संशोधन पद्धती :** संबंधित संशोधनासाठी प्राथमिक व दुय्यम तथ्य संकलन पद्धतीचा वापर करण्यात आलेला आहे. प्राथमिक तथ्य संकलनासाठी प्रश्नावली तयार करून पुणे शहरातील कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये भाजीपाला विक्री करणाऱ्या व शेतकरी बाजारात भाजीपाला विक्री करणाऱ्या भाजीपाला उत्पादक शेतकऱ्याकडून प्रत्यक्ष भेटून प्रश्नावलीद्वारे माहिती संकलित करण्यात आली. दुय्यम तथ्य संकलनाचा वापर करून संशोधनासाठी उपयुक्त असणारी माहिती संदर्भ ग्रथ, मासिके, त्रैमासिके, वर्तमानपत्रे, साप्ताहिके, शासकीय अहवाल, कार्यालयीन माहिती, विषयाशी निगडित संशोधन अहवाल आणि संकेत स्थळे इ. माध्यमातून दुय्यम तथ्य संकलित केले आहेत.

**संशोधन क्षेत्र :** संबंधित संशोधनासाठी पुणे शहरातील कृषी उत्पन्न बाजार समिती आणि शेतकरी बाजार याची निवड केली आहे.

**नमुना निवड :** संबंधित संशोधनासाठी पुणे शहरातील कृषी उत्पन्न बाजार समिती गुलटेकडी, मार्केट यार्ड, पुणे आणि मांजरी येथील उपबाजारातील शेतकरी बाजारात भाजीपाला विक्री करणाऱ्या शेतकऱ्याची निवड यादृच्छिक नमुना पद्धतीने केली आहे.

**संशोधनाचा कालावधी व मर्यादा :** संबंधित संशोधन पुणे शहरातील कृषी उत्पन्न बाजार समिती आणि शेतकरी बाजार यांचा तुलनात्मक अभ्यास या विषयाशी निगडित असून सन २०१७-१८ ते २०१८-१९ या कालावधीतील माहितीवर आधारित आहे. पुणे शहरातील कृषी उत्पन्न बाजार समिती व शेतकरी

बाजारात भाजीपाला विक्री करणाऱ्या शेतकऱ्याकडून माहिती गोळा केली आहे. त्यामुळे मिळणारे निष्कर्ष पुणे शहरातील वेगवेगळ्या बाजारात भाजीपाला विक्री करणाऱ्या शेतकऱ्यापुरतेच मर्यादित आहेत.

पुणे शहरातील कृषी उत्पन्न बाजार समिती आणि शेतकरी बाजारात भाजीपाला विक्री करणाऱ्या शेतकऱ्यांचे अध्ययन करताना लिंगानुसार शेतकऱ्याचे प्रमाण किती व कसे आहे हे जाणून घेण्याच्या उद्देशाने माहिती संकलित करून पुढील तक्ता क्र. १ मध्ये मांडली आहे.

**तक्ता क्र. १ भाजीपाला उत्पादक शेतकऱ्याचे लिंगानुसार वर्गीकरण**

| अ.क्र | लिंग | शेतकऱ्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | पुरुष | ३२७ | ९३.१६ |
| २ | स्त्रिया | २४ | ६.८४ |
| | एकूण | ३५१ | १०० |

वरील तक्ता क्र. १ वरून असे निदर्शनास येते की, भाजीपाला उत्पादक शेतकऱ्यांमध्ये ९३.१६% पुरुष होते, तर ६.८४% स्त्रिया शेतकरी असल्याचे दिसून येते म्हणजेच पुरुष शेतकऱ्याचे प्रमाण सर्वाधिक असल्याचे दिसते.

कृषी उत्पन्न बाजार समिती आणि शेतकरी बाजारात भाजीपाला विक्री करणाऱ्या शेतकऱ्याचे उत्पन्न जाणून घेण्याच्या उद्देशाने तथ्य संकलित करून ते तक्ता क्र. २ मध्ये मांडलेले आहे. यावरून शेतकऱ्याच्या वार्षिक उत्पन्नाची पातळीची स्थिती स्पष्ट होते.

**तक्ता क्र. २ शेतकऱ्याचे वार्षिक उत्पन्नांचे प्रमाण**

| अ.क्र | वार्षिक उत्पन्न (रु.) | शेतकऱ्यांची सख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | रु. ३ लाखांपर्यंत | ३०२ | ८६.०५ |
| २ | रु. ३ लाख ते ६ लाख | ३५ | ९.९७ |
| ३ | रु. ६ लाखांपेक्षा जास्त | १४ | ३.९८ |
| | एकूण | ३५१ | १०० |

तक्ता क्र. २ वरून असे दिसून येते की, वार्षिक उत्पन्न रु. ३ लाखांपर्यंत असणाऱ्या शेतकऱ्याचे प्रमाण सर्वाधिक म्हणजे ८६.०५% असून रु. ३ लाख ते रु. ६ लाख दरम्यान उत्पन्न असणारे शेतकऱ्याचे प्रमाण ९.९७% आहे, तर ६ लाखांपेक्षा जास्त उत्पन्न असणाऱ्या शेतकऱ्याचे प्रमाण अगदी कमी म्हणजे ३.९८% आहे. यावरून असे निदर्शनास येते की, भाजीपाला उत्पादक शेतकऱ्याचे ३ लाखांपेक्षा कमी वार्षिक उत्पन्न असणाऱ्या शेतकऱ्याचे प्रमाण सर्वाधिक आहे.

कृषी उत्पन्न बाजार समिती व शेतकरी बाजारात भाजीपाला विक्री करणाऱ्या शेतकऱ्यांचे शेती व्यवसायाबरोबरच इतर व्यवसाय जाणून घेण्याच्या हेतूने तथ्य संकलित करून ते सारणी क्र. ३ मध्ये मांडलेले आहे. यावरून शेतकऱ्यांच्या जोडधंद्याची स्थिती स्पष्ट होते.

**तक्ता क्र. ३ शेतकऱ्याचे जोडधंद्यानुसार प्रमाण**

| अ.क्र | जोडधंदा | शेतकऱ्यांची सख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | जोडधंदा असणारे शेतकरी | ६७ | १९.०९ |
| २ | जोडधंदा नसणारे शेतकरी | २८४ | ८०.९१ |
| | एकूण | ३५१ | १००.०० |

वरील तक्ता क्र. ३ वरून असे निदर्शनास येते की, भाजीपाला उत्पादक शेतकऱ्यांपैकी ८०.९१% शेतकरी कोणताही जोड व्यवसाय करीत नाहीत, तर १९.०९% शेतकरी शेती व्यवसायाबरोबर इतर जोडव्यवसाय करतात. यावरून असा निष्कर्ष काढता येतो की, जोडधंदा नसणाऱ्या शेतकऱ्याचे प्रमाण सर्वाधिक असल्याने त्यांना शेती व्यवसायावरच आपला उदरनिर्वाह करावा लागतो.

कृषी उत्पन्न बाजार समिती व शेतकरी बाजारात भाजीपाला विक्री करणाऱ्या शेतकऱ्यांच्या उत्पादनाच्या प्रकाराची माहिती जाणून घेण्याच्या हेतूने तथ्य संकलित करून ते तक्ता क्र. ४ मध्ये दाखविलेले आहे. यावरून उत्पादनाच्या प्रकाराची माहिती स्पष्ट होते.

**तक्ता क्र. ४ उत्पादनाच्या प्रकाराचे प्रमाण**

| अ.क्र | उत्पादनाचे प्रकार | शेतकऱ्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | रासायनिक | २०९ | ५९.५५ |
| २ | सेंद्रिय / नैसर्गिक | ३५ | ९.९७ |
| ३ | दोन्हीही | १०७ | ३०.४८ |
| | एकूण | ३५१ | १०० |

वरील तक्ता क्र. ४ वरून असे दिसून येते की, रासायनिक भाजीपाला उत्पादन करणाऱ्या शेतकऱ्याचे प्रमाण ५९.५५% इतके असून सेंद्रिय भाजीपाला उत्पादन करणाऱ्या शेतकऱ्याचे प्रमाण ९.९७% इतके आहे, तर सेंद्रिय व रासायनिक असे दोन्हीही भाजीपाल्याचे उत्पादन करणाऱ्या शेतकऱ्याचे प्रमाण ३०.४८% इतके आहे. यावरून असे सांगता येईल की, रासायनिक भाजीपाला उत्पादित करणाऱ्या शेतकऱ्याचे प्रमाण सर्वाधिक आहे.

कृषी उत्पन्न बाजार समिती व शेतकरी बाजारात भाजीपाला विक्री करणाऱ्या शेतकऱ्यांच्या भाज्यांच्या उत्पादनाचा प्रकार जाणून घेण्याच्या उद्देशाने तथ्य संकलित करून ते तक्ता क्र. ५ मध्ये मांडलेले आहे. यावरून भाज्याच्या प्रकाराची माहिती स्पष्ट होते.

**तक्ता क्र. ५ भाजीपाला उत्पादनाचा प्रकार**

| अ.क्र | भाजीपाला उत्पादनाचा प्रकार | शेतकऱ्यांची सख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | फळभाज्या | ५० | १४.२५ |
| २ | पालेभाज्या | १५९ | ४५.३० |
| ३ | दोन्हीही | १४२ | ४०.४५ |
| | एकूण | ३५१ | १०० |

वरील तक्ता क्र. ५ वरून असे दिसून येते की, भाजीपाल्यामध्ये फळभाज्या उत्पादन करणाऱ्या शेतकऱ्याचे प्रमाण १४.२५% असून पालेभाज्या उत्पादित करणाऱ्या शेतकऱ्याचे प्रमाण ४५.३०% असल्याचे दिसते, तर फळभाज्या व पालेभाज्या म्हणजेच दोन्हीही उत्पादन करणाऱ्या शेतकऱ्याचे प्रमाण ४०.२५% आहे. यावरून असे निदर्शनास येते की, तुलनेने पालेभाज्या उत्पादित करणाऱ्या शेतकऱ्याचे प्रमाण जास्त आहे.

कृषी उत्पन्न बाजार समिती व शेतकरी आठवडे बाजारात भाजीपाला विक्री करणाऱ्या शेतकऱ्यांचे बाजारानुसार वर्गीकरण जाणून घेण्याच्या उद्देशाने तथ्य संकलित करून ते तक्ता क्र. ६ मध्ये मांडलेले आहे. यावरून शेतकरी कोणत्या बाजारात भाजीपाला विक्री करतात याविषयी माहिती स्पष्ट होते.

**तक्ता क्र. ६ बाजाराच्या प्रकारानुसार वर्गीकरण**

| अ.क्र | बाजाराच्या प्रकार | शेतकऱ्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | शेतकरी बाजार | ४ | १.१५ |
| २ | कृषी उत्पन्न बाजार समिती | १२६ | ३५.८९ |
| ३ | दोन्हीही | २२१ | ६२.९६ |
| | एकूण | ३५१ | १०० |

वरील तक्ता क्र. ६ वरून असे दिसून येते की, कृषी उत्पन्न बाजार समितीत भाजीपाला विक्री करणाऱ्या शेतकऱ्याचे प्रमाण ३५.८९% असून, शेतकरी बाजारात भाजीपाला विक्री करणाऱ्या शेतकऱ्याचे प्रमाण १.१५% इतके नगण्य आहे, तर दोन्हीही बाजारात भाजीपाला विक्री करणाऱ्या शेतकऱ्याचे प्रमाण ६२.९६% आहे. यावरून असे सांगता येते की, दोन्हीही बाजारात भाजीपाला विक्री करणाऱ्या शेतकऱ्याचे प्रमाण सर्वाधिक आहे.

कृषी उत्पन्न बाजार समिती व शेतकरी बाजारातील शेतकऱ्याची जमीन कशा प्रकारची आहे, हे जाणून घेण्याच्या उद्देशाने तथ्य संकलित करून ते तक्ता क्र. ७ मध्ये मांडलेले आहे. यावरून शेतीच्या प्रकाराची माहिती स्पष्ट होते.

**तक्ता क्र. ७ शेतीच्या प्रकारानुसार वर्गीकरण**

| अ.क्र. | शेतीचा प्रकार | शेतकऱ्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | बागायती | २९३ | ८३.४७ |
| २ | जिरायती | २८ | ७.९८ |
| ३ | दोन्हीही | ३० | ८.५५ |
| | एकूण | ३५१ | १०० |

वरील तक्ता क्र. ७ वरून असे दिसून येते की, बाजार समितीतील शेतकऱ्याच्या शेतीच्या प्रकारानुसार वर्गीकरण केले असता ८३.४७ % शेतकऱ्याकडे बागायती जमीन आहे, तर ७.९८% शेतकऱ्याकडे जिरायती जमीन आहे तर दोन्हीही (बागायती / जिरायती) असणाऱ्या शेतकऱ्याचे प्रमाण हे ८.५५% इतके असल्याचे दिसून येते. यावरून असे निदर्शनास येते की, बागायती शेती असणाऱ्या शेतकऱ्याचे प्रमाण

सर्वात जास्त आहे.

कृषी उत्पन्न बाजार समितीबाबत भाजीपाला उत्पादक शेतकऱ्यांचे मत विचारात घेऊन तथ्य संकलित करून ते तक्ता क्र. ८ मध्ये मांडलेले आहे. यावरून भाजीपाला उत्पादक शेतकऱ्यांचे बाजार समितीविषयी मत स्पष्ट होते.

**तक्ता क्र. ८ कृषी उत्पन्न बाजार समितीविषयी भाजीपाला उत्पादक शेतकऱ्यांचे मत**

| अ.क्र | विवरण | कृषी उत्पन्न बाजार समितीविषयी शेतकऱ्यांचे मत (%) | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | पूर्ण सहमत | सहमत | सांगता येत नाही | असहमत | पूर्ण असहमत | एकूण |
| १ | बाजार समितीत योग्य दर मिळतो | १६.२५ | २५.३५ | ४.२७ | २३.३५ | २६.७८ | १०० |
| २ | बाजार दराबाबत समाधानी आहात | १५.६६ | १४.८१ | ७.९९ | ४८.१४ | १३.३० | १०० |
| ३ | बाजार समितीत चांगली वागणूक मिळते. | २७.६३ | ४८.१४ | ३.४४ | ८.८३ | ११.९६ | १०० |
| ४ | बाजार समितीतील सोयी सुविधांबाबत समाधानी आहात | २६.२२ | ३९.०३ | ५.९८ | १८.८० | ९.९७ | १०० |
| ५ | बाजार समितीत बाजार दर ठरविण्यात पारदर्शकता आहे. | २३.६८ | २४.५० | ३३.९३ | ११.११ | ६.८८ | १०० |

वरील तक्ता क्र. ८ वरून असे दिसून येते की, कृषी उत्पन्न बाजार समितीत योग्य दर मिळतो, याविषयी पूर्ण सहमत आणि असहमत असणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रमाण अनुक्रमे १६.२५ व २५.३५% असून असहमत आणि पूर्ण सहमत असणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रमाण २३.३५ व २६.७८% असल्याचे दिसून येते, तर सांगता येत नाही असे मत असणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रमाण ४.२७% आहे.

बाजार समितीत मिळणाऱ्या दराबाबत समाधानी आहात, याविषयी पूर्ण सहमत आणि सहमत असणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रमाण १५.६६ व १४.८१% आहे, तर असहमत व पूर्ण असहमत असणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रमाण ४८.१४ व १३.३९% असल्याचे दिसून येते, तर सांगता येत नाही असे मत असणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रमाण ७.९९% असल्याचे स्पष्ट होते. बाजार समितीत चांगली वागणूक मिळते, याविषयी पूर्ण सहमत व सहमत असणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रमाण अनुक्रमे २७.६३ व ४८.१४% दिसून येते, तर असहमत व पूर्ण असहमत असणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रमाण ८.८३ व ११.९६% आहे, तर सांगता येत नाही असे मत असणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रमाण ३.४४% असल्याचे दिसून येते. बाजार समितीत मिळणाऱ्या सोयी-सुविधांबाबत शेतकऱ्यांचे मत विचारात घेतले असता पूर्ण सहमत व सहमत असणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रमाण २६.२२ व ३९.०३% असल्याचे दिसून येते, तर असहमत व पूर्ण असहमत असणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रमाण १८.८० व ९.९७% आहे तर सांगता येत नाही असे मत असणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रमाण ५.९८% असल्याचे दिसून येते. बाजार समितीत बाजार दर ठरविण्यात पारदर्शकता असणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रमाण २३.६८ व २४.५०%आहे, तर असहमत व पूर्ण असहमत असणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रमाण ११.११ व ६.८८% असून सांगता येत नाही, असे मत असणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रमाण ३३.९३% असल्याचे निदर्शनास येते.

शेतकरी बाजारात भाजीपाला उत्पादक शेतकऱ्याच्या मताविषयीची माहिती संकलित करून ते तक्ता क्र. ९ मध्ये मांडलेली आहे. यावरून शेतकरी बाजाराविषयी भाजीपाला उत्पादक शेतकऱ्याचे मत स्पष्ट होते.

**तक्ता क्र. ९ शेतकरी बाजाराविषयी भाजीपाला उत्पादक शेतकऱ्याचे मत**

| अ.क्र | विवरण | शेतकरी बाजाराविायी शेतकऱ्यांचे मत (%) | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | पूर्ण सहमत | सहमत | सांगता येत नाही | असहमत | पूर्ण असहमत | एकूण |
| १ | शेतकरी बाजारात योग्य दर मिळतो. | २७.३६ | २३.९० | २.४८ | २९.३५ | १६.९१ | १०० |
| २ | शेतकरी बाजारातील दराविषयी समाधानी आहात. | १४.४४ | ३०.८४ | २.९८ | २७.८६ | २३.८८ | १०० |
| ३ | शेतकरी बाजारात तुलनेने जास्त नफा मिळतो. | २४.३९ | ३७.८१ | २.९८ | २२.८८ | ११.४४ | १०० |
| ४ | शेतकरी बाजारात ग्राहकाकडून चांगला प्रतिसाद मिळतो. | २५.८५ | ४६.२९ | १८.९० | ५.४७ | ०.४९ | १०० |
| ५ | शेतकरी बाजारात पूर्ण माल विकला जात नाही. | ३५.८२ | ३५.३३ | १७.४१ | ११.४४ | - | १०० |
| ६ | शेतकरी बाजारात विक्रीसाठी मनुष्यबळाची कमतरता भासते. | ३५.३२ | ३६.८१ | २.९८ | २४.४० | ०.४९ | १०० |
| ७ | शेतकरी बाजारात विक्रीसाठी तीव्र स्पर्धेचा सामना करावा लागतो. | ३४.८२ | ५४.७३ | ५.४९ | ४.४७ | ०.४९ | १०० |
| ८ | शेतकरी बाजारात ग्राहकाकडून किंमतीमध्ये घासाघीस (सौदेबाजी) केली जाते. | ४१.२९ | ४७.७८ | ८.९५ | ०.९९ | ०.९९ | १०० |
| ९ | शेतकरी बाजारात प्रशासनाकडून सहकार्य मिळत नाही. | ४७.७६ | १६.९१ | १४.४४ | १६.४१ | ४.४८ | १०० |
| १० | शेतकरी बाजारात सेंद्रिय/नैसर्गिक उत्पादनाच्या अधिकचा दर मिळतो. | ९.९५ | १२.९३ | २६.३८ | ३१.८४ | १८.९० | १०० |


वरील तक्ता ९ वरून असे दिसून येते की, शेतकरी बाजारात योग्य दर मिळतो, याविषयी पूर्ण सहमत व सहमत असणाऱ्या शेतकऱ्याचे प्रमाण २७.३६ व २३.९०% आहे तर असहमत आणि पूर्ण असहमत असणाऱ्या शेतकऱ्याचे प्रमाण २९.३५ व १६.९१% असल्याचे दिसते, तर सांगता येत नाही असे मत असणाऱ्याचे प्रमाण २.४८% असल्याचे स्पष्ट होते. शेतकरी बाजारातील दराविषयी असहमत व सहमत असणाऱ्या शेतकऱ्याचे प्रमाण २७.८६ व २३.८८% आहे. यावरून असे दिसते की, निम्म्यापेक्षा जास्त शेतकरी बाजारातील दराबाबत समाधानी नाहीत. शेतकरी बाजारात तुलनेने जास्त नफा मिळतो याविषयी पूर्ण सहमत व सहमत असणाऱ्या शेतकऱ्याचे प्रमाण २४.३९ व ३७.८१% आहे. यावरून असे दिसते की, तुलनेने शेतकरी बाजारात जास्त नफा मिळतो, असे मत असणाऱ्या शेतकऱ्याचे प्रमाण सर्वाधिक आहे. ग्राहकांच्या प्रतिसादाबाबत शेतकऱ्याचे पूर्ण सहमत व सहमत याचे प्रमाण २५.८५ व ४६.२९ एवढे दिसून

येते. यावरून शेतकरी बाजारात ग्राहकांचा चांगला प्रतिसाद मिळतो हे सिद्ध होते. शेतकरी बाजारात पूर्ण माल विकला जात नाही याविषयी ७० टक्केपेक्षा जास्त शेतकरी सहमत व पूर्ण सहमत असल्याचे स्पष्ट होते. विक्रीसाठी मनुयबळाची कमतरता भासते याविषयी ७२%पेक्षा जास्त शेतकरी सहमत व पूर्ण सहमत असल्याचे दिसते. शेतकरी बाजारात तीव्र स्पर्धेचा सामना करावा लागतो, याविषयी ९०% शेतकरी सहमत व पूर्ण सहमत आहेत तर ग्राहकाकडून किंमतीमध्ये घासाधीस (सौदेबाजी) याविषयी ८९%पेक्षा जास्त शेतकरी सहमत असल्याचे दिसून येते. स्थानिक प्रशासनाकडून सहकार्य मिळत नाही, असे मत असणाऱ्या शेतकऱ्याचे प्रमाण ४७.७६ व १६.९१% असल्याचे दिसून येते, तर शेतकरी बाजारात सेंद्रिय / नैसर्गिक उत्पादनास अधिकचा दर मिळतो याविषयी असहमत व पूर्ण असहमत असणाऱ्या शेतकऱ्याचे प्रमाण सर्वाधिक म्हणजेच ३१.८४ व १८.९०% असल्याचे दिसून येते.

कृषी उत्पन्न बाजार समिती आणि शेतकरी बाजारात भाजीपाला विक्री करणाऱ्या शेतकऱ्यांच्या मिळणाऱ्या लाभाची माहिती जाणून घेण्याच्या हेतूने तथ्य संकलित करून ते तक्ता क्र. १० मध्ये दाखविलेले आहे. यावरून भाजीपाला उत्पादक शेतकऱ्यांना मिळणाऱ्या लाभाची माहिती स्पष्ट होते.

**तक्ता क्र. १० कृषी उत्पन्न बाजार समिती आणि शेतकरी बाजारामध्ये शेतकऱ्यांना मिळणाऱ्या नफ्याचे प्रमाण**

| अ.क्र | नफ्याचे प्रमाण | कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये नफ्याचे प्रमाण (%) | शेतकरी बाजारात नफ्याचे प्रमाण (%) |
|---|---|---|---|
| १ | २० टक्के पेक्षा कमी | ७३.२४ | २६.८६ |
| २ | २० टक्के ते ४० टक्के | २४.७८ | ६०.६९ |
| ३ | ४० टक्के पेक्षा जास्त | १.९९ | १२.४३ |
| | एकूण | १०० | १०० |




आलेख : कृषी उत्पन्न बाजार समिती आणि शेतकरी बाजारात मिळणाऱ्या नफ्याचे प्रमाण दर्शविणारा आलेख.

वरील तक्ता क्र. १० व आलेखावरून असे दिसून येते की, २० टक्केपेक्षा कमी नफा असणाऱ्या शेतकऱ्याचे प्रमाण कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये ७३.२४% आहे. तर शेतकरी बाजारामध्ये २६.८६% आहे. तसेच २० ते ४०% दरम्यान नफा असणाऱ्या शेतकऱ्याचे प्रमाण कृषी उत्पन्न बाजार समितीपेक्षा शेतकरी बाजारात जास्त म्हणजेच ६०.६९% असल्याचे दिसून येते. त्याचबरोबर ४०% पेक्षा जास्त नफा असणाऱ्या शेतकऱ्याचे प्रमाण शेतकरी बाजारात कृषी उत्पन्न बाजार समितीपेक्षा तुलनेने जास्त म्हणजेच १२.४३% असल्याचे दिसून येते.

**गृहीतकृत्याची पडताळणी :**

१. मूळ परिकल्पना : कृषी उत्पन्न बाजार समिती आणि शेतकरी बाजार या दोन्ही बाजारात भाजीपाला विक्री करणाऱ्या शेतकऱ्यांना मिळणारा नफा समान आहे.

विरुद्ध

१.१पर्यायी परिकल्पना : कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये २०% पेक्षा कमी नफा असणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रमाण हे शेतकरी बाजरापेक्षा जास्त आहे.

सदरचे गृहीतक दोन नमुना प्रमाण चाचणी (Two Sample Proportion Test – Z Test) ने तपासले असता Z ची किंमत (मूल्य) = ११.८३ आणि P चे मूल्य हे ०.०५ (५%) लक्षणीय पातळीपेक्षा कमी असल्याने सदरची मूळ परिकल्पना नाकारण्यात येते आणि पर्यायी परिकल्पना स्वीकारण्यात येते.

१.२ शेतकरी बाजारात भाजीपाला विक्री करणाऱ्या २० ते ४०% दरम्यान नफा असणाऱ्या शेतकऱ्याचे प्रमाण कृषी उत्पन्न बाजार समितीपेक्षा जास्त आहे.

सदरचे गृहीतक दोन नमुना प्रमाण चाचणीने तपासले असता Z ची किंमत (मूल्य) = ८.६६ आणि P चे मूल्य हे ०.०५ (५%) लक्षणीय पातळीपेक्षा कमी असल्याने सदरची मूळ परिकल्पना नाकारण्यात येते आणि पर्यायी परिकल्पना स्वीकारण्यात येते.

१.३ शेतकरी बाजारात ४०%पेक्षा जास्त नफा असणाऱ्या शेतकऱ्याचे प्रमाण कृषी उत्पन्न बाजार समितीपेक्षा जास्त आहे.

सदरचे गृहीतक दोन नमुना प्रमाण चाचणी ने तपासले असता Z ची किंमत (मूल्य) = - ४.२७ आणि P चे मूल्य हे ०.०५ (५%) लक्षणीय पातळीपेक्षा कमी असल्याने सदरची मूळ परिकल्पना नाकारण्यात येते आणि पर्यायी परिकल्पना स्वीकारण्यात येते.

**निष्कर्ष :**

१. पुणे शहरातील कृषी उत्पन्न बाजार समिती आणि शेतकरी बाजारामध्ये भाजीपाला उत्पादक शेतकऱ्याचे वार्षिक उत्पन्नानुसार वर्गीकरण केले असता रु.३ लाखापर्यंत वार्षिक उत्पन्न असणाऱ्या शेतकऱ्याचे प्रमाण ८६.०५% एवढे दिसून येते, तर रु.३ लाख ते ६ लाख दरम्यान वार्षिक उत्पन्न असणाऱ्या शेतकऱ्याचे प्रमाण ९.९७% आहे, तर सर्वात कमी ३.९८% प्रमाण रु.६ लाखांपेक्षा जास्त उत्पन्न असणाऱ्या शेतकऱ्याचे आहे.
२. शेतकऱ्याचे जोडधंद्यानुसार वर्गीकरण केले असता भाजीपाला उत्पादनाबरोबर जोडधंदा असणाऱ्या शेतकऱ्याचे प्रमाण १९.०९% असून, जोडधंदा नसणाऱ्या शेतकऱ्याचे प्रमाण हे जास्त असून ते ८०.९१% एवढे दिसून येते.
३. भाजीपाला उत्पादक शेतकऱ्याच्या उत्पादनाच्या प्रकारानुसार रासायनिक पद्धतीने भाजीपाला उत्पादन घेणाऱ्या शेतकऱ्याचे प्रमाण सर्वाधिक म्हणजे ५९.५५% असून रासायनिक व सेंद्रिय असे दोन्हीही उत्पादन घेणाऱ्या शेतकऱ्याचे प्रमाण ३०.४८% आहे, तर फक्त सेंद्रिय उत्पादन घेणाऱ्या शेतकऱ्याचे प्रमाण फक्त ९.९७% असल्याचे दिसून येते.
४. भाजीपाला उत्पादनानुसार फक्त फळभाज्याचे उत्पादन करणाऱ्या शेतकऱ्याचे प्रमाण १४.२५% आहे, तर फक्त पालेभाज्यांचे उत्पादन करणाऱ्या शेतकऱ्याचे प्रमाण ४५.३०% एवढे आहे, तर पालेभाज्या व फळभाज्या अशा दोन्हीही उत्पादन घेणाऱ्या शेतकऱ्याचे प्रमाण ४०.४५% असल्याचे

दिसून येते. यावरून असा निष्कर्ष निघतो की, पालेभाज्या उत्पादन घेणाऱ्या शेतकऱ्याचे प्रमाण जास्त आहे.

५. भाजीपाला बाजारानुसार वर्गीकरण केले असता फक्त शेतकरी बाजारात भाजीपाला विक्री करणाऱ्या शेतकऱ्याचे प्रमाण अगदीच नगण्य १.१५% असून, कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये विक्री करणाऱ्या शेतकऱ्याचे प्रमाण ३५.८९% आहे, तर सर्वात जास्त प्रमाण दोन्हीही बाजारात भाजीपाला विक्री करणाऱ्या शेतकऱ्याचे प्रमाण ६२.९६% असल्याचे दिसून येते.

६. भाजीपाला उत्पादक शेतकऱ्यांना मिळणाऱ्या नफ्याचा अभ्यास केला असता २०%पेक्षा कमी नफा असणाऱ्या शेतकऱ्याचे प्रमाण कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये ७३.२१% आहे, तर २० ते ४०% दरम्यान नफा मिळविणाऱ्या शेतकऱ्याचे प्रमाण तुलनेने शेतकरी बाजारात (६०.२९%) जास्त आहे. तर ४०%पेक्षा जास्त नफा असणाऱ्या शेतकऱ्याचे प्रमाण शेतकरी बाजारात १२.४३% असल्याचे दिसून येते. म्हणून तुलनात्मकदृष्ट्या लाभाचा विचार केल्यास शेतकरी बाजारात भाजीपाला उत्पादक शेतकऱ्यांना जास्त नफा मिळतो.

**शिफारशी :**

१. कृषी उत्पन्न बाजार समितीपेक्षा शेतकरी बाजारात भाजीपाला उत्पादक शेतकऱ्यांना तुलनेने जास्त नफा मिळत असल्यामुळे शेतकरी बाजारात सोयीसुविधांमध्ये सुधारणा करायला पाहिजे. अनेक शेतकऱ्यांना भाजीपाला विक्रीसाठी निश्चित ठिकाण नसल्यामुळे नियमित ग्राहक राखला जात नाही. त्यामुळे प्रशासनाने त्यांना पुरेशा प्रमाणात जागेची उपलब्धता करून द्यावी.

२. भाजीपाला उत्पादनापासून मिळणारा नफा विचारात घेता शेतकरी बाजारात शेतकऱ्यांना चांगल्या सोयीसुविधा उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

३. भाजीपाला उत्पादक शेतकऱ्याने बागायती शेती असणाऱ्या शेतकऱ्याचे प्रमाण तुलनेने जास्त असले, तर त्यांच्याकडे असणारे जलसिंचनाचे क्षेत हे वर्षभर पुरेल एवढे नाहीत. बरेच शेतकरी कोरडवाहू जमिनीत भाजीपाल्याचे उत्पादन घेतात. त्यासाठी शाश्वत किंवा वर्षभर पाणी शेतीसाठी मिळेल, यासाठी योजना राबविणे आवश्यक आहे.

४. रासायनिक भाजीपाला उत्पादनाऐवजी सेंद्रिय / नैसर्गिक भाजीपाला उत्पादनाला प्रोत्साहन देण्यासाठी रासायनिक व सेंद्रिय उत्पादनाची वेगवेगळी वर्गवारी करून सेंद्रिय उत्पादनास चांगली किंमत मिळवून देण्यास प्रयत्न करायला पाहिजे.

**७.संदर्भ सूची :**


1. Basu DD, 1999, Introduction to the Constitution of India, 18th edition, Wadhwa and Company, Nagpur PP 311, 431.
2. Dastagiri M.B., Ganesh Kumar, Dianas (2009) Innovative models in Horticulture marketing in India, National Centre for Agricultural Economics and Policy Research, New Delhi 110012.
3. Department of Agriculture, Co-operation & Farmers Welfare, Annual Report 2016-17.
4. Economic Survey of India, 2015-16 PP 68.
5. Economic Survey or India 2016-17 Vol. 2, Chapter 7, Agriculture and food Management. Pg. 165.
6. Indian Agriculture Report 2015-16 pg. 11.
7. Research Report 2010-11, Public Private Partnership in Agricultural Marketing – A Case study of Pune district, Maharashtra.
8. World Development Report 2008 Pg. 1.

९ दोरगे जी, भाजीपाला उत्पादन व विक्री व्यवस्थापन -सद्यस्थिती, कृषी पणन मित्र, नोव्हेंबर २०१३ पान नं. ८,९.


◆

# कृषी संजीवके

**आण्णा काका पाटील** †

पुस्तकाचे नाव - कृषी संजीवके
लेखक- प्रा. डॉ. वसंतराव जुगळे
प्रकाशन- संवाद प्रकाशन प्रा.लि., कोल्हापूर
पृष्ठ संख्या - १०३, किंमत- ११० रु.
ISBN- 978-93-8722-37-0

ज्येष्ठ कृषी अर्थतज्ज्ञ प्रा. डॉ. वसंतराव जुगळे यांचे 'कृषी संजीवके' हे संवाद प्रकाशन प्रा. लि., कोल्हापूर यांनी प्रकाशित केलेले शेतकऱ्यांचा हक्क आणि शेतीचा नवा विचार, कृषी पणन, नवी कृषी संजीवके व युवक आणि शेती या चार बाबींना स्पर्श करणारे २७ लेखांचा संग्रह असणारे अतिशय प्रेरणादायी व चैतन्यशील पुस्तक नुकतेच वाचून पूर्ण केले.

अर्थशास्त्रीय लेखन, संशोधन, चिंतन व विकासासाठी संजीवके पुरविणारे अर्थतज्ज्ञ प्रा. डॉ. वसंतराव जुगळे हे नेहमीच आपणास शेती, पाणी, कृषी पणन, सहकार, ग्रामीण बँकिंग व अशा अनेक आयामांनी लेखन करणारे लेखक, संशोधक म्हणून परिचित आहेत. कृषी क्षेत्राचा विविधांगी अभ्यास करणारे संशोधक म्हणून त्यांचे संशोधन, लेखन मान्यता पावले आहे. प्रा. डॉ. वसंतराव जुगळे हे एका बाजूला शेतीसंबंधी विविध समस्यांचा चिकित्सक अभ्यास करून खबरबात शासन दरबारी पोहचविण्यासाठी प्रयत्न करीत आहेत, तर दुसऱ्या बाजूला ग्रामीण भागातील युवा शेतकऱ्यांनी आधुनिकता हाताळावी म्हणून प्रबोधन करीत आहेत.

डॉ. वसंतराव जुगळे यांच्या दै. तरुण भारत, दै. सकाळ, दै. लोकमत आणि दै. महाराष्ट्र टाइम्स मधून प्रसिद्ध झालेल्या कृषीविषयक विविध लेखांचे संपादन प्राचार्या डॉ. सौ. योजना जुगळे यांनी केले आहे.

कृषी संजीवके प्रामुख्याने चार भागांत विभागलेली आहेत. पहिल्या भागामध्ये १७ लेखांच्या माध्यमातून शेतकऱ्यांचा हक्क आणि शेतीचा नवा विचार लेखकांनी मांडण्याचा नेहमीप्रमाणे प्रयत्न केला आहे. २१ व्या शतकात जागतिक पातळीवर कृषी तंत्रज्ञान वेगाने वृद्धिंगत होत आहे. नव नवे बदल कृषी क्षेत्रात येत आहेत आणि भविष्यातही येतील, परंतु त्यातील ज्ञान मात्र शेतकऱ्यांना अवगत नाही, सामान्य शेतकऱ्याला दूरस्थ संवेदनांची (Remote Sensing) शेती, पोषक शेत (Nutri Farm) सुरक्षित अन्नव्यवस्था, बिनतारी शेती

† अध्यक्ष, व्यावसायिक अर्थशास्त्र अभ्यास मंडळ, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर आणि सहयोगी प्राध्यापक, सद्गुरू गाडगे महाराज कॉलेज (स्वायत्त) कराड.
आजीव सभासद क्र. ११९६, भ्रमणध्वनी : ९८२२२४९०८२, ई-मेल - akpatilpune@gmail.com

(Wireless Agriculture), हवामान हुशार शेती (Climate Smart Agriculture), परिवर्तनीय खतांचा वापर, तण मापन, पाण्याच्या गुणवत्तेचे मापन अशा नवनवीन कृषी पद्धती समजून येत नाहीत. यासाठी शेती व्यवस्थेमध्ये बुद्धिमान युवा शास्त्रज्ञांची गरज निर्माण झाली आहे. याविषयी लेखकांनी विस्तृत विवेचन केले आहे. जागतिक व्यापार संघटना शेती अर्थसाहाय्यावर बंदी घालण्याचा सतत आग्रह करीत आहे. मात्र शेतमालाला उत्पादन खर्चावर आधारित किंमत मिळत नाही तोपर्यंत अर्थसाहाय्य हा शेतकऱ्यांचा हक्क आहे, अशा प्रकारची नम्र पण आग्रही भूमिका लेखकाने मांडली आहे.

देशातील उपलब्ध हवा, पाणी, जमीन, जंगल, खाणी आणि सजीव सृष्टी या संसाधनांचे नियोजन होणे आवश्यक आहे, अन्यथा विकासाच्या नावाखाली संपूर्ण व्यवस्था विनाशाकडे जाईल, असा गर्भित इशारा लेखकाने 'विकासानेच विनाश होतो' या लेखाद्वारे दिला आहे. विकास हा हळूहळू होतो, विनाश हा एकदम ९० अंशांनी कोसळणारा असतो याचे भान ठेवले पाहिजे. यासाठी नैतिक व सामाजिक अनुकूल तंत्रज्ञानासाठी बिगर शासकीय संस्था, धार्मिक मठ, संप्रदाय व संघटनांनी ग्रामीण भागात सर्व जनतेचे समुपदेशन करावे, पर्यावरण जागृती व हवा, पाणी, जमीन, जंगल यांच्या अतिवापराचा धोका सामान्य शेतकऱ्यांना समजून सांगावा शेती व ग्रामीण समाज विनाशापासून वाचवा, शेती व्यवस्थेचे दुखणे कमी करण्यासाठी पर्यायी विकास नीती असावी यासाठी लेखकाने नेमकी कृषी संजीवके सुचविली आहेत.

दि. ८ नोव्हेंबर, २०१६ रोजी केलेली नोटाबंदी व दि. १ जुलै, २०१७ पासून लागू केलेला वस्तू व सेवा कर कसा शेती क्षेत्रावर चिंताजनक परिणाम करणारा आहे याचे अर्थशास्त्रीय सिद्धांताच्या आधारे विवेचन करणारे दोन लेख सरकारच्या डोळ्यांत अंजन घालणारे आहेत. नोटबंदीचा पहिला आघात फळबागायतीवर झाल्याचे आकडेवारीसह विवेचन, व्यवहार ठप्प झाल्याने उलटा गुणक कार्यरत होऊन झालेल्या प्रचंड नुकसानीचा हिशोब लेखकांनी आकडेवारीसह मांडून गृहपाठाशिवाय झालेली नोटबंदी असे वर्णन केले.

भारतीय कृषी पणन व्यवस्था हा नेहमी टीकेचा व चिंतनाचा विषय बनला आहे. एका बाजूला रास्त भावासाठी शेतकरी संघटना रस्त्यावर येत आहेत तर दुसरीकडे भाववाढीच्या प्रवृत्तीमुळे राजकीय ग्राहकांचे मोर्चे निघत आहेत. कृषी पणन व्यवस्थेबाबत चार लेख लिहून लेखकाने माहितीजाळ पणन, गट पणन, गट शेती आणि गट पणन या कृषी संजीवकांचा युवक पुढे येवून अंमल करतील असा आशावाद व्यक्त केला आहे. कर्नाटक राज्यातील कृषी पणन व्यवस्थेतील ई-मंडीचा अनुभव चांगला असून इतर राज्यांनी त्याचा अवलंब करावा. मृतावस्थेतील अनेक सामर्थ्य जिवंत करणे, फूड पार्क, धान्य महोत्सव, ॲग्रीकल्चर पार्क कृषीमालाची निर्यात, औषधी व आयुर्वेदिक पदार्थांची निर्मिती इत्यादी कृषी संजीवके कृषी पणन सुधारण्यासाठी आवश्यक आहेत.

लेखकाने पुस्तकाच्या तिसऱ्या भागात नवी कृषी संजीवके सुचवून कार्बन शेतीविषयक विचार मांडून मातीला निष्पाप बालकाची उपमा दिली आहे. कार्बनची शेती म्हणजे हवेतील कार्बनचे प्रमाण कमी करून मातीत गाडणे, बिननांगराची पीक- संस्कृती, वनशेती, मातीतील बुरशीचे प्रमाण वाढविणे, मातीतील पाणी धारण क्षमता वाढविणे, अनुकूल सूक्ष्मजंतूंचे प्रमाण वाढविणे होय. कार्बन फार्मिंगचे टूल किट निर्माण करून ते तरुण शेतकऱ्यांच्या हाती द्यावे त्यासाठीचे प्रशिक्षण द्यावे आणि गावोगावी कार्बनशेती संस्थांची स्थापना करावी. अशा नवसंजीवकांच्या साहाय्याने ऑस्ट्रेलियाच्या धर्तीवर कार्बनशेतीचा कायदा भारत सरकारने करावा. हवामान बदलानुसार शेतीचा विकास करणे आवश्यक आहे.

पुस्तकाच्या चौथ्या आणि शेवटच्या भागात लेखक संशोधक युवकांच्या शोधत आहे. देशाची समाजव्यवस्था आणि अर्थव्यवस्था धोक्यात असते त्या वेळी युवकांना संशोधन करण्यास खूप चांगली संधी असते. भारतासारख्या युवकांच्या देशात ग्रामीण भागातील युवक शेतीसंलग्न व्यवसायात क्रांती करू शकतात. बुद्धिमान युवकांनी शेती विकासाचे आव्हान स्वीकारावयास पाहिजे, परंतु हा युवक अलीकडे राजकीय पक्षांच्या दावणीला बांधला जातो आहे अथवा विकृत धर्म-समाज-संघटनांच्या कार्याला समर्पित करीत आहे. यामुळे समाजव्यवस्था पक्षाघात (Paralyse) झाल्यासारखी बनत आहे. युवकांनी कृषी अर्थव्यवस्था आर्थिक दृष्टिकोनातून कृषी पर्यावरणीय क्षेत्र प्रारूपानुसार परिस्थितीचे अवलोकन करून प्रदेश, टापूनिहाय प्रारूप विकसित करावेत अशी हाक लेखकाने दिली आहे.

महाराष्ट्रातील सुमारे २०० आणि कर्नाटकातील ११७ तालुक्यांमध्ये सतत दुष्काळ हा पाचवीला पुजलेला आहे. या दोन्ही राज्यांतील काही प्रदेश दुष्काळाने तर उर्वरित प्रदेश अतिवृष्टी आणि महापुराने ग्रस्त आहेत. या दोन टोकाच्या हवामान स्थितीचा सामाजिक-आर्थिक व राजकीय परिणाम जनसामान्यांवर होत आहे. वारंवार पडणाऱ्या दुष्काळ निवारणासाठी लेखकाने संस्थात्मक संरचनेची कायमस्वरूपी संशोधन आणि विकास कार्यात व्यस्त राहणारी संस्था निर्माण करावी असे सुचविले आहे. लेखकाने कृष्णा व माण खोऱ्याचा सखोल अभ्यास करून दुष्काळी प्रदेशातील शेतीसाठी कोरडवाहू क्रांतीची गरज व्यक्त केली आहे.

डॉ. वसंतराव जुगळे यांनी आयुष्यभर अध्ययन, अध्यापन, चिंतन व संशोधन तळागाळातील दुर्बल, पिचलेल्या घटकाच्या हितासाठी कसे होईल याचाच कृतिशील विचार केल्याचे त्यांच्या लेखनातून जाणवते. समाजाशी घट्ट नाळ असणारे ते अंगभूत कृतिशील विचारवंत आहेत. सतत वाचन, संशोधन, लेखन व समाज प्रबोधन अशा चतु:सूत्रीच्या साहाय्याने संपूर्ण आयुष्य समाजासाठी व्यतीत करणाऱ्या शिक्षकांपैकी डॉ. वसंतराव जुगळे एक ठळक उदाहरण आहे. प्रस्तुत पुस्तकातून त्यांची ही ओळख अधिक घट्ट होते. अर्थशास्त्राच्या तथा शेतीशी संबंधीत असणाऱ्या प्रत्येक व्यक्तीने प्रस्तुत पुस्तक आपल्या संग्रही ठेवावे असे प्रकर्षाने नमूद करावेसे वाटते.

◆

## निवेदन

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या सर्व आजीव सदस्यांना व अर्थसंवाद लेखकांना कळविण्यात येते की, कार्यकारिणीच्या ठरावानुसार दि. १ एप्रिल २०२० पासून अर्थसंवाद हा '**तज्ज्ञ परिक्षित नियतकालीक**' करण्यात आलेला आहे. त्यामुळे यापुढील काळात अर्थसंवादचे लेख हे तज्ज्ञांकडून परिक्षण करुन घेऊन, गरजेनुरूप त्यामध्ये लेखकांकडून योग्य त्या सुधारणा करुन घेऊनच अर्थसंवादमध्ये प्रसिद्ध केले जातील. युजीसीचे बदलते धोरण आणि गुणवत्ता वाढीच्या अनुषंगाने सदर हितावह बदल अर्थसंवादमध्ये करण्यात आलेला आहे, याची सर्वांनी नोंद घ्यावी.

**- प्रमुख संपादक, अर्थसंवाद**

# आभासी चलनाचे मोहजाळ

**जे. एफ. पाटील** †

सध्या आभासी चलनाचे वारे आहे. चलन व्यवस्थेत (पत धरून) प्रत्यक्ष मर्यादित/ अमर्यादित विधीसिद्ध (legal) चलना (पत धरून) बरोबरचा धनादेश (cheque), विश्वासपत्रे, बँक पावत्या, कर्जरोखे (खाजगी व सरकारी), मौलिक धातू (सोने-चांदी), अत्यंत विरळ वस्तू, कंपन्यांचे समभाग यांचा ढोबळमानाने समावेश होतो. आता त्या बाजारात आभासी चलनांचा समावेश होत चालला आहे.

सध्या आभासी चलन भांडवल बाजारातील मत्तेचा एक प्रकार निश्चितच आहे. त्याची मागणी पुरवठा व्यवस्था आहे. अर्थात, त्याच्या मूल्यात सतत चढउतार होत असतात. विनिमयांचे सर्वमान्य/ सार्वत्रिक माध्यम किंवा हिशोबाचा एकक, वा संपत्तीचे साठप-माध्यम अशा अर्थाने आभासी चलनाला कायदेशीर मान्यता कुठेच नाही. वेगळ्या शब्दात असे म्हणता येईल की, पूर्वी देशभर, चाललेला कांही लोकांच्या पूर्ण विश्वासाचा ''आकड्यांचा खेळ''(संबंधित कागदी चिटोऱ्यांचा) असा प्रकार हा मानावा लागेल. आभासी चलनाला नियमित चलनाची प्रतिष्ठा देण्याचा प्रयत्न सर्वच देशात चालू आहे. एवढेच नव्हे; तर खाजगी आभासी चलनाऐवजी देशाच्या मध्यवर्ती बँकेचे अधिकृत आभासी चलन (central bank digital currency) सीबीडीसी- (The Crypto Currency and Regulation of official digital currency bill-2021) करण्याबद्दलही विचार चालू आहे. सध्या त्यासंबंधी एक सरकारी विधेयक संसदेत मांडले जात आहे. पण ढोबळमानाने असे म्हणता येईल की, बहुतेक सर्वच देशांत आभासी चलनाला अधिकृत नकार दिलेला दिसतो. सध्या अशा विविध आभासी चलनाला गुंतवणुकीचे माध्यम मत्ता म्हणून बऱ्यापैकी मान्यता मिळत चालली आहे. बऱ्याच आभासी चलनाची नोंद भारताच्या भांडवल बाजारात झाली आहे.

आभासी चलन- प्रत्यक्ष धातूमय वा नोट स्वरूपात उपलब्ध नसते. ही चलन व्यवस्था नोंदीच्या स्वरूपात, सरकार व मध्यवर्ती बँकेच्या नियंत्रणाबाहेर विकेंद्रित वित्तीय व्यवस्था असते. या बाजारात नव्या आशा-आकांक्षा घेऊन गुंतवणूक करणाऱ्या तरुण भांडवलदारांची, वित्तीय बाजाराच्या नव्या क्षितिजावरची गर्दी असते. त्यापैकी काही गुंतवणूकदारांचे प्राथमिक सूत्रच - ''जेवढे गमावण्याची तुमची क्षमता आहे तेवढेच गुंतवा'' असे आहे. बहुतेक लोक आभासी चलन या वस्तूबद्दल व त्यातील धोक्याबद्दल अनभिज्ञच आहेत.

† माजी अध्यक्ष, कार्याध्यक्ष व विश्वस्त, मराठी अर्थशास्त्र परिषद.
आजीव सभासद क्र. : ६२, भ्रमणध्वनी : ९४२२०४६३८२, ई-मेल : jfpatil@rediffmail.com

आभासी चलनाचे बाजारमूल्य सतत कमीजास्त होत राहते. समभागांच्या किंमतींना उद्योग संस्थेच्या प्राप्तीचा व प्रगतीचा आधार असतो; पण तसा कोणताच भौतिक आधार आभासी चलनाला असत नाही. उदा.एका नव्या आभासी चलनाची किंमत ३८ डॉलर्सवरून दोन दिवसांत ६२८.२३ डॉलर्स झाली. त्या आभासी चलनाचे मूल्य काही दिवसांत २८५६.६५ चढले व त्यानंतर ५ मिनिटात ते मूल्य फक्त ०.०००७ डॉलर्स इतके घसरले.

**प्रारंभ कथा**

जगाचे पहिले आभासी चलन बिटकॉईन २००८च्या वित्तीय आरिष्टापोटी जन्माला आले. २०१५-१६ पासून आभासी चलन अधिक लक्ष आकर्षित करू लागले. २०२० मध्ये भारतीय रिझर्व्ह बँकेने वित्तीय संस्थांवर लादलेली आभासी चलन व्यवहार बंदी रद्द केली व आभासी चलनाचे बाजारमूल्य झपाट्याने चढले. कारण, त्यातील गुंतवणूक वाढली.

टी - २० विश्वचषक क्रिकेट स्पर्धेच्या दरम्यान (ऑक्टोबर-नोव्हेंबर) सर्वत्र आभासी चलनाची चर्चा होती. कॉईन - स्विच कुबेर या प्लॅटफॉर्मवर आभासी चलनाची प्रसिद्धी मुख्यत: लहान, मध्यम शहरातील तरुण वर्गाला (झटकन श्रीमंत होऊ इच्छिणाऱ्या) आकर्षित करण्यासाठी होती. असेच स्पर्धक प्लॅटफॉर्म व त्यांचे जाहिरातदार वाढत चाललेत. आभासी चलन संस्थांनी या काळात जाहिरातीसाठी रु.५० कोटी खर्च केल्याचे कळते.

सध्या बाजारात पुढील नावाची आभासी चलने (कंसातील आकडे त्यांचे बाजारमूल्य दाखवितात)

बिटकॉईन - BTC (डॉलर्स १०३९७७,९६९४६१७)
ईथेरम - BTH (डॉलर्स ४९२,०९५,९९३,२०७)
बिनान्स कॉईन - BNB (डॉलर्स १००,१०४,४६,५५१)
टेदर - USAT (डॉलर्स ७३१२४६२०४३०)
सोलाना - SOL (डॉलर्स ५९८३१२२५१२३)
कार्डानो - ADA (डॉलर्स ५२०९१४६४३१५)
एक्सआरपी - ZRD (डॉलर्स ४५१०८,८४४२८६)
युएसडी कॉईन - USDC (डॉलर्स ३८०३३०१७००२)
पोलका.डॉट - DOT (डॉलर्स ३५,०५६ २२७७४)
डॉज कॉईन - DOGE (डॉलर्स २७,४१९१२००४२)

सध्या भारतात आभासी चलनाच्या बाजारात गुंतवणूक करणाऱ्यांची संख्या १.५ कोटी इतकी आहे व आभासी चलनाचे बाजार मूल्य ६०० कोटी डॉलर्सचे आहे, असे कळते. रुपयांमध्ये हे मूल्य ६ लाख कोटी रुपये होते.

आभासी चलन संस्थांच्या एका गटाने अशी जाहिरात केली आहे की, ब्लॉकचेन अँड क्रिप्टो असेटस् कौन्सिल (BACC) या संस्थेने घालून दिलेले स्वयंनियमनाची व्यवस्था वापरून करोडो गुंतवणूकदारांचे हित संरक्षण करण्याचा प्रयत्न केला जाईल.

भारतीय रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर श्री.शशिकांत दास यांनी आभासी चलनाच्या संदर्भात सावधगिरीची भूमिका घेतली आहे. आभासी चलनामुळे देशाच्या सामाजिक वित्तीय व आर्थिक स्थैर्यावर मोठा परिणाम संभवतो. कदाचित म्हणूनच - रिझर्व्ह बँक स्वत:चे आभासी चलन निर्माण करण्याचा विचार करीत आहे. भांडवल व विनिमय मंडळाचे अधिकारी वित्तीय मत्ता म्हणून आभासी चलन बाजाराचे नियंत्रण करू इच्छिते व तसाच विचार वित्त-संसदीय समितीचाही आहे. थोडक्यात, ''आभासी चलनावर बंदी घालण्याऐवजी नियंत्रण घालावे'', हा विचार अधिक प्रभावी होत चालला आहे. ही गुंतवणूक अधिक धोक्याची पण अधिक लाभाची आहे, असे मत श्री.निलेश शहा, कोटक - महिंद्रा मत्ता व्यवस्थापन कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक, यांनी व्यक्त केले आहे. त्या दृष्टीने गुंतवणूकदारांचे बोधन-शिक्षण होणे गरजेचे आहे. कोविद महामारीच्या काळात, आभासी चलन अनेक कुटुंबांना परमेश्वरी मदत वाटली.

तांत्रिक भाषेत आभासी चलनाचा अर्थ पुढीलप्रमाणे सांगता येईल - "A crypto currency is a medium of exchange - but is digital in format and uses encryption techniques to both control the

creation of monetary units and verify the exchange of money."

आभासी चलनाच्या बाबतीत खाजगी संगणकांची साखळी व्यवहारांची नोंद घेत राहतात. विनिमयांची खात्री करतात, त्यासाठी अनेक सांकेतिक कोडी सोडविली जातात. अशी कोडी सोडविणाऱ्यांना आभासी चलनात बक्षीस दिले जाते. याला IUZ - mining म्हणतात.

या सर्वांच्या मागे जे तंत्र विज्ञान आहे, त्याला ब्लॉकचेन म्हणतात. सतोशी नाकामोटो यांनी २००८च्या वित्तीय आरिष्टांमध्ये एक लेखापद्धती संकलिक केली. या लेखा पद्धतीत Block Chain is a method, Where the transactions and the value of money would be recorded digitally on a publicity available and open ledger that contains all the transactions ever made; albet it in an unonymous and encryted form." या खातेवहीला (ledger) ब्लॉकचेन (ठोकळा-साखळी) असे नांव आहे. ही खातेवही वाढत्या वापराबरोबर वाढतच जाते. सर्व व्यवहार, आकड्यांखेरीज सांकेतिक असतो.

अलीकडे आभासी चलनाप्रमाणेच ''स्थिरनाणे'' (stablecoin) हा नवीन शब्दप्रयोग पुढे येत आहे. स्थिरनाणे वा स्टेबलकॉईन हेही आभासी चलन आहे. पण त्याला डॉलरसारख्या आदेशी चलनाचा (flat currency) चा आधार असतो. कांही सार्वभौम सरकारे स्थिर नाण्यासाठी - हेथर, युएसडी कॉईन व फेसबुकचे (Diam) डायेम - यासारख्या मागणी करत आहेत. यामुळे आदेशात्मक चलन व आभासी चलन यांचा सांधा बळकट होवू शकेल.

आभासी चलन विकत घेण्याच्या पद्धती -

१. इतरांकडून विकत घेणे

२. नवे आभासी चलन निर्माण करणे. (mining)

इतरांकडून आभासी चलन विकत घेणेसाठी संबंधित विनिमय केंद्रात नोंदणी (KYC) करावी लागते. नंतर रुपयातील चलन क्रिप्टोकरन्सी वॅलेटमध्ये भरावे लागते. हे वॉलेट (पाकीट) एकमेव पत्त्यावर - स्वच्छंद पद्धतीने निवडलेला अंक व अक्षरे यांची जुळणी - यात पैसे भरावे लागतात. त्यासाठी नेट -बँकिंग किंवा इ-वॉलेटचा वापर करता येतो. सध्या भारतात MobiKwik हे इ-वॉलेट वझीरएक्स व कॉईनडीसीएक्स हे प्लॅटफॉर्म वापरू शकतात. व्यवहार पूर्ण होताच तुमच्या नावावर किती आभासी चलन आहे हे दिसून येते. आभासी चलनाची विक्री उपरोक्त पद्धतीच्या उलट दिशेने केली जाते. पण बहुतेक लहान बँकांत आवश्यक परिसेवा नाहीत. त्यामुळे देण्या-घेण्याच्या काही अडचणी निर्माण होतात.

**व्यावहारिक मर्यादा :**

आभासी चलन नेहमीच्या उपभोक्ता ग्राहक-विनिमय व्यवहारासाठी वापरले जाणार नाही. किरकोळ व्यवहारांचे ते माध्यम होईल, असे वाटत नाही. केन्सच्या चलन-धोरण हे हेतूपैकी ''जुगार'' हेतूसाठीच मुख्यत: आभासी चलनाचा वापर होईल. साहजिकच आभासी चलनाचे बाजारमोल सतत अस्थिर राहणार. चाणाक्ष लोक या अस्थिरतेतच त्यांचा नफा शोधणार. साहजिकच आभासी चलनाचा वापर ''वित्तीय मत्ता'' म्हणूनच करणे अधिक शहाणपणाचे. त्यासाठी वित्तीय चलनाचे व्यवहार सेबीमार्फतच नियंत्रित झाले पाहिजेत.

पण जुगारी लोकांच्या सोईसाठी सरकार पुरस्कृत - मध्यवर्ती बँक मान्य मक्तेदारी आभासी चलन सुरू करणे म्हणजे सर्वांनाच नाईलाजाने, कमी-अधिक प्रमाणात जुगारी करणे व त्या प्रक्रियेत भाववाढ नियंत्रण, विनिमय दर नियंत्रण, चलन विश्वास व एकूणच चलन धोरण निष्प्रभ करणे ही चलन इतिहासातील सर्वात दुर्दैवी घटना ठरेल.

**संदर्भ :**

१. जार्ज मॅथ्यू, प्रणव मुकुल, सनी वर्मा, हामजा खान व संदिप सिंग - क्रिप्टो कॅश - संडे एक्सप्रेस, २८/११/२०२१.

२. प्रणव मुकुल, अनिल ससी - डिजिटल करन्सीज अँड हौरे वर्क - संडे एक्सप्रेस, २८/११/२०२१.

◆

# होमो सॅपियन्स (Homo Sapiens)

**शि. ना. माने** †

"The age of chivalry is gone; that of sophisters, economists and calculators has succeceded" - Edmund Burke

**अनुवाद :** धार्मिक, नैतिक व सामाजिक संहितेचे मध्ययुगीन पर्व मागे पडले; आणि हुशार परंतु चतुर विवाद पटुंनी, अर्थशास्त्रज्ञांनी व परिगणन यंत्रांनी त्याची जागा घेतली आहे.

**प्रास्ताविक :**

अन्य सामाजिक शास्त्रांप्रमाणे अर्थशास्त्र हे एक उत्क्रांत होत जाणारे सामाजिक शास्त्र आहे. होमो सॅपियन्स ही अशीच उत्क्रांत किंवा उत्परिवर्तित झालेली संज्ञा आहे. त्याचा उत्तम दाखला म्हणजे एडमंड बर्क यांचे सुरुवातीला उद्धृत केलेले प्रसिद्ध विधान होय. आपण असे मानतो की, अर्थशास्त्राचा आरंभ किंवा उदय ॲडॅम स्मिथ यांच्या अर्थपरायण पुरुषाबरोबर झाला. उत्क्रांत अर्थशास्त्रात अर्थपरायण पुरुष, होमो सॅपियन्स (हुशार परंतु चलाख व चतुर) व आता २१व्या शतकातील होमो ड्युस (नव प्रज्ञाचलित महामानव) असे टप्पे दिसतात. या प्रचलित टप्प्यांना मला एक पुरवणी जोडण्याचा मोह अनावर होतो. अधिक तपशीलांती तथाकथित अर्थपरायण पुरुषाच्या मागे कित्येक शतके भारतीय प्राचीन वाङ्मयात काही संदर्भ मिळतात. उदाहरणार्थ, अर्थ शब्दाचे ज्ञेय वस्तू, लोक, शाश्वत, इत्यादी अर्थ सापडतात. अर्थपासून अर्थिन म्हणजे असणे, अस्तित्व, चरितार्थ इत्यादी पर्याय शंकराचार्यांनी दिले आहेत. नंतर त्यांचे बाळबोध परंतु आशयघन स्पष्टीकरण ज्ञानदेवांच्या काही ओव्यांत मिळते. पुढील दोन ओव्यांचा उल्लेख करू.

आम्ही पूर्णकाम (निष्काम) होऊनी।
जरी आत्मस्थिति राहुनी ।
तरी प्रजा है कैसेनि ।
निस्तरेल १।। (अ.उ.ओ.१६६)
जे पुढतपुढती पार्था ।
हे सकळ लोकसंस्था ।
रक्षणीय सर्वथा ।
म्हणौनिया ।। अ. उ. ओ. १७०

त्यांचा एकत्रित अर्थ पुढे दिला आहे. आम्ही निरिच्छ होऊन आत्मस्थितीतच राहिलो (कर्माचरण केले नाही), तर या प्रजेचा तरणोपाय कसा होईल?... म्हणून या

† माजी अध्यक्ष, मराठी अर्थशास्त्र परिषद, निवृत्त प्राध्यापक, धनंजयराव गाडगीळ वाणिज्य महाविद्यालय, सातारा. आजीव सभासद क्र. १०८, भ्रमणध्वनी : ७७३८३५६७८१

जगात समर्थ व सर्वज्ञानसंपन्न लोकांनी (पुढतपुढती) कर्माचा त्याग न करता लोकसमूहाचे सतत रक्षण केले पाहिजे.

अशा प्रकारे, स्मिथ यांच्यापूर्वी कित्येक शतके शंकराचार्यांनी अर्थपरायण पुरुषाचा पाया रचला. ज्ञानदेवांनी त्यावर मराठी भाषेचा साज चढविला. स्मिथ यांनी त्या पुरुषाला अर्थशास्त्रीय विश्लेषणाच्या चौकटीत टाकून त्याचा पाठपुरावा केला. त्यांच्यानंतर १५७ वर्षांनी केन्स यांनी 'इकॉनॉमिक पॉसिबिलीटीज फॉर अवर ग्रँड चिल्ड्रेन'(१९३३) मध्ये त्या पुरुषाची आर्थिक गरज त्याच्या प्राणीशास्त्रीय स्वभावाला कसा आकार देते, याविषयी निदान (ज्याचे सूतोवाच १३ व्या शतकाच्या उत्तरार्धात ज्ञानदेवांनी त्यांच्या उपरिनिर्दिष्ट ओव्यांत केले) करून त्यावर प्रकाश टाकला.

**स्वरूप :**

एवढ्या प्रस्तावनेनंतर आता त्या प्राण्याच्या स्वरूपाची साधक-बाधक चर्चा करू. तो प्राणी उत्परिवर्तित आहे. उत्परिवर्तनाच्या नियमानुसार तो बदलत जातो. ही गोष्ट ध्यानात घेऊन ही चर्चा केली आहे. होमो सॅपियन्स ही एक मानवरूप पेशी आहे. या जगात ती अन्य प्राण्यांपेक्षा जास्त शक्तिमान आहे. युवल नोहा हरारि यांनी त्यांच्या होमो ड्युस (२०१६) या प्रक्षोभक पुस्तकात म्हटल्याप्रमाणे मांस मिळावे म्हणून माणसे डुकरांचे पालन-पोषण करतात. परंतु डुकरांचा निर्वाह व त्यांचे पुनरुत्पादन करतात. हेतू हा की त्यांच्या मांसाचा अखंडितपणे पुरवठा व्हावा, त्यासाठी त्यांना जोखीम घ्यावीच लागते. त्यांच्याकडे दुर्दम्य इच्छाशक्ती असते. डुकरांकडे त्यांचा अभाव असतो.

**समारोप :**

होमो सॅपियन्स शिक्षित आहे. तो रक्षित आहे. परंतु तो सुरक्षित नाही. समाजमाध्यमांवर त्यांचा वावर आहे. तो त्यांचा जसा उपयोग करतो तसाच दुरुपयोगही करतो. राजकारणात त्याला रस आहे. एरवी मातृभाषेचे तो गोडवे गातो. मोठ्या बाता झोडतो. परंतु त्याची मुले विदेशात इंग्रजी माध्यमांत शिक्षण घेतात. तो वरून साळसूद वाटतो. प्रत्यक्षात येणाऱ्या संधीचा तो सर्वप्रथम फायदा घेतो. त्यावेळी तो इतरांचा क्वचितच विचार करतो. तो वरून साधू वाटतो खरा. परंतु प्रत्यक्षात तो संधीसाधू असतो. होमो सॅपियन्ससाठी संधीसाधू हा मराठी पर्याय समुचित वाटतो.

◆

**निवेदन : अर्थसंवाद**

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या ज्या आजीव सदस्यांना अंक मिळत नसेल किंवा पत्त्यात बदल झाला असेल तर त्यांनी प्रमुख संपादक, अर्थसंवाद यांच्याकडे तशा आशयाचे पत्र पाठवून त्या पत्रात आपला नवीन पत्ता लिहून पाठवावा; मात्र या पत्रात आजीव सदस्य क्रमांकाचा उल्लेख असणे अत्यंत गरजेचे आहे.

**- प्रमुख संपादक, अर्थसंवाद**

# अर्थसंवाद, एप्रिल-जून २०२१ च्या अंकामधील 'महाराष्ट्राच्या कृषी स्मशानाची राजकीय अर्थव्यवस्था...' या लेखावरील जुलै-सप्टेंबर २०२१ च्या अंकामधील प्रतिक्रियेवरील प्रतिभाष्य

**ज्ञानदेव चि. तळुले** †

**प्रास्ताविक :**

अर्थसंवाद, एप्रिल-जून २०२१ मधील माझ्या ''महाराष्ट्राच्या कृषी स्मशानाची राजकीय अर्थव्यवस्था: विदर्भ व मराठवाड्यातील सर्वाधिक शेतकरी आत्महत्याग्रस्त दोन जिल्ह्यांचा जनगणना अभ्यास (जानेवारी २०१४-डिसेंबर २०१७)'' या लेखावर संतोष दास्ताने यांनी 'अर्थसंवाद'च्या जुलै-सप्टेंबर २०२१ च्या अंकात एक प्रदीर्घ प्रतिक्रियात्मक लेख लिहिला आहे. त्या प्रतिक्रियेवर प्रस्तुत लेखात प्रतिभाष्य करणे हा माझा मूळ उद्देश आहे. अर्थात, संबंधित प्रतिक्रियेस मी टीका असेही संबोधत नाही किंवा अर्थसंवादमध्ये दास्ताने यांच्या लेखास जसे प्रतिक्रियेवरील प्रतिभाष्य असे शीर्षकात म्हटले असेही संबोधन द्यावे असे मला वाटत नाही. अर्थात, 'अर्थसंवाद'मधील प्रतिक्रियास्त्रोत माझा लेख संतोष दास्ताने यांनी अत्यंत काळजीपूर्वक वाचून त्यावर विस्तृत प्रतिक्रिया लिहिली याबद्दल मी त्यांचे आभार मानतो. किंबहुना, प्रस्तुत लेखावर प्रतिक्रिया लिहून मलाही त्यावर प्रतिभाष्य करण्यास त्यांनी उद्युक्त केले याबद्दल मी निश्चित समाधानी आहे. कारण अलीकडच्या काळात महाराष्ट्रात अशा प्रकारच्या संशोधनात्मक चर्चा फारशा होताना दिसून येत नसतानाच्या काळात माझा अर्थसंवादमधील प्रतिक्रियास्त्रोत लेख व त्यावरील संतोष दास्तानेंची प्रतिक्रिया आणि पुन:श्च माझे त्यावरील प्रतिभाष्य या सर्व ऊहापोहातून जर महाराष्ट्राच्या शैक्षणिक व संशोधन परीघावरील चर्चेची खंडित परंपरा पुन:श्चः सुरू होणार असेल तर मला आनंद व समाधान वाटणे निश्चित नैसर्गिक व समधानाची बाब आहे असे मी मानतो.

'अर्थसंवाद'मधील माझ्या लेखावर प्रतिक्रिया लिहिण्यापूर्वी दास्ताने यांनी दूरध्वनीवरून प्रतिक्रियास्त्रोत लेखाविषयी मला अनेक स्पष्टीकरणेही विचारली होती. प्रतिक्रियास्त्रोत लेखावर प्रतिक्रिया लिहिण्यापूर्वी त्यांनी आपण संबंधित लेखावर खुली व खुल्या मनाने चर्चा करूयात काय असेही मोकळेपणाने विचारले होते. अर्थात, त्याचवेळी मी दास्ताने यांना सहमती दर्शवून प्रस्तावित प्रतिक्रियेचे स्वागतच केले होते, असे मी अर्थसंवादच्या प्रस्तुत प्रतिभाष्य वाचकांना अवगत करू इच्छितो.

† प्राध्यापक व विभागप्रमुख, अर्थशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर-४१६००४.
आजीव सभासद क्र. ८१७, भ्रमणध्वनी : +९१-९४२३७५०५५५, ई-मेल : dnyanshrinit@gmail.com

**प्रतिक्रियेवरील प्रतिभाष्य :**

दास्ताने यांनी प्रतिक्रियेच्या सुरुवातीलाच उल्लेख केल्याप्रमाणे यापूर्वी या विषयावर मी स्वत: साधारणपणे २००९ पासून सातत्याने परिश्रमपूर्वक संशोधन करून अनेक मराठी व इंग्रजी भाषेतील प्रतिष्ठित संशोधन नियतकालिकांमधून लिखाण केले आहे. [१,२,३,४,५,६,७.]

अर्थात, या सर्व लिखाणाची तेव्हा तेव्हा योग्य ती दखलही घेतली गेल्याचे समाधान आहेच. उदाहरणार्थ, जून २०२० मधील इकॉनॉमिक ॲन्ड पॉलिटिकल विकली (खंड: LV, अंक: XXV, पृष्ठ: ११६-१२५) मध्ये प्रसिद्ध झालेल्या माझ्या विशेष प्रदीर्घ लेखाचा त्या वर्षातील सर्वोत्कृष्ट पाच लेखांत समावेशही झाला होता. लेखावरील प्रतिक्रियात्मक टिपण सुरू करण्यापूर्वी दास्ताने यांनी असा उल्लेख केला आहे की, स्वातंत्र्याला सत्तर वर्षे पूर्ण होऊन व कितीही प्रयत्न केले तरी शेतकरी आत्महत्या थांबायला तयार नाहीत. याविषयी एक बाब निश्चित व ठळकपणे नमूद करणे आवश्यक आहे की, कदाचित इतर शेतकरी आत्महत्याग्रस्त राज्यांत (उदा. केरळ, कर्नाटक, आंध्र प्रदेश (तेलंगणा) व पंजाब) हे प्रयत्न महाराष्ट्रापेक्षा अधिक जोरकसपणे, शिस्तबद्ध व काळजीपूर्वक झाले असावेत आणि त्यामुळेच कदाचित संबंधित राज्यातील शेतकरी आत्महत्याही कमी झाल्या असे आकडेवारीवरूनही सिद्ध होते. परंतु इतका राजकोषीय व नियोजनात्मक काळजीपूर्वकपणा मात्र दुर्दैवाने महाराष्ट्रात अनुभवास न आल्याने महाराष्ट्र राज्य देशातील शेतकरी आत्महत्याग्रस्ततेत अद्यापही पहिल्या क्रमांकावर असल्याचे दुर्दैवी वास्तव मान्य करावे लागेल. अर्थात, याविषयीची कारणमीमांसा मी माझ्या प्रतिक्रियास्रोत व त्यापूर्वीच्या इतर अनेक लेखांमध्ये विस्तृतपणे मांडली असल्याने व येथे त्याचे प्रयोजनही नसल्याने फक्त मुद्याला स्पर्श करून पुनरुक्ती टाळत आहे याची नोंद असावी.

प्रतिक्रियास्रोत लेखावरील प्रतिक्रियेच्या अगदी सुरुवातीसच दास्ताने यांनी संपादक व लेखक या दोघांकडेही दोषांगुलीनिर्देश करून लेखातील आलेख संख्या व त्यामध्ये वाचन व आकलनातील अडचणींचा

---

1. Dnyandev C. Talule (2011), Farmers' Suicides in Maharashtra : A Deceased Household Level Study of the Nine Suicide Prone Districts, The Indian Economic Journal, Special Issue, Dec. PP – 97 – 119, ISSN: 0019-4662, RNI Regn. No. 46913/87.
2. Dnyandev C. Talule (2012), Weak Penetration of Institutional Credit and Farmer's Suicides in Maharashtra, The Indian Journal of Agricultural Marketing, Vol. XXVI, No. I, ISSN: 0971-8664, Jan-April 2012, PP. 49-72.],
3. Dnyandev C. Talule (2020), Eligible Versus Ineligible Farmer Suicides in Maharashtra, 2001-2018 : Trends of Complexity Across Districts from Marathwada and Vidarbha, Journal of Shivaji University (Humanities and Social Sciences) (ISSN : 0368-4199) Vol. XXXXXIII, No. II.]

४. ज्ञानदेव तळुले (२०१०), महाराष्ट्रातील शेतकरी आत्महत्यांचे विविधांगी वास्तव, समाजप्रबोधन पत्रिका, बेळगाव (ISSN:0973=2845), I§S>XXXXVIII, अंक १८६, पृष्ठ ५४-८७.

५. ज्ञानदेव चि. तळुले (२०१९), महाराष्ट्रातील शेतकरी आत्महत्या; २००१-२०१८: मराठवाडा आणि विदर्भातील आत्महत्यांचे जिल्हानिहाय संख्यात्म, स्थलवास्तव, नियोजन व संकल्पनात्म परिप्रेक्ष्य विश्लेषण, अर्थसंवाद, I§S>XXXXII,अंकखत, पृष्ठ३२७-३५२.

६. Dnyandev C. Talule (2020), Farmer Suicides in Maharashtra, 2001-2018: Trends Across Marathwada and Vidarbha, Economic and Political Weekly, Vol. LV, No. XXV, ISSN: 0012-9976, OCLC: 46735231, pp. 116-125.

७. Dnyandev C. Talule (2020), Eligible Versus Ineligible Farmer Suicides in Maharashtra, 2001-2018 : Trends of Complexity Across Districts from Marathwada and Vidarbha, Journal of Shivaji University (Humanities and Social Sciences) (ISSN: 0368-4199) Vol. XXXXXIII, No. II.

उल्लेख केला आहे. परंतु आलेख संख्या जास्त असणे काही नवीन अथवा चुकीचे नाही. कारण अनेक प्रथितयश संशोधन नियतकालिकांमधील प्रदीर्घ लेखांमध्ये अशी आलेख संख्या असण्याची अनेक उदाहरणे आहेत. अर्थात, अर्थसंवादमधील पानांची मर्यादा लक्षात घेता कदाचित संपादकांना आलेखांचा आकार लहान करावा लागला असणार व त्यामुळे आलेखातील माहिती अधिक सूक्ष्म होऊन वाचनात काही प्रमाणात अडथळे आले असावेत असे वाटते. परंतु विश्लेषण मात्र आलेखस्त्रोत आकडेवारीवरच निर्भर असते व आलेख नेहमी प्रतीकात्मक असतात ही बाब येथे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे. दास्ताने यांनी उल्लेख केलेले आलेख क्रमांक ११, १८ व १९ मधील प्राथमिक माहिती निश्चितपणे महत्त्वाची आहेच. परंतु आलेख आकारमानामुळे त्यात काही दृक मर्यादा आल्या असतीलही. परंतु विशेषकरून आलेख क्रमांक १८ व १९ हे इतक्या लांब (उंच) व रुंद प्राथमिक माहिती पृथक्करणावर आधारित आहेत की त्यांचे मूळ स्त्रोत आकडेवारी दर्शविणारे तक्ते अर्थसंवादच्या पृष्ठावर सामावणे शक्य नसल्याने आलेखांचा आधार घेतला आहे याची नोंद घेणे आवश्यक आहे. अर्थात, हे सर्व आलेख प्रतीकात्मक असून उपरोल्लेख केल्याप्रमाणे विश्लेषणाचा मूळ आधार तसेच लेखातील विश्लेषण प्राथमिक माहिती पृथक्करणाधारितच असल्याने आलेख काय ध्वनिमुद्रित करतात यासंबंधीची कल्पना काळजीपूर्वक वाचताना वाचकास येऊ शकते याविषयी शंका नसावी असे वाटते. असाच मुद्दा दास्ताने यांनी आलेख क्रमांक १, २, ४ व १८ (पुनरुक्ती) बाबत मांडला आहे. याविषयीही भाष्य करताना मी उपरोल्लेखित विश्लेषणाकडेच अंगुलीनिर्देश करीन. कारण आलेख क्रमांक ४ व ५ हे प्राथमिक माहिती स्त्रोत व संकलन पद्धती विश्लेषित करतात आणि त्यात दोन्ही सर्वेक्षित जिल्ह्यांतील एकूण तालुके, गावे व तालुकानिहाय आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांची संख्या दर्शवितात. यामध्ये अनाकलनीय किंवा अवाचनीय असे काही आहे असे निश्चित नाही. अर्थात, याविषयी दास्ताने किंवा इतर कोणीही अर्थसंवाद वाचकास काही शंका असेल तर संपूर्ण माहिती विश्लेषण करणारे तक्ते माझ्याकडे उपलब्ध आहेत. आता प्रश्न उरतो तो आलेख क्रमांक १, २ व ३ संबंधी. प्रस्तुत सर्व आलेख शेतकरी आत्महत्यांवरील द्वितीय माहिती किंवा आकडेवारीवर निर्भर आहेत. याविषयी मला असे नमूद करणे आवश्यक आहे की, यापूर्वीच्याही अनेक लेखांत मी असेच आलेख मांडले आहेत. तसेच इतर अनेक प्रथितयश अर्थशास्त्रीय नियतकालिकांमधून आकडेवारीऐवजी आलेखांचा वापर केला जातोच आहे. किंबहुना, अलीकडच्या काळात सहजी लेखनचौर्यस्फूर्ती टाळण्यासाठी किंवा इतर आळशी संशोधकांना परावृत्त करण्यासाठी अनेक संशोधक-लेखक व नियतकालिकेही प्रत्यक्ष आकडेवारी देण्याचे टाळतात. याबाबत माझा इकॉनॉमिक ॲन्ड पॉलिटिकल विकली (खंड : LV, अंकः XXV, पृष्ठः ११६-१२५), जून २०२० मधील लेखाविषयीचा अनुभव नमुनेदाखल आहे. कारण माझा संबंधित लेख २००१ ते २०१८ अशा अठरा वर्षांच्या शेतकरी आत्महत्यांवरील द्वितीय माहितीस्त्रोतांवर आधारित होता. संबंधित लेखातही एकूण २६ आलेख होते.[८,९] अर्थात, तेव्हा आलेख संख्या किंवा आलेख

---

८. Dnyandev C. Talule (2011), Farmer's Suicides in Maharashtra : A Deceased Household Level Study of the Nine Suicide Prone Districts, The Indian Economic Journal, Special Issue, Dec. PP – 97 – 119, ISSN: 0019-4662, RNI Regn. No. 46913/87.
९. Dnyandev C. Talule (2020), Farmer's Suicides in Maharashtra, 2001-2018: Trends Across Marathwada and Vidarbha, Economic and Political Weekly, Vol. LV, No. XXV, ISSN: 0012-9976, OCLC: 46735231, pp. 116-125.

आकलनाविषयी शंका उपस्थित झाल्या नव्हत्या. कारण उपरोल्लेख केल्याप्रमाणे आलेख प्रतीकात्मक असून विश्लेषण नेहमी आलेखस्त्रोत आकडेवारीवर निर्भर असते आणि याकामी संशोधन नियतकालिकातील वाचकाने जाणीव ठेवणे आवश्यक असते. कारण संशोधन नियतकालिकाचा वाचक स्वत:ही एक संशोधक व जाणकार असतो असे प्रस्तुत लेखक मानतो. त्यावेळी मला परदेशी विद्यापीठात भारतातील शेतकरी आत्महत्यांवर पीएच. डी. संशोधक विद्यार्थी व मार्गदर्शकांनी ई-मेलद्वारे कौतुक करून मूळ आकडेवारी व माहितीची मागणी केली होती व ती न दिल्याने माझ्यावर रागही व्यक्त केला होता. हा वैयक्तिक अनुभव मी येथे मुद्दामहून उद्धृत करू इच्छितो.

यानंतर दास्ताने यांनी आश्चर्यकारक असे दोन मुद्दे उपस्थित केले आहेत. त्याबाबत मात्र मला जरा खेद वाटतो. कारण हे मुद्दे प्रतिक्रियास्त्रोत लेखाच्या शीर्षकाविषयी असून प्रतिक्रियास्त्रोत लेखाचे शीर्षक चुकीचे आहे, असे त्यांचे थोडक्यात मत आहे. याविषयी भाष्य करताना त्यांनी 'राजकीय अर्थव्यवस्था' व 'दोन जिल्ह्यांचा जनगणना अभ्यास' याविषयी आक्षेप नोंदविला असून प्रतिक्रियास्त्रोत लेखाचे शीर्षक कसे चुकीचे आहे असे थोडक्यात नमूद केले आहे. प्रथमत: त्यांनी राजकीय अर्थव्यवस्था याविषयी आक्षेप घेतला असून व राजकीय अर्थव्यवस्थेचा जो अर्थ त्यांच्या प्रतिक्रियेत नमूद केला आहे तो चुकीचा आहे. कारण राजकीय अर्थव्यवस्थेत अर्थशास्त्र, समाजशास्त्र व राज्यशास्त्र इत्यादी विषयांसंबंधी आंतरविषयी स्वरूपाचे भाष्य व विश्लेषण अपेक्षित असते. परंतु दास्ताने यांनी मात्र राजकीय अर्थव्यवस्थेचा अर्थ नमूद करताना संबंधित जिल्हा/प्रदेशातील जनमत कोणत्या राजकीय पक्षाच्या बाजूने आहे याविषयीचा मुद्दा उपस्थित केला आहे. याविषयी मी अधिक भाष्य न करता वाचकांनी निम्नउद्धृत तळटीप नमूद संदर्भाकडे पहावे अशी विनंती करतो आणि प्रस्तुत मुद्यावरील भाष्य संपवितो.[१०,११]

आणि यापूर्वी उल्लेख केल्याप्रमाणे महाराष्ट्रातील शेतकरी आत्महत्यांचे अविरत सातत्य हे या राज्यातील कृषीविषयी सातत्यपूर्वक नकारात्मक राजकीय अर्थव्यवस्था, राजकोषीय दुर्लक्ष व कृषी धोरण लकवा निर्भर आहे. हे फक्त माझेच नव्हे, तर प्रस्तुत विषयावर यापूर्वीही संशोधन केलेल्या इतर अनेक संशोधकांचेही असेच मत आहे (कृपया तळटीप पहा).[१२,१३] आता राहिला प्रश्न तो दोन जिल्ह्यांचा- जनगणना अभ्यास

१०. The meaning of the Political Economy defined by the quarterly "Journal of Economic Literature" published by the American Economic Association is as follows; Political economy most commonly refers to interdisciplinary studies drawing upon economics, sociology and political science in explaining how political institutions (For Example Planning Commission, NITI AYOG, Finance Commissions, Central and State Ministries…etc.), the political environment and the economic systemcapitalist, socialist, communist, or mixed influence each other. The Journal of Economic Literature classification codes associate political economy with three sub-areas: (1) the role of government and/or class and power relationships in resource allocation for each type of economic system (Source: https://en.wikipedia.org/wiki/Political_economy)..

11. M. Govinda Rao and Nirvikar Singh (2005), Political Economy of Fiscal Federalism in India, Oxford University Press.

12. R.S. Deshpande (2002), Suicide by Farmers in Karnataka : Agrarian Distress and Possible Alleviatory Steps, Economic and Political Weekly, Vol. XXXVII, No. XVI, ISSN: 0012-9976, OCLC: 46735231, June29, 2002, PP. 2601-2610.

13. R. S. Deshpande (2008). Farmer's Distress and Indebtedness : Miseries and Myths." Agriculture Development and Re Transformation Centre, Institute for Social and Economic Change, Bangalore. RSD/ Symbiosis / Draft Paper/ 11-01-08.

याविषयीचा. दास्ताने यांचा प्रस्तुत युक्तिवाद कसा अयोग्य आहे यावर विस्ताराने भाष्य करण्याऐवजी वाचकांनी तळटीप नमूद इकॉनॉमिक अॅन्ड पॉलिटिकल विकली (खंड : XLVI, अंक : XXVI-XXVII, पृष्ठ : १३१-१३७), जून २०११ मधील विशेष लेखाचे शीर्षक उदाहरणादाखल पहावे ही विनंती आणि काय ते समजावे.[१४] अर्थात, प्रतिक्रियास्रोत लेखाच्या शीर्षकात दास्ताने नमूद करतात तशी काही गंभीर चूक नाही याविषयी वाचक सहमत होतील अशी अपेक्षा तळटिपेच्या आधारे आपण करू शकतो हे नि:संदिग्ध आहे.

यानंतर दास्ताने यांनी प्रतिक्रियास्रोत लेखात वापरलेल्या संज्ञा व पारिभाषिक शब्द याविषयी आक्षेप नोंदविला आहे. तसेच प्रतिक्रियास्रोत लेखातील अनेक उदाहरणादाखल शब्दांचा उल्लेख करून संबंधित शब्दांऐवजी साधे शब्द वापरता आले असते असे म्हटले आहे. मला असे वाटते की, अर्थसंवाद हे एक प्रथितयश व अर्थशास्त्रातील मराठी संशोधक, लेखक व विचारवंत वाचकांचे नियतकालिक असून ते काही दैनिक वर्तमानपत्र नव्हे. किंबहुना अर्थसंवादच्या लेखकांची व वाचकांचीही जबाबदारी फक्त शब्दांच्या वापरापुरतीच मर्यादित नसून मराठी अर्थशास्त्रीय लेखनात नवीन शब्दांची भर घालणे अशीही असावी. त्यामुळे दास्ताने यांनी उदाहरणादाखल शब्दांचा दुर्बोध असा उल्लेख करून सुबोधतेच्या नावाखाली बाळबोध शब्दांची सक्ती करून प्रतिक्रियास्रोत लेखातील भाषेवर ताशेरे ओढले आहेत असे मला वाटते. अर्थात, हा काही माझा नवीन अनुभव नाही. कारण यापूर्वीही २०१९ मध्ये प्रस्तुत लेखक व राजस परचुरे यांनी अर्थसंवादमध्ये लिहिलेल्या लेखावर त्या वेळी आलेल्या नंतरच्या अंकातील प्रतिक्रियेतही आमच्या लेखातील भाषेवर टीका करून दुर्बोधतेकडून सुबोधतेच्या नावाखाली बाळबोध भाषेची अपेक्षा केलीच होती.[१५]

याविषयी मला वाटते, दास्ताने स्वत: मराठी विश्वकोषाचे काम पाहतात. त्यामुळे वापरलेल्या शब्दांची दुर्बोध अशी संभावना न करता त्यांनी प्रयोग केलेल्या प्रतिक्रियास्रोत लेखातील शब्दांमुळे मराठी अर्थशास्त्रीय भाषेला काहीतरी योगदान मिळाले असा ओझरता उल्लेख केला असता तर बरे झाले असते अशी माफक अपेक्षा करता येणार नाही का? आक्षेपाच्या याच भागात दास्ताने यांनी प्राक्कथन या शब्दाविषयीही आक्षेप नोंदविला आहे. अर्थात, हा शब्दप्रयोग मी माझ्या यापूर्वीच्या अनेक मराठी लेखांच्या बाबतीतही अर्थसंवाद व समाजप्रबोधन पत्रिकेत वापरला आहे. तसेच प्राक्कथन हा शब्दप्रयोग यापूर्वी मी अनेक ठिकाणी पाहिला व वाचला आहेच. दास्ताने पुढे जाऊन प्राक्कथनबाबत असे नमूद करतात की प्रस्तुत शब्दप्रयोग Prediction या अर्थाने वापरला जातो. परंतु आपणा सर्वांना माहिती नाही का की, Prediction या शब्दाचा सर्वदूर व शब्दकोषीय अर्थ हा फक्त आणि फक्त 'अंदाज' असाच आहे? प्राक्कथन हा शब्द गोषवारा किंवा उपोद्घात अर्थात Abstract या अर्थाने वापरला जाऊ शकतो. याबद्दल दास्ताने यांना का आक्षेप वाटतो हे मला अनाकलनीय वाटते. तसेच त्यांनी प्राक्कथन म्हणजे प्रस्तावना असे आहे काय

---

14. R.S. Sidhu, Sukhpal Singh and A.S. Bhullar (2011), Farmer's Suicides in Punjab : A Census Survey of the Two Most Affected Districts, Economic and Political Weekly, Vol. XLVI. No. XXVI-XXVII, ISSN: 0012-9976, OCLC: 46735231, PP. 131-137.

१५. राजस परचुरे व ज्ञानदेव तळुले (२०१९), पैसा आणि सामान्य असमतोल : सैद्धांतिक आणि वास्तव परिस्थितीजन्य परिप्रेक्ष, अर्थसंवाद, (Reg. No. 31918/77/ISSN:0973-8452), जुलै-सप्टेंबर २०१९, खंड XXXXIII, अंक II, पृष्ठ ९१-१२४.

अशीही विचारणा केली आहे तर तसे ते निश्चितच नाही, हे लक्षात घ्यावे.

यानंतरच्या आक्षेप कथनात दास्ताने यांनी अनुक्रमे उस्मानाबाद व यवतमाळ या सर्वेक्षित जिल्ह्यांच्या पार्श्वभूमीविषयक (उदा. लोकसंख्या, सिंचन, बँका, नागरीकरण, कृषी बाजार) माहितीच्या अभावावर बोट ठेवले आहे. परंतु उपरोल्लेख केल्याप्रमाणे अर्थसंवादचे वाचक हे वर्तमानपत्र वाचकसदृश नसून ते जाणते, संशोधक व उच्चशिक्षित मराठी भाषिक अर्थशास्त्र व्यावसायिक तर आहेतच तसेच लेखाची लांबी व अर्थसंवादची शब्दमर्यादा लक्षात घेऊन हा सहजसोपा भाग टाळला आहे. परंतु विश्लेषणाच्या अनुषंगात प्रतिक्रियास्त्रोत लेखात संबंधित जिल्ह्यांतील सिंचन, पिकपद्धती, कृषी बाजार, ग्रामीण विद्युतीकरण, सहकारी कर्ज, आरोग्य सुविधा, विपणन.... इत्यादीविषयी अनेक ठिकाणी भाष्य केलेले आहेच. याकडे का दुर्लक्ष झाले असावे, हे मात्र समजत नाही.

यानंतरच्या भागात दास्ताने यांनी शेतकरी आत्महत्यांविषयी माहिती पुरविणाऱ्या काही संस्थांची नावे प्रतिक्रियास्त्रोत लेखात दिली आहेत असे म्हटले आहे (उदा. TISS, IGIDR इत्यादी). परंतु एक लक्षात घ्यावे की, या संस्था शेतकरी आत्महत्याविषयक माहिती पुरविणाऱ्या संस्था नसून यापूर्वी शेतकरी आत्महत्यांवर सर्वेक्षणाधारीत महाराष्ट्र राज्य सरकार व मुंबई उच्च न्यायालयाकरीता अभ्यास करणाऱ्या संस्था आहेत याची नोंद घ्यावी. कारण या संस्था शेतकरी आत्महत्यांविषयी माहिती देतात असे प्रतिक्रियास्त्रोत लेखाच्या लेखकाने कोठेही म्हटलेले नाही. यानंतर दास्ताने अशी विचारणा करतात की सर्वेक्षित १५१९ हा शेतकरी आत्महत्यांचा आकडा कोठून आला. कृपया नोंद घ्यावी की कोणताही संवेदनशील व काळजीपूर्वक संशोधक असा आकडा मोघम किंवा अंदाजे घेत नसतो. याविषयी असे की अनुक्रमे औरंगाबाद, अमरावती व नागपूर विभागीय आयुक्तालयांमधून वर्षवार व जिल्हानिहाय सर्व अठरा जिल्ह्यांतील शेतकरी आत्महत्यांच्या याद्या (लिंग, वय, आत्महत्या दिनांक, गाव, पत्ता, आत्महत्येचे स्वरूप, शासकीय मदत, आत्महत्या चौकशीचे स्वरूप) मिळवून सर्वेक्षीत दोन्ही जिल्ह्यांतील जानेवारी २०१४ ते डिसेंबर २०१७ दरम्यानच्या शेतकरी आत्महत्यांचा १५१९ हा आकडा मिळतो. याकामी आपण शेतकरी आत्महत्यांची गावपातळी ते राष्ट्रीय गुन्हे नोंदणी संस्था (National Crime Records Bureau / NCRB) असा आकडेवारीचा प्रवास व संचय कसा होतो हे जाणून घेऊ नये काय? अर्थात, हा आकडा अंदाजपंचे किंवा मोघम आहे असा संशय दास्ताने यांना कसा आला याचे आश्चर्य वाटते. पुन्हा तोच प्रश्न की प्रत्येक बाबीचा शब्दमर्यादा लक्षात घेता उल्लेख संशोधन नियतकालिकाच्या लेखात कसा शक्य आहे? आणि होय, जानेवारी २०१४ ते डिसेंबर २०१७ या चार वर्षांच्या काळात अनुक्रमे दोन्ही जिल्ह्यांत १५१९ पेक्षा जास्त शेतकरी आत्महत्या घडून आल्या होत्या. तशा सर्व जिल्हानिहाय याद्याही मिळविल्या होत्याच. परंतु सर्वेक्षण मात्र १५१९ कुटुंबांचेच होऊ शकले याची कारणमीमांसा प्रतिक्रियास्त्रोत लेखाच्या पृष्ठ क्रमांक ५० वरील वाक्य क्रमांक अनुक्रमे २ ते १० मध्ये दिली नाही काय? त्याकडे का दुर्लक्ष झाले हे मला अनाकलनीय वाटते. परंतु असो. १८५० ते १९४० दरम्यानच्या ब्रिटिश ग्रामीण भारतातील शेतकरी आत्महत्या मृत्युदर अधिक राहिले असे विधान प्रतिक्रियास्त्रोत लेखात आहे. परंतु त्याचबरोबर असाही उल्लेख आहे की ग्रामीण भूकबळी मृत्युदराचे प्रमाण आत्महत्या मृत्युदरापेक्षा नेहमीच अधिक राहिले. परंतु दास्ताने यांनी संबंधित परिस्थितीवरील भाष्याचा अर्धवट भाग अधोरेखीत करून आक्षेप नोंदविला हे योग्य नव्हे. आणि दुष्काळ, कृषी उत्पादन घसरण, अनिर्बंध सावकारी व्याज व सावकारांना आणि जमिनदारांच्या

हक्कांना ब्रिटिशांचे संरक्षण व शेतसाऱ्याची रोख वसुली अशा अनेक गंभीर समस्या असतानाही शेतकऱ्यांनी आत्महत्यांचा मार्ग न अवलंबता सावकार व जमिनदारांविरोधात आंदोलने करून त्यांचे नाक/कान कापण्यापर्यंत शिक्षा दिल्या हे कदाचित आपल्या इतरत्र ही वाचनात आले असावे असा मी विश्वास करतो. विशेष म्हणजे, अशा आंदोलनांचे केंद्रबिंदू अहमदनगर व पुणे जिल्हे होते हे आपणा सर्व जाणकारांना माहीत आहेच. अर्थात, शेतकऱ्यांनी आत्महत्यांचा मार्ग अवलंबण्याऐवजी प्रखर आंदोलनाचा मार्ग उचलला या अर्थाने प्रतिक्रियास्त्रोत लेखाच्या लेखकाचे संबंधित वाक्य बरोबर नाही काय?

यानंतरचा आक्षेप आहे तो प्रतिक्रियास्त्रोत लेखातील पृष्ठ क्रमांक ५१ वरील स्वामिनाथन एम. एस. (२००६) यांच्या लिखाणाच्या संदर्भाविषयी. होय, तो संदर्भ लेखात आला आहे (२००६). व तो "Farmers Commission" संबंधी आहे. संदर्भसूचीत तो संदर्भ द्यावयाचे राहून गेले हे मान्य. परंतु असा मुद्दा उपस्थित करून आशयापेक्षा व्याकरणाची महती सांगणारा खोचकपणाच अधिक प्रकर्षाने जाणवला. अर्थात, चुकीसाठी चूक दाखविणे असे असले तरी संबंधित संदर्भ अंतिम संदर्भसूचीत द्यावयाचे राहून गेले हे मान्य.

प्रतिक्रियास्त्रोत लेखातील पृष्ठ क्रमांक ५५ वरील आलेख क्रमांक सहा आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांचे जात वर्गीकरण करतो. होय, प्रस्तुत आलेखातील आकडेवारी जात किंवा पोटजातीनिहाय टक्केवारी दर्शविते. संबंधित जाती-पोटजातींचे एकत्र कायदेनिहाय/ वर्गनिहाय वर्गीकरण का नाही असा आक्षेप दास्ताने नोंदवितात. कोणाही व्यक्तीने प्राथमिक सर्वेक्षणाचा अनुभव घेतला तर ग्रामीण समाजरचनेत जात किंवा संबंधित पोटजात किती महत्त्वाची आहे हे त्या व्यक्तीस समजू शकते. मुलाखतीदरम्यान बहुतांश व्यक्ती आपली जात अथवा पोटजातीबाबत ठाम असतात, तर काही व्यक्ती याबाबत आपली जात सांगण्याऐवजी कायद्याने बहाल वर्गीकरणावर निर्भर राहणे पसंत करतात (SC, ST, OBC, NT...). अर्थात, याबाबतचे नि:संदिग्ध आकलन प्राप्त होण्याकामी प्राथमिक माहिती निर्भर संशोधनाचा अनुभव महत्त्वाची भूमिका पार पाडतो असे प्रस्तुत लेखकास नम्रपणे वाटते. अनेक समाजातील आर्थिक तथा राजकीय प्रश्न भेडसावताना व ते सोडवताना सामाजिक शास्त्रीय संशोधन व धोरण निश्चिती क्षेत्रात काम करणाऱ्यांना नव्याने सांगणे आवश्यक आहे असे मला वाटत नाही. दास्ताने यांनी व्यक्त केलेल्या आक्षेपाप्रमाणे आत्महत्यांसंदर्भात ही समस्या सर्व जाती, जमाती किंवा पोटजातीत गंभीर स्वरूपाची आहे. नव्हे, शेतकरी आत्महत्यांची समस्या त्याच्या उग्र आर्थिक स्वरूपामुळे सर्व जातींमध्ये जवळजवळ समान प्रमाणात भेडसावत आहे हे अधोरेखीत करण्याचा प्रयत्न आहे हे एक. आणि दुसरे असे की या प्रश्नाकडे सर्व स्तर व जातीच्या राजकीय नेतृत्वाला गांभीर्याने पहावे लागेल. कारण आकडेवारीवरून हेच सिद्ध होते की या कामी कोणतीही जात शेतकरी आत्महत्येस अपवाद नाही. अर्थात, संबंधित वर्गीकरण दास्ताने यांना संशयास्पद वाटते याबद्दल मात्र मी काही भाष्य करू इच्छित नाही. एकमात्र निश्चित की या कामी प्राथमिक माहिती निर्भर संशोधनाचा स्वत:चा अनुभव असणे अत्यंत महत्त्वाची बाब आहे. परंतु ज्यांनी आपल्या जातीचा उल्लेख केला आहे तो दुर्लक्षून चालणार नव्हते.

यानंतर दास्ताने असा मुद्दा उपस्थित करतात की सर्वेक्षित कुटुंबापैकी किती जणांची बागायती व किती जणांची जिरायती शेती आहे, हे टीकाकारास किंवा वाचकास विश्लेषणावरून समजत नाही. अनुक्रमे आलेख क्रमांक ७ व ८ मध्ये याविषयीचे विवेचन दिलेले आहे. येथेही पुन्हा ग्रामीण व कृषी अर्थव्यवस्थेच्या स्वरूपाविषयी आकलनाचा प्रश्न उपस्थित होतो असे प्रस्तुत लेखकास वाटते. यामध्ये काही विशिष्ट शेतकरी

बागायती तर इतर फक्त जिरायती शेती करणारे असतात असे दास्ताने यांना म्हणावयाचे आहे काय? तर मग तसे निश्चित नसते. कारण बहुतांश शेतकरी जिरायत व बागायत अशी संमिश्र स्वरूपाची कृषी कास्तकारी करत असतात याची कल्पना असणे अत्यंत आवश्यक आहे. कारण, जवळजवळ बहुतांश शेतकऱ्यांकडे जिरायतीबरोबरच काही प्रमाणात विहीर किंवा कूपनलिकेची व्यवस्था करून बागायतीचा प्रयत्न केलेला असतो. होय, हे सत्य आहे की, अनेक बागायती शेतकरी आत्महत्या करतात हे वास्तव आहे. मुळात आपणांस देशपातळीवरील पंजाब, महाराष्ट्र, आंध्र प्रदेश (तेलंगणा), कर्नाटक व केरळ या प्रमुख आत्महत्याग्रस्त राज्यांचा विचार केला तर एक समान धागा दिसतो व तो म्हणजे ही सर्व राज्ये कृषीच्या बाबतीत इतर राज्यांच्या तुलनेत आघाडीवर आहेत. मुळात प्रतिक्रियास्रोत शोधनिबंध एकलपणे (Isolation) वाचला तर अशा प्रकारचे प्रश्न पडणे साहजिक आहे. या विषयावर देशभरात जी इतर अनेक संशोधने झाली आहेत त्यांचे आकलन करून घेता असा प्रश्न शक्यतो पडणार नाही याची खात्री वाटते. यानंतरचा प्रश्न उपस्थित केला आहे तो म्हणजे ५१४ कुटुंबांमध्ये बिनशेतीची जमीन असल्याने त्यांना शेतकरी कुटुंब कसे संबोधले हा होय. पुन्हा प्रश्न निर्माण होतो तो म्हणजे कृषी अर्थव्यवस्था समजून घेण्याचा. शेतजमिनीचा ७/१२ उतारा पाहिला तर त्यात पाणी पड, इतर पड, तलाव पड....इत्यादी अनेक प्रकारची वर्गीकरणे असतात. परंतु या सर्व पडी मिळून शेतकऱ्याच्या नावावरील एकूण जमिनीचे ७/१२ वरील आकारमान ठरते हे आपणास माहीत नसावे काय?

आलेख क्रमांक ९ मध्ये एकूण ४२ निरनिराळे पीक गट दर्शविल्याबद्दल आक्षेप घेतला आहे. होय, यापेक्षा कमी संख्येनेही हे पीक गट दर्शविता आले असते हे मान्य. परंतु आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांची पीकरचना सक्षम पद्धतीने समोर येण्याकरीता (एकूण १०० टक्क्यांचे विभाजन दुर्लक्षून) हे अधिकचे पीक गट नमूद केले आहेत याची नोंद घेणे आवश्यक आहे. परंतु विश्लेषणात त्याची योग्य दखल घेतली आहेच. यानंतर पृष्ठ क्रमांक ६० वरील आलेख क्रमांक ११ वरील घेतलेला आक्षेप म्हणजे भांडवली गुंतवणूक कर्ज शून्य असताना चार कोटी रुपये दर्शविणारा स्तंभ कसा असा आहे. या कामी प्रस्तुत आलेखाचे शीर्षक काळजीपूर्वक तपासणे आवश्यक आहे. यात प्रामुख्याने उद्देशनिहाय कर्जे, परतफेड व थकबाकी असे तिहेरी वर्गीकरण आहे. तसेच प्रस्तुत आलेख या सर्व कामी रकमा दर्शविणारा आहे. परंतु आलेखाच्या अति लहान झालेल्या आकारामुळे हा गोंधळ निर्माण झाला असावा असे वाटते. पर्यायाने आलेख क्रमांक ११ चे निरीक्षण करताना झालेल्या गोंधळामुळे आलेख क्रमांक १२ वर देखील आक्षेप नोंदविला आहे व तो अवास्तवच आहे. कारण प्रस्तुत आलेखाच्या विश्लेषणात सर्व बाबींचा विस्तृत उहापोह केलेला आहे. कारण भांडवली गुंतवणूक कर्जे शून्य नसून पृष्ठ क्रमांक ६१ वरील स्तंभ दोन मधील पहिल्या दोन-तीन वाक्यांतच गुंतवणूक कर्ज, परतफेड व थकबाकीचे विवेचन दिलेले आहे. त्यामुळे याची नोंद घेणे आवश्यक आहे की, भांडवली गुंतवणूक कर्जे शून्य नाहीत. मात्र आलेख क्रमांक ११ च्या आकारमानामुळे जरासा गोंधळ निर्माण झाला हे निश्चित.

प्रतिक्रियास्रोत लेखाच्या पृष्ठ क्रमांक ६३ ते ६६ दरम्यान आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबाचे एकूण तेरा पिकांचे कृषी लागवड व्यय मूल्य, पीकनिहाय किमान आधार किमती व प्रचलित बाजार किमतीनुसार मोबदला घेऊन $A_2$+FL उत्पादन व्ययाच्या तुलनेत प्रति एकर व प्रति क्विंटल पीकनिहाय लाभ व तोटे मिळविले आहेत हे खरे. परंतु येथेही दास्ताने यांना विजातीय आकडेवारीचा आरोप करावा वाटणे हे आश्चर्य व खेदजनकच आहे. एकतर दास्तानेंचे वाक्य असे आहे की, $A_2$+FL च्या सूत्राद्वारे आकडेवारी देऊन तोटा

कसा होतो हे दर्शविले आहे. हे वाक्य वाचताक्षणी असे वाटते की, प्रतिक्रियास्रोत लेखाच्या लेखकाने काहीही करून शेतकऱ्यांचा तोटा दाखविण्याचा जणू चंगच बांधला आहे. दास्ताने यांना उत्पादन खर्च व उत्पन्न प्रति क्विंटल हवे आहे किंवा तसे न केल्यामुळे लेखकाचे विवेचन त्यांना शास्त्रशुद्ध वाटत नाही. अर्थात, तसे ते केलेलेही आहेच. येथे जर दास्तानेंनी संशयी दृष्टीने न पाहता लेखकाने यासंबंधीचे युक्तिवाद कसे केले असावेत याचा विचार केला असता (कदाचित सहानुभूतीपूर्वक?) तर त्यांना असा प्रश्न पडला नसता. येथे एक बाब लक्षात घेणे आवश्यक आहे की, एकूण १५१९ सर्वेक्षित शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबांनी लागवड केलेल्या तेरा प्रमुख पिकांचे लावगडीखालील क्षेत्राशी प्रमाणबद्ध सरासरी एकरी उत्पादन, $A_2$+FL प्रमाणे एकरी उत्पादन खर्च व एकरी उत्पादन खर्चाची सरासरी एकरी उत्पादनांशी तुलना करून प्रति क्विंटल सरासरी उत्पादन खर्च काढला आहे. त्यानंतर या प्रति क्विंटल उत्पादन खर्चाची प्रचलित बाजार किंमत व संबंधित वर्षी घोषित केलेल्या पीकनिहाय किमान आधार किमतीशी तुलना करून लाभ-तोट्याचा विचार केला आहे. नव्हे की, लेखकाने तोटा दाखविण्याचा चंग बांधला होता. प्रतिक्रियास्रोत लेखाचे पृष्ठ क्र. ६३ ते ६६ वाचन करताना या सर्व बाबी वाचकाने लक्षात घेणे आवश्यक आहेच. याबद्दल दुमत असूच शकत नाही. यानंतर $A_2$+FL बद्दल दास्ताने आक्षेप घेतात. त्यांचे असेही म्हणणे आहे की, $A_2$+FL ऐवजी $C_2$ चा वापर का केला नाही. याविषयी मला वाटते, आपणा सर्वांना ज्ञात असावे की स्वामिनाथन यांचा $C_2$+50% चा आग्रह / सूचना केंद्र सरकारने खुबीने टाळून $A_2$+FL देऊ केले असल्याने वास्तवाचाच विचार करून प्रतिक्रियास्रोत लेखाच्या लेखकाने [$C_2$ (दास्ताने म्हणतात तसे)] $C_2$+50% ऐवजी $A_2$+FL चा वापर करून उत्पादन व्यय काढला आहे याची नोंद घेणे आवश्यक आहे. अर्थात, हे सर्व करताना लेखकाने विचाराअंतीच केले आहे व अधिकाधिक वास्तव चित्र मांडण्याचा प्रयत्न केला आहे. आणि महत्त्वाचे म्हणजे हे सर्व सोपस्कार करताना प्रतिक्रियास्रोत लेखाच्या लेखकास $A_2$+FL, $C_2$ व $C_2$+50% या सर्व कृषी उत्पादन व्यय संकल्पनांबाबत कल्पनाही होती हे वेगळे सांगण्याची वेळ येते याचा निश्चित खेद आहे.

प्रतिक्रियास्रोत लेखाच्या पृष्ठ क्रमांक ७० वरील पीकनिहाय तोटा कसा मोजला हा दास्ताने यांचा प्रश्न वरील सर्व विवेचनातून आपोआप निकाली निघतो. त्यामुळे यावर वेगळे व अधिकचे विवेचन प्रस्तुत लेखक करू इच्छित नाही. अर्थात, येथे एक बाब लक्षात येते व ती म्हणजे $A_2$+FL ऐवजी $C_2$ किंवा $C_2$+50 टक्के अधिक असे पीकनिहाय किमान आधार किंमत धोरण स्वीकारणे गृहीत धरून प्रचलित बाजार किमती किंवा प्रचलित पीकनिहाय किमान आधार किमतीचा विचार केला असता तर पीकनिहाय अपेक्षित तोट्याचे आकडे कितीतरी प्रमाणात अधिक असते.

प्रतिक्रियास्रोत लेखाच्या पृष्ठ क्रमांक ७१ वरील विचेचनावर आक्षेप नोंदवताना ५५.१९ टक्के शेतकऱ्यांऐवजी आलेख क्रमांक १७ (पृष्ठ क्रमांक ६९) वरील सावकारी कर्ज (२८.३८ टक्के) दर्शविणाऱ्या स्तंभाचा आधार घेतला आहे. या कामी एक बाब लक्षात घ्यावी की, बहुतांश शेतकरी सावकारी कर्जांच्या विभागणीविषयी माहिती देताना मित्र, नातेवाईक अशीच करतात. कारण त्याबाबतीत त्यांच्यावरील स्थानिक सामाजिक व सावकाराच्या वर्चस्वाचा दबाव. परंतु खाजगीत मात्र हे कर्ज सावकारी कर्जच असते याची नोंद घेणे तितकेच आवश्यक आहे. माहिती देताना व्यापारी, मित्र व नातेवाईक असे मार्ग जरी दाखविले तरी त्याचा व्याजदर कदापिही कमी नसतो किंवा तशा कर्जाचा दबावही अजिबात कमी नसतो याची आपण जाणीव ठेवून नोंद घेणे आवश्यक असते. अर्थात,

प्राथमिक माहितीवरील विवेचन फक्त आकडेवारी निर्भर नसते, तर त्याला आकडेवारीच्या पृथक्करणाव्यतिरिक्त सघन समूह चर्चा (Focussed Group Discussions) किंवा गावातील इतरांबरोबर, वयस्क व जाणकारांबरोबर केलेल्या चर्चांचाही आधार असतो. त्यामुळे असे विश्लेषण एकप्रकारे "Reading between the lines" स्वरूपाचे असते.

प्रतिक्रियास्रोत लेखातील अंतिम उणीव दाखवताना दास्तानेंचा आत्महत्यांच्या कारणांवर आक्षेप आहे (आलेख क्रमांक २०). मुळात प्रतिक्रियास्रोत लेखाच्या लेखकाने या घटकांचे संबोधन कारणे असा न करता आत्महत्यांचे जोखीम घटक असाच केला आहे. याविषयी आक्षेप नोंदवताना प्रस्तुत लेखक अधिकाराने या विषयावरील प्रचुर प्रमाणात उपलब्ध संशोधन, लेखन व प्रकाशनाचे वाचन करणे आवश्यक आहे असे निश्चितपणे सुचवेन. कारण आत्महत्येने जीवन संपविणे ही इतकी साधी, सरळ, सोपी घटना नाही. निश्चितपणे ती एक गुंतागुंतीची प्रक्रिया व आकलनास तितकीच क्लिष्ट बाब आहे हे निश्चित.[१६,१७,१८,१९,२०,२१,२२,२३] त्यामुळे आपल्यासारख्या त्रयस्थ व्यक्तींना आत्महत्येच्या निश्चित कारणांप्रत पोहोचणे कठीण तसेच अशक्य असते. शेतकरी आत्महत्यांबाबत महत्त्वपूर्ण बाब म्हणजे या आत्महत्या दारिद्र्यामुळे होत नसून कृषी कास्तकारीतून अपेक्षित लाभ व प्रत्यक्ष लाभातील वर्षानुवर्षांच्या ऋणात्मक तफावती निर्मित तोट्यातून येणाऱ्या निराशेतून घडून येतात.[२४,२५,२६] याकरिता इतर अनेक संशोधकांची प्रकाशने वाचणे आवश्यक आहेच आहे. त्यामुळे आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या वर्तणुकीत आमूलाग्र बदल होऊन आत्महत्येपूर्वी त्यांच्या वागण्या-बोलण्यात बदल होतात. त्यामुळे प्रतिक्रियास्रोत लेखाच्या पृष्ठ क्रमांक ६६ वरील आलेख क्रमांक २० मधील कारणे म्हणजे (नव्हे, जोखीम घटक) संबंधित

---

१६. Emile Durkheim (2013/Originally Published in 1897), Suicide : A Study in Sociology.
१७. Srijit Mishra (2014), Farmers Suicides in India, 1995-2012 : Measurement and Interpretation, Asia Research Centre Working Paper, London School of Economics and Political Science, London, United Kingdom.
१८. Suri K. C. (2006), Political Economy of Agrarian Distress, Economic and Political Weekly, Vol. XXXXI, No. XVI, ISSN: 0012-9976, OCLC: 46735231, PP. 1523-1529.
१९. Tata Institute of Social Sciences (2005), Causes of Farmer Suicides in Maharashtra Final Report Submitted to Mumbai High Court, March 15, 2005.
२०. V. Ratna Reddy and Galab (2005), Agrarian Crisis : Looking Beyond the Debt Trap." Economic and Political Weekly, ISSN : 0012-9976, OCLC: 4673523, May 13, 2006. PP. 1838-1841.
२१. V. Shridhar (2006), Why do Farmers Commit Suicide? The case of Andhra Pradesh" Economic and Political Week XLI, XVI, ISSN : 0012-9976, OCLC: 46735231, PP. 1559-1565.
२२. Srijit Mishra, (2006), Suicide Mortality Rates Across States of India, 1975-2001: A Statistical Note, Economic and Political Weekly, ISSN : 0012-9976, OCLC : 46735231, Vol. XXXXI, No. XVI, 22 April 2006.
२३. Srijit Mishra (2006), Farmer's Suicides in Maharashtra, Economic and Political Weekly, ISSN : 0012-9976, OCLC : 46735231, Vol. XXXXI, No. XVI, 22 April, 2006.
२४. V Sridhar (2006), Why Do Farmers Commit Suicides?, Economic and Political weekly, ISSN : 0012-9976, OCLC: 46735231, Vol. XXXX, No. XXII, April, 2006.
२५. A. Vaidyanathan (2006), Farmers Suicides and the Agrarian Crisis, Economic and Political Weekly, ISSN : 0012-9976, OCLC: 46735231, Vol. XXXXI, No. XXXVIII, Sep. 2006.
२६. Dnyandev C. Talule (2020), Farmer Suicides in Maharashtra, 2001-2018: Trends Across Marathwada and Vidarbha, Economic and Political Weekly, Vol. LV, No. XXV, ISSN : 0012-9976, OCLC : 46735231, pp. 116-125.

दुर्दैवी शेतकऱ्यास सामोरे जाव्या लागणाऱ्या कारणांचा नव्हे, तर एक प्रकारे बहुविध संकटांचा व जोखीम घटकांचा तो मागोवा आहे. त्यामुळे कृपा करून त्याची तुलना १०० टक्क्यांच्या विभाजनाशी करू नका. उदाहरणार्थ, कधीही मद्यपान न करणारा शेतकरी आत्महत्येकरिता उग्र किटकनाशकाचे सेवन करण्यापूर्वी धाडसासाठी मद्यपान करतो. मृत्यूनंतर त्याच्या शवविच्छेदनात मद्यपान सापडते. त्यामुळे पोलीस तपासात मद्यपानाची नोंद होते. अशा आत्महत्येबाबत विस्तृत स्वरूपाची सामाजिक व आर्थिक पार्श्वभूमी दुर्लक्षून मद्यपान करून आत्महत्या केली आहे, असा निष्कर्ष काढला जातो. याचा अर्थ एवढाच की, प्रस्तुत आत्महत्येचे कारण मद्यपान नसते हे लक्षात घेणे आवश्यक आहेच आहे. विशेष म्हणजे एकंदरीतच प्रदीर्घ आर्थिक संकटामुळे संबंधित शेतकऱ्यावर मानसिक ताण येऊन त्याच्या वर्तणुकीत कोणत्या प्रकारचे बहुविध बदल होतात याची कल्पना प्रस्तुत आलेखातील (आलेख क्रमांक २०) विवेचनावरून येते. त्यामुळे शेतकरी आत्महत्यांचे विष प्राशन करणे किंवा फाशी घेणे ही जरी तात्कालिक कारणे असली, तरी त्यांची बहुविध पार्श्वभूमी असते व ती प्रदीर्घकालीन संकटनिर्मित त्याच्या मानसिकतेत झालेल्या बदलातून उत्पन्न होते एवढे जरी लक्षात घेतले तरी पुरेसे आहे. त्यामुळे प्रतिक्रियास्रोत लेखाच्या पृष्ठ क्रमांक ६६ वरील आलेख क्रमांक २० मधील विवेचनावरील आक्षेप वर्तमानपत्रीय स्वरूपाचा नसायला हवा होता, एवढीच माफक अपेक्षा प्रस्तुत लेखक करतो.

**सारांश:**

एकंदरीत काय, तर भारतातील व प्रकर्षाने महाराष्ट्रातील शेतकरी आत्महत्या गेली अनेक दशके सुरू असून आत्महत्यांमुळे हजारो शेतकऱ्यांनी त्यांचे जीवनमान संपविले. एकंदरीतच महाराष्ट्रातील राजकीय अर्थव्यवस्थेचे कृषी अर्थव्यवस्थेप्रति सातत्यपूर्ण दुर्लक्ष व अपयशच यातून अधोरेखीत होते याबद्दल विसंवाद नसावा. याचा अर्थ, याकरिता महाराष्ट्रातील राजकीय व अर्थधुरीणांना प्रामाणिकपणे 'God of small things and not the Rocket Science' अशा दृष्टिकोनाची गरज आहे. यावरील विस्तृत विवेचनाची ही वेळ व जागाही नव्हे. यावर पुन्हा केव्हातरी विवेचन करूयात. अंतिमतः दास्ताने यांनी प्रतिक्रियास्रोत लेखाचे गंभीरपणे वाचन केल्याशिवाय त्यांना इतक्या सखोलपणे प्रतिक्रिया देणे शक्य नव्हते याची मला पूर्णपणे कल्पना आहे. प्रतिक्रिया लिहिण्यापूर्वी मी प्रारंभी उल्लेख केल्याप्रमाणे दास्तानेंनी मला दूरध्वनीवरून तसे विचारलेही होते. त्यामुळे मी आनंदाने त्यास होकार देऊन अर्थात अपेक्षित टीकाटिप्पणीचा तेव्हाच अंदाज बांधून व स्वीकार करून प्रतिक्रियास्रोत लेखाच्या निमित्ताने महाराष्ट्राच्या संशोधन व शैक्षणिक परीघावरील खंडित परंपरेच्या पुनःश्च सुरुवातीकरिता मी त्यांना तयारी दर्शविली होतीच.

◆

---

माझी सर्वाधिक प्राथमिकता म्हणजे महत्त्वाच्या सामाजिक आणि आर्थिक समस्या सोडविणे ज्यामुळे दीर्घकालीन गरिबी, अज्ञान आणि रोगराईवर फारच कमी कालावधीत मात करता येऊ शकेल.

**- मनमोहन सिंग**

---

# आत्मिक ज्ञान, वैज्ञानिक अधिष्ठान,
# विवेकपूर्ण चारित्र्य निर्माणाच्या ध्येयाने प्रेरीत के.सी.ई. शिक्षण संस्था

**७७**

वर्षांची परंपरा असलेली

## सात दशकांपासून अविरत,
## अविश्रांत सेवा...

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| मू. जे. महाविद्यालय | शिक्षणशास्त्र आणि शारीरिक शिक्षणशास्त्र महाविद्यालय | एस. एस. मणियार लॉ कॉलेज | इन्स्टिट्युट ऑफ मॅनेजमेंट अँण्ड रिसर्च | कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँण्ड मॅनेजमेंट | स्वामी विवेकानंद कनिष्ठ महाविद्यालय |
| कान्ह कला व वाणिज्य रात्रकालीन महाविद्यालय | अध्यापक विद्यालय | गुरुवर्य परशुराम विठोबा पाटील प्राथमिक विद्यामंदीर | ए. टी. झांबरे विद्यालय | ओरिऑन सीबीएसई इंग्लिश मिडियम स्कूल | ओरिऑन इंग्लिश मिडियम स्कूल |
| किलबील बालक मंदीर | ओजस्विनी कला महाविद्यालय | पोस्ट ग्रॅज्युएट कॉलेज ऑफ सायन्स टेक्नॉलॉजी अँण्ड रिसर्च | जलश्री पाणलोट सर्वेक्षण व संशोधन संस्था. | स्पार्क इन्स्टिट्यूट ऑफ मल्टीमिडिया प्रिंटींग टेक्नॉलॉजी | मुलींचे वसतीगृह |
| स्पार्क डिझाईन अँण्ड प्रिन्ट सर्व्हिसेस | एकलव्य क्रीडा संकुल खेलो इंडिया संलग्नित | मदर टेरेसा हेल्थ केअर सेंटर | डॉ. कलाम स्किल डेव्हलपमेंट सेंटर | ललित कला केंद्र | सोहम् डिपार्टमेंट ऑफ योग अँण्ड नॅचरोपॅथी |

*"Apart from education, Skill Development, Research, Value Education and Placement is our prime focus"*
*- Nandkumar Bendale, President, K.C.E. Society.*

ESTD : 1944

## खान्देश कॉलेज एज्युकेशन सोसायटी, जळगाव

एम. जे. कॉलेज परिसर, जळगाव - ४२५००१ फोन/फॅक्स : ०२५७-२२३९८००
वेबसाईट - **www.kces.in** | ईमेल - **kcesociety@gmail.com**

## प्रज्ञावंत नंदकुमार जी. बेंडाळे (अध्यक्ष)

सन्माननीय व्यवस्थापन मंडळाचे सदस्य व के.सी.ई. परिवार, जळगाव

SPARK-2251918

**KCE - Think Globally Act Locally : Marching towards centenary**

जाहिरात सहकार्य : प्रा. चारूदत्त गोखले, माजी अध्यक्ष, कार्याध्यक्ष, विश्वस्त व कार्यवाह-खजिनदार, म.अ.प.

Reg.No. 31918/77 / ISSN 0973-8452

# अर्थसंवादसाठी
## हार्दिक शुभेच्छा

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **डॉ. स्नेहा देशपांडे**<br>नागपूर | **डॉ.जी.के.सानप**<br>संगमनेर | **डॉ. डी. डी. चौधरी**<br>अहमदपूर | **डॉ.श्रीनिवास खांदेवाले**<br>नागपूर | **डॉ. के. के. पाटील**<br>परभणी |
| **डॉ. मारोती तेगमपुरे**<br>अंबड | **डॉ. विजय भोपाळे**<br>नांदेड | **डॉ. मंगल भाटे/धोरण**<br>अमरावती | **डॉ. दिनकर टकले**<br>जालना | **डॉ. सुहास आव्हाड**<br>संगमनेर |
| **डॉ. अरुण पिसे**<br>धुळे | **डॉ. तुकाराम मुंडे**<br>मानवत | **डॉ. अनिल सूर्यवंशी**<br>अध्यक्ष, मराठी अर्थशास्त्र परिषद | **डॉ. राहुल शं. म्होपरे**<br>अर्जुननगर | **डॉ. जनार्दन काकडे**<br>चंद्रपुर |
| **डॉ. अशोक खाचने**<br>जळगाव | **डॉ. मृणालिनी फडणवीस**<br>मा. कुलगुरू सोलापूर | **डॉ. राजू पाटील**<br>सोलापूर | **प्राचार्य डॉ. भारत खंदारे**<br>जालना | **डॉ. ए. डी. गोस्वामी**<br>भुसावळ |
| **प्रा. शिवाजी काकडे**<br>गढी | **डॉ. माधव शिंदे**<br>अहमदनगर | **डॉ. सुरेश ढाके**<br>धुळे | **डॉ. राजू शिंदे**<br>धुळे | **डॉ. दि. व्य. जहागिरदार**<br>अमरावती |
| **डॉ. विष्णू ए. घुमटकर**<br>खामगाव | **डॉ. विद्या आर. पाटील**<br>धुळे | **डॉ. मोहन सदामते**<br>कुंडल | **डॉ. सुभाष पाटील**<br>पुणे | **डॉ. मनीषकुमार कायरकर**<br>बल्लारपूर |
| **डॉ. रामकृष्ण टाले**<br>नागपूर | **डॉ. भाऊसाहेब देशमुख**<br>राजूर | **डॉ. अजय दरेकर**<br>बारामती | **डॉ. सुमित्रा वि. पवार**<br>जळगाव | **डॉ. चंद्रकांत रा. जाधव**<br>वारणानगर |
| **डॉ. निजवंती आर. टेंभुरणे**<br>मोर्शी | **डॉ. प्रशांत हरमकर**<br>अमरावती | **डॉ. युगंधरा शै. टोपरे**<br>**(देशपांडे)** औरंगाबाद | **डॉ. वैशाली ल. देशमुख**<br>**(नाईक)** औरंगाबाद | **डॉ. संतोष दास्ताने**<br>पुणे |
| **डॉ.एस.एम. भोसले**<br>सातारा | **डॉ. गणेश मांगडे**<br>दापोली | **प्राचार्य डॉ.जे.एस. पाटील**<br>सातारा | **प्रा. चारुदत्त गोखले**<br>अमरावती | **डॉ. जयवंत इंगळे**<br>विटा |
| **डॉ. आर. बी. भांडवलकर**<br>यवतमाळ | **डॉ. एस. डी. जोशी**<br>जळगाव | **प्राचार्य डॉ. रामेश्वर भिसे**<br>अमरावती | **प्रा. संजय ठिगळे**<br>सांगली | **प्राचार्या डॉ. तेजस्विनी**<br>**मुडेकर,** कोल्हापूर |
| **श्रीमती अपर्णा दत्तात्रय**<br>**कुलकर्णी** | **डॉ. विकास सुकाळे**<br>नांदेड | **प्राचार्य डॉ. अशोक पत्की**<br>आंबेजोगाई | **डॉ. जीवन सोळुंके**<br>नाशिक | **डॉ. संग्राम चव्हाण**<br>सोलापूर |
| **डॉ.जे.एफ.पाटील**<br>कोल्हापूर | **डॉ. ए. आर. पडोशी**<br>गोवा | **डॉ. दीपक भुसारे**<br>पैठण | **डॉ. श्रीमती शर्मिष्ठा**<br>**सातव** | **डॉ. व्ही. ए. सोळुंके**<br>भुसावळ |
| **प्रा. विशाल बेलूरे**<br>नाशिक | **प्राचार्य डॉ. बबनराव**<br>**खामकर,** माणगाव | **डॉ. एस. टी. धूम**<br>भुसावळ | **प्रा. बी. जी. कोरे**<br>सातारा | **डॉ. अनिल सत्रे**<br>बोरगाव |
| **डॉ. एस. डी. तुपे**<br>पुणे | **डॉ. संजय धनवटे**<br>कारंजा | **डॉ. उल्हास माळकर**<br>पलूस | **प्राचार्य डॉ. एम.व्ही.**<br>**वायकोळ** भुसावळ | **डॉ. संभाजी सावंत**<br>चंदगड |
| | | **प्राचार्य डॉ. जे.जी.जाधव**<br>पंढरपूर | | |

**मूल्य : रु. १०/– (सभासदांकरिता विनामूल्य)**